म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा. वा.
दा. क्र. १९५८

दौलत

BVBK-0401968

# दौलत

१९९८

विषय

क्र. १९८६८ दिनांक ८।५।५
विषय बाल. क्र.

छोटया मुलांसाठी कादंबरिका

# दौलत

BVBK-0401968

सौ. मुमताज रहिमतपुरे

श्रीविद्या प्रकाशन

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक :

**उपेन्द्र दामोदर कुलकर्णी**
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
२१ मार्च १९८२
© फारुक का. रहिमतपुरे

**मूल्य सहा रुपये**

चित्रकार : मनोहर

मुद्रक :

**सुरेश जगताप**
जनसेवा मुद्रणालय
१९२ शुक्रवार पेठ, पुणे २.

१ :

चंद्रकला तीनतीनदा सारखी दाराकडे नजर टाकीत होती. हातातल्या कामाकडे तिचे लक्षही नव्हते. तिची सासू–पार्वती निवान्तपणे कोपऱ्यात बसली होती. सुनेच्या हालचाली पाहात होती. मनातून हसत होती.

परड्यात भारा टाकल्याचा आवाज झाला. पार्वती हाताला रेटा देऊन उठली. परड्यात आली. मल्हारबा पटक्याच्या शेवाने घाम पुसत होते. त्यांना म्हणाली.–' लई वकूत केलासा ? '

मल्हारबा म्हणाले–' हूं ! पावनं आलंत की नाही ! '

पार्वती म्हणाली–' अजून न्हाय आलं. पर चंद्रकला वाटंला नजर लावून बसलीय् ! '

मल्हारबा हसले. म्हणाले–' तू समूर बसली असशील. नायतर ती दारापाशी जाऊन बगती. '

पार्वती म्हणाली–' म्हायारचं मानूस येनार तर किती हरकलीया. '

मल्हारबा तिच्याकडे पाहात म्हणाले–' तू नव्हतीस हरकत ? तुमा बायकास्नी म्हायार म्हंजे जीव की परान ! म्हंतासाकी हादग्यात गानं– सासरच्या वाटं कुचूकुचू काटं आन् म्हायारची वाट मातूर फुलानं भरलेली नव्हं ! '

पार्वती ' चला ' म्हणून लाजली.

सासूला परड्यात गेलेली पाहून चंद्रकला हळूच उठली. दारापाशी आली. समोरची वाट निरखू लागली. एखादा माणूस येताना दिसायचा. चंद्रकला उत्सुकतेनं पाहायची. निराश व्हायची. तिला हवा असणारा माणूस काही दिसत नव्हता. शेवटी कपाळावर हाताची कोर लावून तिनं लांब नजर लावली.

'कावं? कुनाची वाट वगतासा ? आमी तर कवाचं आलूया !'

या प्रश्नानं ती दचकली. समोर तिचा नवरा धर्मा उभा होता. आपली चोरी पकडली गेली म्हणून ती ओशाळली. ती लाजून चुलीजवळ जाऊन वसली. तिच्या पाठोपाठ धर्मा गेला. तिला चिडवीत म्हणाला– 'उगा वाट वगू नगासा. येळ झालाय. कुनीबी येनार न्हाय.'

चंद्रकला कावरीबावरी झाली. म्हणाली– 'न्हाय वं. असं का म्हंतासा ? दादा येईलच. सांगावा आलाय नव्हं ?'

'मंग काय झालं ? मानसाला कामंधामं असत्याती. अडचण असती. आजचं उंद्या उंद्याचं परवा येतील तुजं दादा !' धर्मा म्हणाला. तसा चंद्रकलाचा चेहरा रडवा झाला. तो पाहून तो म्हणाला, 'एवडी म्हायारी जायाची घाई झालीया व्हय ?'

'तसं नव्हं जी !'

'मंग कसं ?'

'नाय् म्हटलं, दादा येल्यावगार न्हानार न्हाय !'

धर्मा एकदम म्हणाला– 'चंद्रा ! मला वाटतंय तू जाऊ न्हे!,

धर्माच्या तोंडाकडं पाहात ती म्हणाली– 'मंग वं ? माजं बाळातपण कोन करनार ? '

'कोन म्हंजी ! आय हाय की !'

'पर रितीपरमानं पयलं बाळातपण म्हायारी व्हायला पायजे.' मागनं तुमीच नावं ठिवशिला. म्हनाल, पावन्यास्नी काय बी रितभात न्हाई. '

'कोन न्हाय म्हननार ! '

'न्हाय कसं ? आत्यासाव म्हंतील्या. मामासाव म्हंतीली. तुम्ही दक्कल म्हनाल ! नावं ठिवायला काय जातं !' ती तावा-तावानं बोलली आणि धर्मा तिच्याकडं पाहात होता. चंद्रकला छान दिसत होती. धर्माला आपली बायको आवडत होती. तिच्या जवळपास कुणी नसलं की तो तिच्याशी बोलायचा. तिला चिडवायचा. ती हसायची, नाहीतर रागवायची. लाजायचीसुद्धा तो तिला नुसतं चंद्राच म्हणायचा.

असं नवरा–बायकोचं बोलणं चाललं होतं. मल्हारबा–पार्वती परड्यातून आली. त्यांना पाहिल्यावर धर्मा लाजला. उठला. मल्हारबा हसले. पार्वतीनं चंद्रकलेकडं पाहिलं. तिनं तोंडावर पदर धरला. लाजलेला चेहरा झाकला.

धर्मा पायरीवर बसला. मल्हारबा त्याच्यापाशी बसले. बापलेक थोडा वेळ तसेच बसले. मग मल्हारबा म्हणाला–

'पावन्याची वाट सरली जनू ? '

धर्मा म्हणाला– 'कायतरी अडचण असंल. येतील अजून बी ! '

मल्हारवा म्हणाले– 'व्हय्. तेबी खरंच. दोपारी येऊन शान तेस्नी जायाला ईल. गावतर हाकंवर हाय.'

धर्मा– 'न्हायतर काय ! कोसभरच हाय की नकातंवाडी ! '

मल्हारवा– 'चंद्रकला गेल्यावर घर रिकामं वाटंल वग !

धर्मा– 'हू.'

मल्हारवा– 'पर नातवाला घिऊन ईल तवा घर कसं आनंदानं डोलल वग ! '

धर्माच्या डोळ्यासमोर एक गोंडस बाळ दिसायला लागले. मल्हारवानं चंची काढली. तंबाकू डाव्या हातावर ठेवली. डबीतला चुना अंगठ्यानं नखलून घेतला. तंबाकूवर चोळला. तंबाकू अंगठ्यानं मळली. चिमटीत घेऊन गालफडात ठेवली आणि नातवाचा विचार करीत बसला. धर्मा आपल्याच नादात होता. चंद्रा गेल्यावर त्याला करमणार नव्हतं. मग तिला तिच्या माहेरी जाऊन भेटायचं का ? तसं भेटायला गेलो तर तिच्या माहेरची माणसं आपल्याला नावं ठेवतील का ? की बाईलवेडा म्हणतील ? काय करावं वरं ! अशा विचारात त्याची तंद्री लागली होती.

दारात गाडी थांबली. तसे दोघे भानावर आले. गाडीचा आवाज ऐकून चंद्रकला दारात आली. गाडीतून तिचा दादा भास्कर उतरत होता. त्याला पाहून ती हरकली. म्हणाली– 'आत्यासाव, दादा आला ! '

पार्वती दारात आली.

भास्कर म्हणाला– 'राम राम पावनं.'

धर्मा, मल्हारवानं रामराम केला.

मल्हारबा म्हणाले– 'वाडूळ वकत केलासा भास्करराव !'

'काय करायचं ! शेताकडं गेलु ततं वकत झाला. आनी घरच्यांचं काय लवकर आटीपतं व्हय !'

'तेबी बराबर म्हना' मल्हारबा बोलले.

बोलता बोलता भास्करनं गाडी सोडली. बैलांना सावलीत बांधलं. बुत्ती घेतली. घरात आला. पार्वतीसमोर आदबीनं बुत्ती ठेवली. म्हणाला– 'वकूत झाला बगा. दिस बुडायच्या आदी निगावं म्हनतू आटपलं तवर.'

बुत्ती सोडत पार्वती म्हणाली– 'आटपल की तवर !' बुत्ती बघून ती खूष झाली. दोन पितळी ताटं काढली. ताटात नीट बुत्ती काढली. घरोघर ही बुत्ती वाटायला जायची होती.

चंद्रकलानं तोवर दादासमोर तांब्या भरून ठेवला. त्याने तांब्या उचलला. चंद्रकलाकडं मायेनं पाहिलं. हातपाय धुऊन तो आला. पुन्हा चंद्रकलानं तांब्या भरून दिला. हाती गुळाचा खडा ठेवला. गूळपाणी घेऊन झालं.

पार्वती म्हणाली– 'कलाबाय, समदयास्नी जेवाय वाड. तंवर मी बुत्ती दिऊन येतू !'

आनंदात जेवणं झाली. धर्मा थोडासा गपगप होता. पार्वती आल्यावर दोघींनी जेवून घेतलं. मागचं काम आटपलं. तोवर बायका जमल्या.

भास्करनं गाडी जोडायला घेतली. चंद्रकलानं आपल्या कपड्यांचं गाठोडं बांधलं. भास्कर म्हणाला- 'आता निगायचं नव्हं ?'

चंद्रकला सासऱ्याच्या पाया पडली. सासूच्या पाया पडली. त्यांचा आशीर्वाद घेतला. आयावाया तिला निरोप देताना म्हणाल्या, ' वटीत बाळराजा घिऊन ये ग वाय !'

भास्करनं तिला हात देऊन गाडीत बसवलं. धर्मा एका बाजूला गपगप उभा होता. भास्कर म्हणाला-- ' येतू वं पावनं ! '

चंद्रकला ' येतू वं ' म्हणाली. जाताना तिनं धर्माकडं पाहिलं. त्या वेळी तिला वाटलं, धर्मा म्हणतोय्--' जाऊ नग चंद्रा !'

तिनं हळूच त्याला हात केला. गाडी चालू झाली. माहेरच्या वाटेला लागली.

सारजा वहिनीनं भाताचा मुटका घेतला. चंद्रकलावरून ओवाळून दोन दिशेनं टाकला. चंद्रकलानं माहेरच्या उंबरठ्यात पाऊल टाकलं. आता माहेरात ती नुसती चंद्रा होती. भावाची लाडकी बहीण होती.

सारजाला भास्करनं सांगून ठेवलं होतं-- ' माज्या भनीला आराम करू दे. म्हायारपनाला आलीया ती. ' त्यावर सारजा ठसक्यात म्हणाली होती-- ' व्हय वो, मला एवडपन कळंना व्हय. तुमची लाडाकोडाची भन हाय न्हव ! '

भास्करनं तिचा ठसका ओळखला. म्हणाला-- 'मला दोगीच भनी. दोगी माज दो डुळं हायती. हा आतड्याचा गुताडा हाय. माज्या भनीस्नी आय्-बाचं कांबरून न्हाय. मीच तेंचा आय-बा हाय. ध्येनात ठिव!'

सारजा गप्प बसली.

चंद्रा लहानपणापासूनच कामसू होती. भास्करदादावर तिचा जीव होता. मोठी वहीण लांब गावाला दिलेली. तिची सठी-मासी भेट व्हायची. माहेरपणाला कधीतरीच ती यायची. चंद्राचं लवकर लग्न झालं. लग्नात ती नऊ-दहा वर्षाची होती. चंद्राला खेळायला खूप आवडायचं. पण घरात आईच्या हाता-खाली काम करावं लागे. झटपट काम आटोपून ती खेळायची. तरी आई रागवायची. एक दिवस तिला गावची सोयरीक आली. नकातेवाडी अकोला (वासूद)ची वाडी. या अकोलाची सोयरीक चांगली होती. मंडळी खात्यापित्या घरची होती. स्वभावानं चांगली होती. मुलगा असेल पंधरा-सोळा वर्षाचा. तो देखणा होता. उमदा होता चंद्रा तर सुंदर होतीच. आईला जबाबदारी पार पाडायची होती. भास्कर म्हणत होता- 'अजून कुठं आपली चंद्रा मोठी झालीया. खेळू दे तिला. दोन-तीन वर्षांनी बघू तिच्या लग्नाचं.' तर आईचं म्हणणं पडलं- 'मला माझी जबाबदारी पार पाडू दे. पोरीला बाप नाही. माझं काय खरं नाही. सोयरीक चांगली आहे. लग्न उरकून घेऊ दे.'

आपलं लग्न होणार याचाच चंद्राला आनंद झाला. लग्नात लुगडं-चोळी मिळणार. बोरमाळ – टिक्का गळ्यात घालायला मिळणार. पायात चांदीचं साखळ्या आणि कानात झुब घाला-यला मिळणार. म्हणून तिला आनंद झाला होता.

लग्नात चंद्रा देखणी दिसत होती. तिच्या मैत्रिणींना तिचा हेवा वाटू लागला. एवढं नटायला मिळणार असलं तर आपलं लग्न झालं तर बेस होईल– असे त्यांना वाटू लागले. खुशीतच चंद्रा नव्या घरी आली. गावकऱ्यांनी नवी सून पाहिली. आया-

## २ :

अकोला ( वासूद )ची यात्रा होती. धर्माच्या घरी पाहुण्यांची गर्दी झाली होती. त्याचा चुलता-चुलती, दोन बहिणी, त्यांचे नवरे, मुलबाळ यानं घर भरलं होतं. धर्माला मात्र चंद्राची आठवण होत होती. ती असती तर? यात्रेला खूप मजा आली असती. चंद्राला फिरत्या पाळण्यात बसायला आवडे. ती पाळण्यात बसली असती. तो चक्रातील घोड्यावर बसला असता. आणि ती खुर्चीवर. मग चक्र गुरूगुरू फिरले असते. तिला तिच्या आवडीच्या वस्तू घेऊन दिल्या असत्या. तिला कंगवा, कुंकवाची डबी, आरसा पाहिजे होता. खरेदी झाल्यावर ताजी जिलेबी खाल्ली असती. जोडीनं खंडोबाचं दर्शन घेतलं असतं. पण चंद्रा नुकतीच माहेरी गेलेली म्हणजे. महिना झाला होता तिला जाऊन. आताच तिला बोलावता येणार नव्हते. तिचा भास्करदादा तिला घेऊन यात्रेला आला तरच भेट होईल– असा त्याने विचार केला.

यात्रेत पाहुण्यांबरोबर धर्मा फिरून आला. हळूच तो पुन्हा एकटा परत आला. यात्रेत फिरू लागला. त्याचेपाशी चंद्राची एक बांगडी होती. खुंटीला टांगलेली होती चंद्राने. त्या मापाने त्याने लालभडक, सुंदर बांगड्या घेतल्या. आरसा, कुंकवाची डबी, कंगवा घेतला. यात्रेत तो भिरभिर फिरला. चंद्रा किंवा भास्कर कुणीच त्याला दिसले नाही. तो निराश झाला. घरी निघाला. तोच पाठीमागून कोणीतरी थाप मारली. दचकून त्याने वळून पाहिले. धिप्पाड राम उभा होता. मिश्यांवरून हात फिरवत

'हा: हा:' करत तो हसत होता. राम नकातेवाडीचा. तो म्हणाला– 'काय पावनं, एकलच यात्रा फिरतायसा ?'

धर्मा हसून म्हणाला– 'आमची मंडळी हायती आपल्या म्हायेरात. मंग कुनाबरोबर यात्रा फिरावी ?'

राम पुन्हा गाल भरून हसला. म्हणाला– 'चला, आपुनच हिंडूया.'

दोघं पुन्हा यात्रेत भटकले. बोलता बोलता त्याला कळले. भास्कर यात्रेला आला नाही. रामबरोबर त्याने देवाला नैवेद्य पाठविला होता. त्याच ऐनवेळी काहीतरी काम निघालं. धर्माने ताजी जिलेबी घेतली. बाकीच्या वस्तूच एका पुडकं केलं. पुडकं आणि जिलेबी रामपाशी दिली. चंद्राला द्यायलां सांगितलं. गडगड हसत राम म्हणाला– 'पावन्यास्नी मी बरा बकरा सापडलू. बर ! काय सांगावा सांगावा आमी चंद्राक्काला?'

धर्मा हसून म्हणाला– 'मग आमी यावं का वाडीला ? तुमीच म्हनाल–काय जावाय हाय. चार दिस बायकू येऊन झालं नाय् तवर हजर ! ह ! सांगावा तसा न्हाय. म्हणावं आमी समदी बेस हावोत. सोताची काळजी घ्या. बास !'

जोरात हसून रामने सांगावा देतो म्हणून सांगितलं. रामराम करून गेला. धर्मा घरी परतला. तशी पार्वती म्हणाली– 'कुटे हुतास रं बाबा ? दिस कलायला लागला.'

धर्मा म्हणाला– 'यात्रंत मैतर भेटला.'

पार्वती म्हणाली– 'वाडीचं कुनी पावनं भेटलं का ?'

धर्मा उत्तरला– 'न्हाय बा ! त्येंचं कुनीच आलं न्हाईत !'

पार्वती म्हणाली– आवंदा माजी कला न्हाय यात्रला. ग्वाड न्हाय वाटलं. तिच्यावगार घराला कळा न्हाईच!'

धर्मा मनातच म्हणाला– 'खर हाय आये. तिच्यावगार घराला सोभा न्हाई.'

झोपताना यंदा यात्रा कशी जोरात भरली याची चर्चा झाली. मल्हारबा म्हणत होते– 'आवंदा पीकपानी बेस हाय. मानसापाशी पैका हाय. म्हनूनश्यान यात्रंत मानूस माईना.' भावाभावाच्या गप्पा रंगल्या. जावई– जावई बोलत होते. धर्मा तेवढा मनात म्हणत होता– 'चंद्रा बाळाला घेऊन येईल तवा मी खूष व्हईन. माजा बाळ कसा गोमटा असेल.' बाळाचा विचार करीत तो झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी जो तो आपल्या कामी लागला. रात्रीच्या आमटी-पोळीची न्याहारी पोटात जाम होती.

राम वाडीला पोहोचला. 'भास्करदादा, भास्करदादा' करत त्याने खच्चून हाका मारल्या. भास्कर गडबडीनं बाहेर आला. हसत त्याने भास्करला देवाचा भंडारा दिला. म्हणाला-'वाईच चंद्राक्काला बोलीव !'

भास्कर म्हणाला-'का बा ?'

गडगड हसत म्हणाला-'त्येंचा पेशल सांगावा हाय.'

'आसं का !' म्हणत त्याने चंद्राला हाक मारली. चंद्रा दारात येऊन उभी राहिली. तिच्या हाती पुडकं दिलं. म्हणाला– 'चंद्रक्का, आमच्या जावयाचा सांगावा हाय. अगदी पेशल !'

चंद्रा लाजली. मनात म्हणाली-'काय बाय यास्नी म्हनावं !'

राम सांगत होता-'जावई म्हनालं-त्येस्नी म्हनावं आमी बेस हाव. सोताची मातर काळजी घ्या. आन् ही जिलेबी पोटातल्या लेकराला उरलेला सांगावा सांगल !'

चंद्रानं लाजून तोंडावर पदर ओढला. घरात गेली. 'आवं चंद्राक्का, ही जिलेबी घ्या की !' राम हसत म्हणत होता. तिकडे तिने लक्ष दिले नाही.

भास्कर कौतुकाने हसला. त्याने जिलेबीचे पुडके सोडले. रामच्या पुडे पुडके केले. त्यातील एक कडे त्याने उचलले आणि जाण्यासाठी निघाला.

भास्कर ते पुडके घेऊन आत आला. चंद्रा अजून लाजून बसली होती. तिच्यापुढे पुडके ठेवले. ती म्हणाली-'संमदयांनी घ्या अगुदर. मग मी घेते.'

भास्कर थट्टेनं म्हणाला–'पेशल तुझ्यासाठी पाठवलीया!

'असू दे. तुमी आदी खावा!'

'वर बाबा !' म्हणून त्याने जिलेबी घेतली. चंद्राने दोन तुकडे आपल्यासाठी घेतले. सारजापुढे पुडा केला आणि तिला घ्यायला सांगितली.

अजून तिच्या हाती दुसरे पुडके होते.

सारजा म्हणाली- 'त्यात काय हाय दिवाणसाव?'

चंद्राने पुडके सोडले. कंगवा, कुंकवाची डबी, आरसा, ललभडक बांगडया पाहून ती खूष झाली. ही नवऱ्याची माया काळजात ठसली.

त्या वस्तू पाहून सारजाला हेवा वाटला. ती भास्करला म्हणाली-'वगा ! पावनं किती हौशी हायती. न्हाय तर तुमी ! तुमास्नी वायकूला कायबी आनाया नकू असतं !'

भास्कर गडबडीनं उठला. म्हणाला—'हौस नाय कशी? पर हाताला सवड घावाय नकू?'

सारजानं रागानं नाक उडविलं. चंद्रा गप्प वसली.

दुसऱ्या दिवशी चंद्रा लवकर उठली. अंघोळ आटोपून पुढ्यात आरसा घेऊन वसली. केस विंचरले. कपाळाला मेण लावलं. डबीतलं कुंकू चिमटीत घेतलं. ते मेणावर गोल गोल पसरू लागली. कुंकू लावून झाल्यावर हाती आरसा घेऊन चेहरा निरखला. लाल लाल रुपयाएवढं कुंकू तिच्या कपाळावर शोभत होतं—नुकत्याच उगविलेल्या सूर्यासारखं !

सारजा चंद्राची हालचाल निरखत होती. आपल्यापाशी आरसा-कंगवा नाही याचं तिला वाईट वाटत होतं. भिंती सारवताना तिनं आरशाचा एक तुकडा रोवला होता. त्यावर तिला आपली वेणी कुंकू करावं लागे.

चंद्रानं बांगड्या हाती घेतल्या. त्यांवरून हात फिरवला. त्यांचा मंजुळ किणकिणा होऊ लागला. म्हणाली—'माज हात लई मोठं हायती. कासाराकडनं बांगड्या चडवल्या पाहिजेत.' म्हणून बांगड्या ठेवून दिल्या. आज ती फारच आनंदात होती. सायंकाळ केव्हा झाली हेही कळले नाही. दुसऱ्या दिवशीपण ती आपल्याच नादात होती. रात्र झाली. भास्कर जेवायला वसला. तुकडा तोडून तोंडात घातला, तोवर हाक आली-'भास्करराव, अहो भास्करराव!'

चंद्रा वाहेर आली. म्हणाली—'कोन हाय?'

'मी लखा हाय.'

चंद्राने त्याला ओळखले. तो त्यांचा सासरचा शेजारी. पण वैरी होता. हा इथे कसा ? तिला काळजी वाटली. रिवाज म्हणून ती म्हणाली– 'या की व !'

लखा म्हणाला– 'मी घरात न्हाय येत. गडबडीत हाय. जरा भास्कररावास्नी बोलवा. काम हाय !'

आता कसलं काम हाय जनू पुटपुटत ती आत आली. भास्करनं थाळी बाजूला सारली. उठला. बाहेर आला. 'काय वं पावनं ?' विचारलं.

लखानं त्याला बाजूला घेतलं. काहीतरी सांगितलं आणि लगोलग निघून गेला.

भास्कर घरात आला. त्याचा चेहरा उतरला होता. सारजा, चंद्रानं विचारलं, 'काय लखा म्हणत होता म्हणून.' तरी भास्कर गप्प होता. चंद्राचं मन भीतीनं घेरलं.

सारजा म्हणाली, 'आदी नीट जेवा बगू ! भरल्या थाळीचा अनमान करू नका !'

पाण्याचा घोट घेत त्याने घास ढकलले. म्हणाला– 'तुम्ही दोगी जिऊन घ्या.'

त्याने बैलं बाहेर काढली. गाडी जुंपली. दोघींनी कसंबसं जेवण आटपलं. सारजा दारात आली. म्हणाली, 'आवं इक्त्या रातचं गाडी जुपून कटं जातासा ?'

भास्कर चिडला– 'इचारलंस ?'

चद्रा काळजीनं उभी होती. भास्कर शांत होत म्हणाला– 'वाईच गावात जाऊन येतु. काम हाय माजं. माजी काळजी करू नगासा.' आणि कंदील गाडीला लावला. बैल हाकले.

दोघी या अचानक जाण्यानं काळजीनं बेजार झाल्या. दोघी झोपायचा प्रयत्न करू लागल्या.

० ० ०

## ३ :

भास्करची गाडी गावात पोहोचली. त्याचे मन भीतीने भरले होते. काळजी तर होतीच. रस्ताभर त्याचे मन थाऱ्यावर नव्हते. पाहुण्याच्या घरासमोर गाडी थांबवली. हाक दिली– 'पावनं, अवं पावनं!'

कोणीच हाकेला उत्तर दिलं नाही. गाडी न सोडताच तो दारापाशी आला. दारावर नुसता धक्का दिला. दार उघडले. हातात गाडीचा कंदील होता म्हणून बरे. घरात दिवा लावलेला नव्हता. कंदिलाच्या प्रकाशात त्याला दिसले ते भयानक होते. तो हबकून गेला.

घरात दुर्गंधी पसरली होती. सगळे वेडेवाकडे पडले होते. कुणीच भानावर नव्हते. या खोलीत सगळी पुरुष मंडळी होती. धर्मा, मल्हारबा, त्याचा भाऊ, दोन जावई, एक पोर भान हरपून पडले होते. भास्कर स्वयंपाकघरात गेला. उंबऱ्याच्या बाजूला तो कशाला तरी अडखळला. ते धर्माच्या बहिणीचे लाडके पोर होते. लाल्या म्हणत त्याला. भास्कर खाली वाकला. लाल्याला उचलले. त्याचे हातपाय लुळे पडले. मान लडवडली. तसे भास्करच्या काळजात धस्स झाले. पोर केव्हाच देवाघरी गेले होते. लाल्याला बाजूला ठेवले. बायका पण अस्ताव्यस्त पडल्या होत्या. पार्वती, दोन लेकी, जाऊ बेसुध पडल्या होत्या. कपड्यांची शुद्ध कोणाला नव्हती. नेहमी पदर सावरत उभ्या राहणाऱ्या या लेकी–सुनांना पाहून त्याला वाईट वाटले. घरात ही काळीज फोडणारी अवस्था पाहून भास्करचे पाय

लटपटू लागले. तो मटकन खाली वसला आणि रडायला लागला. मनसोक्त रडला. मग निर्धाराने उठला. सगळ्यांना त्याने नीट पाहून घेतले. लहान पोरे एकूण चार होती, ती केव्हाच देवाघरी गेली होती. वायकांपैकी धर्माची चुलती, काकी हिच्या अंगात जरा धग होती. पुरुषांपैकी धर्मा, मल्हारवा एक जावयाच्या अंगात धग वाटत होती. वारलेल्या मंडळींना त्याने एका वाजूला केले. त्यांचेवर वाकळ झाकली. उरलेल्या चौघांना वाजूला घेतले. तसाच तो वाहेर आला. शेजारी गेला. लखाला हाक मारली. कोणी ओ देईना. पुन्हा पुन्हा तो हाक मारू लागला. लखाचा म्हातारा वाहेर आला. कातावून म्हणाला– 'कोण ? '

'मी वाडीचा भास्कर हाय !'

'काय म्हनता ?'

'जरा वाईच तुमी आन् लखा येतासा का ? तकडं घरात लई वंगाळ झालंया !'

'आमी कुनी येनार न्हाय.'

'अव पर...'

'हे वगा, आमी कुनी येनार न्हाय. आज गावकरीवी कुनी येनार न्हाईती. समदी घावरून घट्ट झाल्याती. दारं लावून वसल्याती. महामारीचा फेरा आलेला दिसतुया. कोन आगीत हात घालाय येईल. पावनं, तुमचं तुमी निस्तारा.'

'आवं माजं ऐका तरी....'

'काय न्हाय ऐकायचं. तुमी जावा. काल सकाळधरन आसं चाललंया. जो तो उलटयानं बेजार झाला आन् परसाकडं जाऊनश्यान हवकून गेलेला वगीतला आमी. गावात ह्येच यवडं घर आजारानं बेजार झालंया. कोन ही वला आपल्या घरात घेऊनश्यान येईल. तुमी जावा.' आणि म्हाताऱ्यानं धाडकन् कवाड लावलं.

भास्कर खाली मान घालून घरात आला. आता कुणाची मदत घ्यायची? प्रश्न पडला. पुन्हा वाडीला जाऊन रामला बोलवायचे तर इथं या लोकांना टाकून जाववेना. एकदम त्याच्या घशाला कोरड पडली. आत गेला. पाण्याचा हंडा वघितला. पिण्यासारखे पाणी नव्हते. त्याने घागर घेतली. दोर घेतला. तेवढ्या रात्री पाणी आणायला विहिरीवर गेला. मरणाऱ्याच्या मुखी घालायला तरी पाणी पाहिजे होते. एक घागर पाणी काढले. हातपाय तोंड धुऊन घेतले. घटाघट पाणी प्यायला दुसरी घागर काढली. एका खांद्यावर दोर, दुसऱ्या खांद्यावर घागर, हाती कंदील घेऊन आला. एक तांब्या स्वच्छ घासला. पाणी भरून घेतलं. एक फडकं शोधलं. ते ओलं करून घेतलं धीर करून तो धर्मापाशी आला धर्माचं तोंड ओल्या फडक्याने पुसलं हलकेच हाक मारली 'भाऊजी, अवं भाऊजी!'

धर्मानं मोठ्या प्रयासानं डोळे उघडले. परत मिटले. पुन्हा त्याने हाक मारली हलकेच पाण्याचा घोट तोंडात टाकला पाण्याच्या घोटाने धर्माला वरे वाटले. पुन्हा धर्माला पाणी पाजले. धर्माला हुशारी आल्यासारखी वाटली. हळूहळू त्याने

डोळे उघडले. समोर भास्कर दिसला. त्याला पाहून धर्माला बरे वाटले. भास्कर आनंदाने म्हणाला– 'भावोजी, बरं वाटतंया का वाईच !'

धर्मा कसावसा हसला. म्हणाला– 'पावनं, यातून मी काय वाचत न्हाय्. आता तुमीच माजा वंश वाडवा. चंद्राला मी तुमच्या वटीत टाकतू.'

धर्माचे हे बोल ऐकून भास्करच्या डोळ्यात पाणी आले. 'भाऊजी, काळजी करू नगासा!' तोवर धर्माची शुद्ध गेली. हवालदिल होऊन तो मल्हारबाकडे वळला. त्याचे तोंड स्वच्छ केले. पाण्याचा घोट दिला. मल्हारवाने डोळेसुद्धा उघडले नाहीत इतका तो क्षीण झाला होता. धर्माचा चुलता, भावोजी, काकींना तोंड पुसून पाणी पाजण्याचा प्रयत्न केला. काकी पाणी देताच सावध झाली. भास्करला पाहिलं. त्याचा हात हाती गच्च धरला. तिच्या डोळ्यांतून टपाटपा पाणी गळायला लागलं. भास्करचा चेहरा अश्रूंनी भरला होता. पाच मिनिटांत काकीचा हात लुळा पडला.

रात्रभर भास्कर धर्मा, मल्हारबा, चुलता, जावई यांचेकड लक्ष देत होता. हाक मारून सावध करायचं पाहात होता. पण एकएक करीत सकाळपर्यंत सगळे मरून गेले.

सकाळ झाली. भास्कर लापटपणे गावकऱ्यांपाशी गेला. म्हणाला– 'घरात एक बी जीता न्हाय. गावकऱ्यान् आता तरी मदत करा. त्यांची शेवटची येवस्था कराय पायजे.'

गावकरी धास्तावले होते. एकाच घरात असे का व्हात्रे? हा प्रश्न उलगडत नव्हता. प्रत्येकाला वाटत होतं–'विषबाधा

झाली असल. न्हायतर महामारी असल. त्यो फेरा अपनाकडं नकू यायला !'

ते सगळे माणुसकी विसरले होते. घाबरले होते. म्हणाले– 'ह्ये वगा पावनं. आमास्नी भ्या वाटतंया ! तुमीच आपली पुढली येवस्ता वगा. आमास्नी यात गुंतवू नगा !'

हे स्पष्ट बोलणे ऐकून भास्कर सुन्न झाला. त्याने विचार केला. हा प्रकार पाहून वाडीतला पण कुणी मदत करणार नाही. एकटयाने एवढया मुडद्यांना मूठमाती द्यायची तरी कशी ? लाकूडफाटा किती तरी लागणार ?

भास्कर महारवाडयात गेला. त्यांना मदत मागितली. महारवाडयात ही बातमी गेली होती. ते पण घाबरले होते. म्हातारा सखा पुढे झाला. म्हणाला– 'ऐकलं आमी समदं. लई वंगाळ झालं !'

'व्हय ! पर पुढची येवस्ता कराय पायजे !'

'ते बी खरंच ! पर एवडा लाकुडफाटा कुटनं मिळावा?'

भास्कर गप उभा होता. सखा पुढे म्हणाला, 'पावनं माजं ऐका ! मुडदयास्नी मूठमाती द्या !'

'पर खड्डं काढाय नकू !'

'व्हय !'

'मी एकला हाय!'

'व्हय !'

'म्हनूनश्यान.'

सखा म्हणाला– ‘ हा ! समाजलं ! माज्या मानसास्नी नदीकडं खड्डं काढाय पाठवतू ! तुमीबी वाईच मदत करा. आन् गाडून टाका समद्यास्नी ! काय कराचं येळंला !’

भास्करला या मदतीनं हायसं वाटलं.

सखाने आपला बोल खरा केला. मदतीला धावला. खड्डे काढून तयार ठेवले.

भास्कर परतला. गाडी जुंपली. एक एक करून सगळ्या मुडद्यांना गाडीत रचलं. नदी किनारी आला. आता त्याच्या डोळ्यात पाणी नव्हतं. वेळप्रसंगी कुणी मदत करीत नाही. अपवाद केला या महार मंडळींनी. मुडदे गाडून झाले. त्याबरोबर आपण माणुसकीपण गाडतो आहोत असे त्याला वाटले.

हे सर्व झाल्यावर त्याला चंद्राची आठवण झाली. तिला आता काय सांगायचं ? सारे घरच या यात्रेने लुटून नेलं होतं. तिला सासरच उरलं नाही. आता आपणच तिचा आधार. भावोजींनी सांगितल्याप्रमाणे त्यांचा वंश संभाळायचा.

पहाटे त्याने गाडी वाडीकडे वळवली. श्रमाने, काळजीने दमलेला भास्कर गाडीत झोपला. त्याचे लाडके हण्यां–सर्जा मालकाचे ओझे अलगद खांद्यावर संभाळून घराकडे निघाले आणि घरापुढे येऊन दोघे थांबले.

गाडीचा आवाज ऐकून सारजा बाहेर आली. गाडीतच नवरा झोपलेला पाहून ती चकीत झाली. म्हणाली–

‘ आता या आक्रीताला काय म्हनू ? ’

त्या आवाजासरशी भास्कर जागा झाला. मुकाटयाने त्याने गाडी सोडली. अजूनपर्यंत बैलांना वैरणकाडी मिळाली नव्हती. बैलं समजूतदार होती. मालकाचं दु:ख ओळखून गप्प होती. पहिल्यांदा त्याने बैलांना वैरण टाकली. सारजाला म्हणाला– ‘त्यास्नी पानी दाव आदी ! ’

नवऱ्याचा अवतार पाहून सारजाने काही विचारले नाही. मुकाटयाने पाणी आणायला गेली.

चंद्रा अंघोळ करत होती. भास्कर आलेला तिला कळले होते. साडी नेसून तिने आरसा, कुंकवाची डबी हाती घेतली.

भास्कर आत आला. चंद्रा म्हणाली– ‘ दादा, इक्तं कसलं रं काम हुतं! आमास्नी लई काळजी लागली व्हती ! ’

बोलता बोलता तिने मेण कपाळावर लावले. चिमटीत कुंकू घेतलं. आता ती कुंकू कपाळावर लावणार तोच भास्कर भानावर आला. भरल्या आवाजात म्हणाला– ‘ चंद्रा, माजे बये, थांब! कुकू लावू नगं ! ’

चंद्रा थबकली. भास्करकडे बघू लागली. त्याचा चेहरा पाहून धास्तावली. भास्कर म्हणाला– ‘ चंद्रा ग ! तुज्या कुकवाचं रिण सरलंग ! ’

सारजानं हे शब्द ऐकले. ती मटकन् खाली बसली. मग स्वत:ला सावरले. चंद्राला मिठीत घेतलं आणि गळा काढून रडू लागली. तेव्हा कुठे चंद्राला कळलं–आपला नवरा या जगात नाही. तेव्हा ती बेसुध झाली.

० ० ०

## ४ :

चद्राला मुलगा झाला. भास्कर आनंदला. धर्मा मेल्यापासून चंद्रा उदास होती. अवघं पंधरा-सोळाव्या वर्षी ती विधवा झाली. नवरा गेला. सासू-सासरे गेले. सासरची जवळची सारी माणसे गेली. ती दु:खी झाली. तिला वाटे, सगळी वारली. मग आपण तरी कशाला जगायचे ?

भास्कर तिची काळजी घेई. तिला समजावून सांगे. पोटा-तल्या मुलासाठी जगायचं, हे सांगे. धर्माने तुझी, बाळाची काळजी घ्यायला सांगितली आहे– याची आठवण तो देई. चंद्रा आपली रडत राही. मुलगा झाला म्हटल्याबरोबर भास्कर आनंदित झाला.

चंद्राला भास्कर म्हणाला– 'चंद्रा, माज्या वये, ही तुजी दौलत. ह्यो मुलगा तुजी दौलत हाय. तुज्या घरान्यातली एकुलती एक दौलत सांभाळाया होवी. आन् माज्या भनीची दौलत संभाळणारा राकनदार म्या हाय्. मी तुज्याबरुबर हाय्. पर तू आदी ही दौलत संबाळणारी घट पायजेस. रडून भागायचं नाय् ! '

चंद्राच्या बाळाचे बारसे असे झाले. चंद्रा बाळाला दौलत, दौलती, दौलू असं म्हणू लागली. हाक मारू लागली. चंद्राचा दौलत दिसामासांनी वाढू लागला. रांगू लागला. उभा राहू लागला, चालू लागला. हसू डुलू लागला. आय, मामा म्हणू लागला. घरातलं त्याचं दुडदुडणं कसं आनंदाचं होतं. मामा भाच्यामागे पळता पळता दमू लागला. हसू लागला. सारजाही त्याच्या

बाललीलांनी भुलून गेली आणि तिला खूप वर्षांनी मुलगी झाली. दौलता पाठोपाठ सारजाची लक्ष्मी त्या घरात खेळू लागली. भास्करचा आनंद वाढला.

भास्करला पोरे व्हायची. पण जगायची नाहीत. मूल मेलेलेच जलमलेले असायचे. लक्ष्मी मात्र जगली. मामा खूष झाला. सारजाला स्वर्ग दोन बोटे उरला

सारजाला हळूहळू चंद्राचा राग येऊ लागला. ही आता कायमची राहणार. शिवाय सासरच्या सुतळीच्या तोड्यावर चंद्राची सत्ता राहिली नाही. कारण मल्हारबाची स्वत:ची दोन एकर जमीन होती. ती पण सावकाराकडे घाणवट पडली होती. बाकी दुसरी शेती ते खंडानं करायचे. या शेतमालकानं आपली शेती मल्हारबाच्या मागे लगेच दुसऱ्याला कसायला दिली. आणि घरातली भांडीकुंडी, जनावरं ताब्यात घेतली. धर्माच्या लग्नासाठी त्याने पैसे कर्जाऊ दिले होते. त्याची फेड करून घेण्यासाठी. भास्कर बहिणीच्या दु:खात होता. तोवर या साऱ्या भानगडी झाल्या आणि चंद्रा कफल्लक झाली.

चंद्राला तिच्या दादाशिवाय कसलाच आधार उरला नाही आणि हेच सारजाला डाचत होतं. आता एकाला दोन सांभाळावी लागणार होती. तिचा संसार वाढणार होता. त्यात या जबाबदारीची भर पडली. सारजाला वाटे— हे उगरे हक्कदार माझ्या घरात कशाला ? आपल्याला तर कुठे भरमसाट शेती आहे. तीनचार एकरांत कसं भागावं ? वरं शेती तर बागायती आहे का ? नुसती जिरायती होती. आणि एका माणसाला काय लागत नाही. कपडालत्ता पाहिजे. भाकर-तुकडा पाहिजे. तेलपाणी पाहिजे. सगळं पाहिजेच. यामुळे सारजा चंद्राचा राग करू लागली.

दौलत, लक्ष्मी मोठे होत होते. भास्कर दोघांवर खूप माया करी. त्यांचे लाड करी. त्यांच्याशी हसे, खेळे आणि सारजाला वाटे, भास्करने फक्त आपल्या लेकीचे लाड करावेत. तिच्याशीच खेळावे. हसावे. हा दुसरा कशाला माझ्या पोरीच्या मायेत भागीदार होतो आहे. हळूहळू सारजा धुसफुसू लागली. पण भास्कर नसताना.

दौलत चार वर्षांचा झाला होता. लक्ष्मी दोन वर्षांची. आणि पुन्हा सारजाला पोर होणार होतं. चंद्राने स्वत:ला कामात गुंतवून ठेवले होते. पहाटे दळण दळण्यापासून तो रात्री चुलीला पोतेरा देण्यापर्यंत ती काम करी. मगच ती अंथरुणाला पाठ लावी. शेतातसुद्धा ती भास्करला मदतीला जाई.

भास्करचा घरातील खर्च वाढला. माणसं वाढली होती. त्याची ओढाताण होऊ लागली. तो खूप आटापिटा करी. घरखर्च चालविण्यासाठी शेतकऱ्याजवळ रोकड पैसे कुठले असायला? पैसा लागायचा तेल–मीठ आणायला. कपडा आणायला. मजुरांची मजुरी द्यायला. नाहीतर मजुरी धान्याच्या रूपात द्यावी लागे. आता सारजाच्या बाळंतपणाचा पुन्हा खर्च आला.

या खेपेला सारजाला मुलगा झाला. वंशाचा दिवा घरात आला. भास्कर आनंदित झाला. सारजा तर आनंदात न्हाऊ लागली. चंद्राने आनंदाने बाळाचे सारे काही करण्यासाठी कंबर कसली. तिच्या दादाला मुलगा झाला. तिच्या माहेरात दीप उजळला. याचे तिला कौतुक होते.

बाळाचे बारसे दणक्यात करायचे सारजाने ठरविले. भास्करच्या घरी कितीतरी वर्षांनी हा आनंद सोहळा होणार होता. त्यासाठी सावकाराकडून कर्ज काढावे लागले.

चंद्रा घरात दिवस-रात्र रावत होती. पण बारशाचे दिवशी मात्र तिला चुलीपाशी तोंड दडवून राहावे लागले.

सरजाची आई म्हणाली, 'चंद्राबाय तुम्ही आपलं चुलीपाशी बसा. काय लागलं सवरलं तर द्या.'

आपले पांढरे कपाळ घेऊन आपण बाहेर येऊ नये ही त्यांची इच्छा आहे हे चंद्राने ओळखले. तिला खूप वाईट वाटले. सारजाचे बाळंतपण तिनेच केले होते. तेव्हा तिचे पांढरे कपाळ अशुभ नव्हते.

दौलत आनंदाने इकडे तिकडे मिरवत होता. त्याला पाहून सारजाची बहीण म्हणाली–'बग आये! पांढरं पायाचं कसं मिरवतंय्'

हे ऐकल्यावर चंद्राचे मन धस्स झाले. इथून पुढं आपलं काही खरं नाही. दौलतचा, आपला रागराग होणार. हे तिला दिसू लागले. तिने दौलतला हाक मारली–'दौलत!'

'काय आय् !' म्हणत दौलत पळत आला. तिच्या गळी पडला. आईचं गोंजारणं त्याला आवडायचं

'दौलू, माजं ऐकतूस?'

'हं !'

आपली शेरडं घिऊन जातूस? त्यांना पाला खाऊ घाल जा!'

'मी नाय जा. आज घरात लई काय काय ग मजा हाय. बाळ कसं साजरं दिसतंया ! आमी बाळाला झोका देनार हाव!' दौलत कुरकुरत म्हणाला.

चंद्रा म्हणाली–'शेरडास्नी खायला पायजे की नाय?'

'होय. पायजे. त्यास्नीबी भूक लागत असलच की!'

'आनी तुजा मामा आज गडबडीत हाय का नाय?'

'व्हय् हाय्!'

'मग शेरडास्नी कोन चराय नेनार?'

'व्हय् की!'

'मंग जातूस? मंग तू माघारी आल्याव तुला खायला देईन!'

शहाण्यासारखी दौलतने मान डोलावली. चंद्राने शेरडं सोडली. दौलत शेरडं घेऊन निघाला. शेरडं टणाणा उड्या मारीत निघाली. त्यांच्यापाठी थिर्रं ऽथिर्रं ऽ करत तो पळाला.

दौलत दिसेनासा झाला. चंद्रा स्वयंपाकघरात आली.

थोड्याच वेळात भास्कर आला. तो बाजार करून आला होता. आल्या आल्या त्याने हाक दिली–'चंद्रा, चंद्रा!' चंद्रा उंबरठ्याजवळ आली तोवर भास्करला पाहुणीबायांनी वेढा घातला. काय काय बाजार केला, हे त्यांना पाहायचे होते. भास्कर गाठोडे सोडत होता. चंद्राला उंबरठ्यात पाहून तो आनंदाने म्हणाला–'ये ग हकडं! वग तरी पोराला काय काय आणलंया–'

चंद्रा म्हणाली–'आदी पावन्यास्नी दावा की! मी कुटं जानार हाय! मंग वगतू की! जरा वाईच घुगऱ्या शिजत घातल्यात; त्या वगतू आदी!'

भास्कर म्हणाला–'असं व्हय! बरं!'

तोवर गाठोड्यातील एक एक वस्तू चाचपायला बायकांनी सुरुवात केली होती. वस्तू हाती घेऊन निरखणं चालू होतं.

पोराला चांदीचे वाळे आणले होते. ते सुंदर होते. घुंची, अंगडं टोपडं रंगीबेरंगी होतं. छान होतं. सारजानं लुगड्याच्या घड्या पाहून विचारलं–' कुना कुनाला लुगडी आणलीया.'

भास्कर एकएक लुगड्याची घडी घेऊन सांगू लागला. 'ही तुला. ही मामीस्नी. ही तुज्या आक्कासाठी. ही चंद्रासाठी .'

चंद्राला लुगडं आणलेलं पाहून साऱ्यांचे चेहरे उतरले. सारजा म्हणाली–'त्यास्नी कशापाई लुगडं आणलं. खरचात खरच निस्ता!

तिचा स्वर लक्षात न घेता भास्कर म्हणाला-'खरचात खरच निबतुया. तिला आता धडुती घेयाला पायजे हुता.'

लक्ष्मीचा झगा चांगला होता. झगा घालून लगेच तिनं मिरवायला सुरुवात केली.

हातात शर्ट–चड्डी घेऊन भास्कर म्हणाला– ' दौलू कुटं दिसना ! ' तसाच तो स्वयंपाकघरात आला. चंद्रापुढं ते कपडे करत म्हणाला– ' ह्ये बग, दौलूसाठी आनलया. कुटं गेलाय त्ये ! '

भास्करची माया पाहून चंद्राला भरून आलं. म्हणालीयेईल–' इक्त्यात . शेरडं घिऊन गेलाय् ! '

भास्कर म्हणाला– ' आज कशापाई जाऊ दिलं त्येला ? '

' आरं मुकं जीव ते ! त्यास्नी एका जागी कुटवर वांधून ठिवायचं ? '

बाहेरनं हाक आली म्हणून भास्कर गेला.

वायका जमू लागल्या. बाळाला पाळण्यात घालायचा कार्यक्रम सुरू झाला. नाव आक्कानं–सारजाच्या बहिणीनं ठेवलं.



शा.ग्रा.

‘श्रीपती’च्या नावानं कुर्र ऽऽर्र ऽ चा आवाज झाला. मागोमाग पाठीवर धपके मारायचा आवाज झाला घुगऱ्या वाटल्या. बारसं झालं.

चंद्रा स्वयंपाकघरात बसून होती. लागेल ते सामान काढून देत होती. गावातल्या बायका म्हणाल्या–‘चंद्रा काय दडी मारून बसलीया जनू! ’

सगळ्या बायका घरोघरी गेल्या.

दौलतनं शेरडांना फिरवून आणलं. बांधून ठेवलं. बाळाच्या पाळण्याकडं आधी पळत आला. बाळ नव्या नव्या कपड्यात सजलेला पाहून आनंदला. म्हणाला– ‘मामी, बाळ काय ग साजरं दिसतया ! ’

मामीनं रागानं तोंड फिरवलं. सारजाची आई झटक्यात उठली. पुटपुटली–‘पोराची दिठ काढतू बाई ! काय सांगावं कुनाची कशी दिठ असतीया ती ! ’

दौलतला काही कळलं नाही. तो पळतच चंद्रापाशी आला. म्हणू लागला– ‘आये, बाळ कसं साजरं दिसतं, चल. बग चल ! ’

चंद्राला बाळाचं रुपडं पाहायचं होतं. त्याला झुलवायचं होतं. पण आज पोराला घेतलेलं सारजाला आवडतं का नाही हे कळेना. ती आपली गप बसली.

भास्करचा आवाज आला. तसा दौलत उड्या मारीत मामापाशी गेला. भास्करनं त्याला मायेनं मांडीवर बसवलं. म्हणाला–

'इक्ता येळ कशापाय हिंडलास रं! वाईच आदी यायचं! आमी तुमास्नी काय आणलंया, बगीतलं का!'

आपल्याला आता डबोलं मिळणार असा दौलतला आनंद झाला. लाडाने तो म्हणाला– न्हाय बगीतलं! तूच दाव वा मामा काय आनलं त्ये!'

'आरं, तुज्यासाठी नवी पैरण– चड्डी आणलीया!'

'कुटाय्?'

'चल दावतू. लगी घालून दाव चल!'

भास्करने दौलतला कपडे चढविले. दौलत कसा साजरा–गोजरा दिसत होता. दौलतीला बाळसं चांगलं होतं. गोरागोमटा होता. डोळे पाणीदार होते. देखणा होता तो! नव्या कपड्यात त्याचे रूप खुलत होते. भाच्याचं रुपडं पाहून मामा खूष झाला. कौतुकाने त्याने दौलतचा मुका घेतला. दौलत लाजला. आई-मामी-लक्ष्मीला कपडे दाखवायला पळाला. चंद्रानं त्याचा आला-वला घेतला. मुका घेतला. जेव्हा सारजा आणि पाहुण्यावायांचं रागीट चेहरें पाहिले, तशी ती खजील झाली. तिच्या मनात पाल चुक-चुकली. ती स्वत:ला म्हणाली–' चंद्रे, संबाळ बये! ,तुजा या घरातला शेर कमी होतूया!'

० ० ०

## ५ :

हळूहळू सारजा उघड उघड धुसफुस करू लागली. आमच्या 'राशीला लागलायसा' म्हणू लागली. बारशाला तिला आपल्या बहिणीबरोबर साडी–चोळी घेतल्याचा राग आला होता. शिवाय भास्कर चंद्रा–दौलतीवर जीव टाकतोय हे तिला सहन होत नव्हते. कायम संभाळायला लागणाऱ्या माणसांचं कसलं कौतुक करायचं बाई– असे तिचे म्हणणे होते. म्हणून ती आता उघड रागावू लागली. दौलत 'शिरपती शिरपती' करत बाळाला घ्यायला लागला तर ती त्याला घेऊन देत नसे. दौलत हिरमसून बसे. लक्ष्मी मात्र त्याच्याबरोबर खेळत असे. ती त्याच्या पाठी असे. याचाही सारजाला राग येई. मग कधीमधी लक्ष्मीची पाठ शेकून निघे.

आता सारजाने स्वयंपाक करायचे काम आपल्याचकडे घेतले. चंद्राला दळण, गोठा साफ करणं, पाणी आणणं, धुणं-भांडी आणि शेताकडची कामं करावी लागत. दौलत खायला मागू लागला की ती त्याला झिडकारी. रागावे. दौलत रडकुंडीला येई. दौलतला झिडकारले की चंद्राच्या काळजात कळ येई. एक दिवस चंद्रानं मनाशी काहीतरी ठरविलं.

भास्कर गुरांसाठी कडवा तोडत होता. सारजा श्रीपतीला घेऊन बाहेर गेली होती. तिच्या मैत्रिणीकडे कसलीतरी पूजा होती. चंद्रा भास्करपाशी गेली. हळूच म्हणाली– 'दादा, दादा !'

कुऱ्हाड बाजूला ठेवून, त्याने पटक्याच्या शेवानं घाम पुसला. म्हणाला– 'काय ग !'

चंद्रा घुटमळली. कसं बोलावं हा प्रश्न पडला होता.

भास्कर म्हणाला– ‘ अग माज्या भनी, बोल की तुला काय बोलायचं हाय ते ! कसली फिकीर हाय तुला ? ’

‘ दादा राग नगं मानू. मन थाऱ्याव ठिव ! ’

भास्कर नवलानं चंद्राकडं पाहू लागला.

ती पुढे म्हणाली– ‘ दादा, आमी किती दिस तुला तरास दियाचा. आमास्नी आमचं बगाय होवं ! ’

न राहवून भास्कर बोलला– ‘ काय बोलतीस चंद्रा ! तुजा ग कसला आलाय तरास ! आनी आमचं–तुमचं ही कवापासून भासा सुरू झालीया ? ’

आपलं म्हणणं रेटत चंद्रा म्हणाली–‘तसं नव्हं रे दादा ! पर कुनीतरी आपलं समदं करतंय् म्हनल्यावर मानूस ऐदी बनतू. तू तेवडं आमास्नी येगळी झोपडी वांधून दे. मी–दौलू तत ऱ्हावू ! गरज पडली की तू हाईसच की ! तुज्याविगार मलातरी कोन हाय् ! ’

भास्कर विचारात पडला. भर उन्हाचे चंद्राने आपले म्हणणे सांगितले. सारजाची धुसफुस त्याच्या नजरेला पडली होती. ती दौलतचा करीत असलेला राग त्याने निरखला होता. म्हणून चंद्राने ही युक्ती काढली आहे, हे त्याच्या लक्षात आले. तो म्हणाला–‘ व्हय, चंद्रा तू म्हनतीस ते खरं हाय् ! तकडं पलीकडं जागा हाय. ती साफसुफ करतू. तुला घोडीकोप वांधून देतो. ऱ्हा तत ! पर मी तुझा दादा, जीता हाय एवढं ध्येनात ठिव !’ त्याच वेळी त्याला मनात वाटत होतं – आपण चंद्राचे घर उन्हात बांधतोय !

भास्कर, चंद्राने मिळून जागेतील दगड गोटे काढले. एक भक्कम बांबू रोवला. गव्हाचा काड एकत्र केला. त्याची बांधणी करून, तो गोल तिन्ही बाजूनं लावला. वरून काड, उसाचा पाचोट टाकून छप्पर केलं. काडाचंच दार केलं. ते व्यवस्थित काथ्याने बांधले. दोन दिवस खपून, जमीन उकरून, माती टाकून, चोपण्याने चोपली. एकसारखी गुळगुळीत जमीन केली. मग जमीन छानशी सारवली. कुंभाराकडनं चूल आणली होती. ती एका बाजूला रोवली आणि समाधानाने चंद्राने आपल्या कोपीकडे पाहिले. आता तिची ही कोप निवारा होती. या कोपीत तिला इथून ऊठ म्हणून कोण म्हणणार नव्हतं. इथं तिची सत्ता चालणार होती. इथं तिचा दौलत राजा होता. भाकरीसाठी त्याला कोणाच्या मिंत्या कराव्या लागणार नव्हत्या. बुट्टीतली भाकर सरळ घेऊन तो खाऊ शकेल. मनसोक्त खेळेल. तिच्या कुशीत झोपेल. या विचाराने चंद्राला खूप बरे वाटले.

सारजा कोपीचे काम चालल्याचे पाहात होती. पण तिकडे तिने कानाडोळा केला.

सारजाच्या संसारातील भांडी आपण कशी मागायची ? म्हणून चूल आणली तेव्हाच तिने कुंभाराला सांगितले होते– 'भाऊ, मला एक रांजण, घागर, चारपाच लोटकी देजो. मी तुमचं पैसं मोलाचं पैसं हाती आलं की देतो. पर माजी नड काडा !'

कुंभाराला चंद्राची अडचण माहीत होती. तो हो म्हणाला. त्याप्रमाणे तिने, दौलतीने मिळून कुंभाराकडून रांजण, घागर लोटकी आणली.

एवढं झालं तरी सारजा गप होती. दौलतीला हे काय चाललंय् माहीत नव्हतं. तो म्हणाला सुद्धा – 'आये, ही कोप कुनासाठी ?'

'तुझ्या – माझ्यासाठी !'

'मंग आपुन हतं हायाचं–झोपायचं !'

'व्हय !'

'मामाजवळ मी न्हायझोपायचं ?'.

यावर चंद्रा गप्प बसली. मामाची कुशी भरलेली होती. ती सारजा श्रीपतीची जागा होती. दौलतीला मामा जवळ घेतो झोपायला, पण मामीला हे आवडायला पाहिजे ना ?

दौलत नादात बोलत होता. म्हणाला –'ही समदी भांडी आपली ?'

'व्हय् !'

'आनी –'

चंद्रा त्याला एकदम म्हणाली –'आता काय सुदीक इचारू नग! आता आपुन दोगानी मामाला तरास देयाचा न्हाय, एवढं ध्येनात ठिव !'

आईच्या तोंडाकडे पाहून दौलत गप्प बसला.

चंद्राने आपले, दौलतीचे कपडे गोळा केले. तसे कपडे कुठे जास्त होते. चंद्राच्या दोन चोळया, दोन लुगडी. त्यातला एक जोड अंगावर. दौलतीच्या कपडयांचे पण तसेच. तिने आपल्या जुन्या कपडयांची केलेली एक वाकळ होती. ती वाकळ, कपडे घेऊन चंद्रा

कोपीत राहायला निघाली. सारजाला म्हणाली–' वयनी, मी आन् माज्या पोरानं तुला लई तरास दिला. आता आमचं आमी वगतू कसं निवतया त्ये ! रागेजू नगस!'

सारजा ठसक्यात म्हणाली –' मी कशाला रागेजू ? पर दिवा-नसाब ही गोष्ट तुमच्या आदीच ध्येनात ययला होवी व्हती !'

चंद्रा खजील झाली. ही गोष्ट खरीच म्हणायची. आधीच का तिला ही कोप वांधून राहायची बुद्धी सुचली नाही !

चंद्रा दौलतला घेऊन कोपीत आली. कपडे, वाकळ ठेवली. आज शिजवायचे काय ? तिला प्रश्न पडला. येताना सारजाने मूठभरून तांदूळ दिले नव्हते. तिनेही मागितले नव्हते. भास्कर शेतावर गेला होता. चंद्रा दौलतीला म्हणाली– 'पोरा, आज रात-पातूर खायला काय मागायचं न्हाय् ! आन् मामा–मामीपाशीबी मागायचं न्हाई ! मी काम कुटं भेटतं का बगतू. सांचं वाण्या-कडून तांदूळ आणतू. मंग शिजवून घालीन. ध्येनात ठिव, आता तू आपल्या घरात हैस ! मामाचं घर तुजं हक्काचं नाय् !'

दौलतने मान डोलावली.

चंद्रा झपाट्याने रामच्या घराकडे गेली. रामची म्हातारी घरात होती. चंद्राला वघून म्हातारी चकीत झाली. चंद्रा म्हणाली– 'आजे ! माजं एक काम हाय !'

'अगबाय् ! ह्ये उंबराचं फूल आज हकडं कसं ? आनी तुजं माज्याकडं कसलं काम निगालं ?'

चंद्रा खाली मान घालून म्हणाली– 'आजे, माज्यासाठी कुटं काम हाय का सांग !'

'काम ? कशासाठी ?'

'मंग पोटाला काय खावू !'

'तुजा भावू हाय की मस्त !'

'त्येला काय त्येचा संसार न्हाय व्हय् ग ! दादा लई चांगला हाय म्हणून त्येच्या अंगाची साल काडायची व्हय् ! माज्यापोराचं, माजं मला बगाय नकू ?'

म्हातारी गप बसली. चंद्राला ती ओळखत होती. म्हणाली – 'व्हय् ! ते बी खराय् बाई !' पुढे म्हणाली– 'भांगलनीचं काम इंगवल्याच्या मळ्यात हाय. शेजारची इंदू जानार हाय. तिला सांगतू तुला न्यायला. काम मिळल !'

म्हातारीने तिला खुरपे दिले. इंदूला बोलावून आणले. तिला चंद्राला सोबत न्यायला सांगितले. त्या बरोबर गेल्या.

इंगवल्यानं काम दिलं. चंद्रा भांगलू लागली.

इकडे दौलतला काय करावे हे सुचेना. त्याने लक्ष्मीला हाक मारली. लक्ष्मीला ही कोपी अवडली. दोघं बांबूभोवती फिरून शिवापाणी खेळू लागले. खिदळू लागले. थोड्या वेळाने लक्ष्मीला भूक लागली. ती म्हणाली– 'चल रं ! आपन भाकर खाऊन येऊ या. मला भूक लागली !'

दौलतलापण भूक लागली होती. तोही निघाला लक्ष्मीबरोबर. लक्ष्मीनं आईकडे भाकरी मागितली. दौलतला पाहून तिने तोंड फिरवले. दौलतचे मामीकडे लक्ष नव्हते. पण अचानक त्याच्या लक्षात आले – आयनं ध्येनात ठिवायला सांगितलंय्. कोनाकडं भाकर मागायची नाय्. रातचं आपन जेवान करू. दौलत लक्ष्मीला म्हणाला– 'तू भाकर खा. मंग आपन खेळू. मी जातू !'

दौलत भुकजल्या पोटी निघाला. चिंचेचं झाड बघून थबकला. चिंचेचा कोवळा पाला नाजूक दिसत होता. त्याला फुले आली होती. तो सरसर झाडावर चढला. चिंचेचा पाला, फुले ओरबाडू लागला. खाऊ लागला. आंबट-गोड पाला-फुले त्याला चविष्ट लागत होती.

भास्कर दुपारी घरी आला. भाकरी खायला बसला. म्हणाला– 'समदयांनी भाकर खाल्ली का ग !'

सारजा 'हूं !' म्हणाली.

'चंद्रा, दौलत कुठं दिसनात् ?'

सारजा म्हणाली– 'त्यांनी सवता संसार मांडलाया नव्हं ! मग मला काय इचारता ?'

'म्हंजे ? चंद्रा कोपीत ऱ्हायला गेली ?'

'हूं.'

भास्करने मोडलेला भाकरीचा तुकडा तसाच ताटात टाकला. तो तटकन् उठला. कोपीकडे आला. कोपीचे कवाड उघडेच होते. तो आत गेला. गाडगी–मडकी होती. ती रिकामीच होती. नवी कोरी चूल रोवलेली. पण अजून लाकडाचा स्पर्श तिला झाला नव्हता. दोघं कुठं गेलीत त्याला समजेना. तो घरात आला. म्हणाला–' सारजे, चंद्रा-दौलू भाकर खाऊनश्यान गेलीत ?'

'ऱ्हाय !'

'अग सटवे ! माझ्या भनीला--भाचराला तू उपासपोटी जाऊ दिल्हस ! आता तूच खा भाकर !' म्हणून तो रागारागानं शेताकडे गेला.

कामावरून परतताना चंद्रा वाण्याच्या दुकानात गेली. पदरात तांदूळ बांधून घेतले. सोबत काड्याची पेटी, डाळ-मीठ-लाल बुक्का चटणीचा-साऱ्या पुड्या बांधून घेतल्या.

इकडे दौलत खूप भटकला आणि घरी आला. मग लक्षात आले, आईला आल्यावर चूल पेटवावी लागणार. आईचे काम हलके करायचे त्याने ठरविले. तो पुन्हा बाहेर पडला नि सरपण गोळा केले. घरी आला. चुलीपाशी सरपण नीट ठेवले.

चंद्रा घरी आली. दौलत वाकळ अंथरून पडला होता. चुलीपाशी सरपण होतं. तिने नवलाने विचारले–'कुनी आनलं रं सरपाण ?'

'म्या !'

'आरं माज्या राजा !' म्हणत चंद्राने त्याचा मुका घेतला. दौलत लाजला.

लगबगीने चंद्राने चूल पेटवली. सकाळी घागरभर पाणी आणून ठेवलं होतं. मडक्यात खिचडी शिजायला टाकली. खिचडी-तच मिरचीची पूड टाकली. अर्ध्या तासात खिचडी शिजली. लोटकी झाकायला आणलेल्या शिकुरीत तिनं भात हातानंच काढला. म्हणाली –'येरं माज्या बाळा! जेव ये. दिसभर उपाशी हायस !'

दौलत आईपाशी बसला. दोघं जेवायला लागली. स्वतःच्या कष्टाचे अन्न खाताना तिला समाधान वाटले. जेवणानंतरचे काम तिने झटपट आवरले. लोटकी धुतली. वाण–सामान गाडग्या-तून ठेवलं.

वाकळ नीट झटकून तिनं पुन्हा अंथरली. म्हणाली – 'ये दोलू ! झोपू या ! लवकर उठावं लागल !'

दोघांनाही लवकर झोप लागली.

भास्कर रात्री परतला. पाहिल्यांदा तो कोपीत डोकावला. पाहिलं तर मायलेकरं निवांत झोपली आहेत. चूल काळी पडली होती. आपली वहीण आपल्याला परकी झाली असे भास्करला वाटले. त्याच्या डोळ्यात पाणी आलं. तो गुपचूप घरात आला. लक्ष्मी त्याची वाट पाहात होती. श्रीपती आता चालत होता. बाबा, बाबा करत त्याने भास्करला मिठी मारली. भास्करने लक्ष्मी–श्रीपतीला जवळ घेतले. त्याच्याबरोबर भाकर खायची; म्हणून लक्ष्मी बसली होती. म्हणून भास्कर जेवायला बसला.

लक्ष्मी जेवता जेवता म्हणाली – ' बाबा वं, आज दौलत माज्या-वरुबर न्हाय जेवला. मी जेवाय ये म्हटलं, पर कुटं पळून गेला. मंग सांच्चं आय नकु म्हणाली कोपीकडं जायला. आता दौलत हतं न्हानार न्हाय व्हय ?'

भास्कर नुसता हूं ! हूं ! करत होता. तोंडात घास फिरत होता. लक्ष्मीची आपली बडबड चालली होती. तशी सारजा चिडली. ओरडली – ' आता गप खा की ! कशाला वाडीचार लावतीयास !'

तशी लक्ष्मी घाबरून गप्प बसली.

नेहमीसारखी भास्करला झोप आली नाही. कारण त्याचेजवळ कुणी झोपायचं म्हणून लक्ष्मी दौलतीचं भांडण झालं नव्हतं. लक्ष्मी गुपचूप बापापाशी आली. लक्ष्मीला थोड्या वेळात झोप लागली. भास्कर मात्र जागा होता.

० ० ०

६ :

चंद्रा कष्टत होती. घराला काय काय लागत नाही. नवीन चूल तर मांडलेली. नुसत्या गाडग्या-मडक्यानं काय होणार ? भाकरी करायला तवा पाहिजे. ती उलथण्यासाठी उलथणं पाहिजे. पीठ मळायला थाळी पाहिजे. सगळं पाहिजे होतं. नुसता भात खाऊन भूक भागणार नव्हती.

लोखंडी तवा – उलथणे, जर्मनची थाळी, तांब्या, वाटी अशा वस्तू तिनं घेतल्या मजुरीच्या पैशातून देण्याच्या बोलीतून.

ती कामाला गेली की दौलत एकटाच राहात असे. तो इकडे तिकडे उगीचच हिंडे. सरपण, शेण गोळा करून तेवढे आणी. त्यालाही आता कामात गुंतवावे. जगण्यासाठी, पोट भरण्यासाठी काम करावे लागते, हे त्याला आतापासूनच कळले पाहिजे. म्हणून त्याला कामाला लावायचे तिने ठरविले.

तिने दौलतला विचारले –' दौलू, माज्या बाबा ! गुरं राकायचं काम करतूस ?'

दौलतने आनंदाने या कामाला होकार भरला.

चंद्राने दौलतसाठी चार घरची गुरं राखायचं काम ठरविलं.

मग दौलतने एक झकासपैकी काठी घेतली. चंद्राने भाकरी. पिठले फडक्यात वांधले. हे छोटं गाठोडं त्याने काठीत खोचलं-काठी खांद्यावर टाकून हा छोटा गुराखी गुरे राखायला निघाला. गायी, म्हेशी, शेरडं घराघरातून गोळा करून – हाल्याक, थिर्र करत हा तांडा वाडीवाहेर रानात आणला. याच्यासारखी आणखी काही मुले आपली गुरे घेऊन आली होती. त्यांचा खेळ चालला होता.

मुलांत गुरं राखणाऱ्या दोन पोरी होत्या. एक फुलवंती. दुसरी होती हिरा.

गुरे गुरांत मिसळली. चरू लागली. दौलत पोरांत मिसळला. दौलतला पाहिल्यावर जगू शिंद्याला आनंद झाला. तो म्हणाला – 'ये रं दौलू ! आमी लगीन लगीन खेळतूया !'

तर औरंगा हसत म्हणाला – 'ये जगन्या, तूच हमेशा नवरा हुतोस. आता या दौलूला करूया नवरा !'

यावर फिदी फिदी हसत लाखाने हिरा-फुलाकडे पाहिले. त्या दोघी लाजल्या.

दौलत त्या दोघींकडे पाहून म्हणाला, 'पर जगन्या, नवरी कोन हुनार हाय ?'

जगू हसला. म्हणाला – 'कारं बाबा ? आदी तू नवरी फास करणार व्हय ?'

दौलतने हसत मान डोलावली.

औरंगा म्हणाला –'बग बाबा ! चांगलं डुळं मोटं करूनश्यान बग आणि दोगीपैकी कुठलीबी नवरी फास कर !'

फुलापेक्षा हिरा मोठी होती. ती झटक्यात म्हणाली – 'तर! आमी जनू वाटवरच पडलुया ! आमास्नी नकु का नवरा फास व्हाया !'

त्यावर दौलत टाळ्या पिटत म्हणाला – 'मला हीच पोरगी फास हाय !'

'मला नको धाकला नवरा. मी ऱ्हाय व्हयाची नवरी ' म्हणत

हिरा पळून जायला लागली. तसं फुलानं आणि लखानं तिला पकडलं. जगू म्हणाला – ‘ह्ये बग हिरा ! असं पळायचं न्हाय! समंदयाचं ऐकलं पायजे ! आन् काय ग वायट हाय ह्यो दौलू. कसा साजीरा हाय. गोरागोमटा हाय !

‘असू दे !’ हिरा ठसकली.

औरंगा मध्येच म्हणाला – ‘आज पहिल्यांदा दौलू आलाया. त्येचा मान कराया पायजे ?’

फुला म्हणाली – ‘व्हय ! औरंगाचं बोलणं बराबर हाय ! उगा ! चल आढंयेढं घेऊ नग !’

हिरा कबूल झाली. तशी वऱ्हाड मंडळीची धावपळ उडाली. फुलानं पिवळी धम्मक फुलं आणली. ती तरवडीची होती. लखानं घायपाताचं एक पान काढलं. त्याला खुरप्यानं छिललं. दोरा तयार झाला. फुलानं त्या दोऱ्याचे वेढे देऊन दोन मुंडवळ्या केल्या. दोन हार केले. दौलत हिराच्या कपाळावर मुंडावळ्या बांधल्या. जगूपाशी लाल पंचा होता. हा पंचा झाला अंतरपाट. एका बाजूनं औरंगा, दुसऱ्या बाजूला लखानं अंतरपाट धरला. फुला झाली दौलतची करवली. जगू खुरपं मुठीत उभं धरून हिराच्या पाठी उभा राहिला तिचा मामा बनून.

लखा भटजी मंगलाष्टका म्हणू लागले. औरंगा त्याच्या पाठोपाठ ‘कुर्यात् सदा मंगलम् ’चा गजर करत होता. शेवटी ‘शुभ मंगल सावधान’ झालं. अंतरपाट निघाला. दौलतने हिराच्या गळ्यात हार घातला. त्याला जरा टाचा वर करून हार घालावा लागला. हिराने लाजत त्याच्या गळ्यात हार घातला.

सर्वांनी टाळ्या वाजविल्या. उड्या मारल्या. सगळ्यांनी एका हाताने फुलाच्या पाकळ्या अक्षता म्हणून दोघांवर टाकल्या होत्या.

आता लग्नाचं जेवण. नवरा-नवरीला झाडाच्या बुंध्याला टेकून बसविलं. सर्वांनी आपल्या भाकरीचं गठुळं सोडलं. त्याचा एकत्र काला केला. सर्वांनी तो वाटून घेतला. गप्पा मारत, हसत खिदळत हा काला खाल्ला. ओढ्याला पाणी पिऊन आले.

जो तो गवतावर पसरला. गप्पा मारू लागला. अधूनमधून गुरं आसपास आहेत ना यावर ते नजर टाकीत होते.

एकदम सगळी उठली. एकमेकांना म्हणाली – 'चला रं, वड्याला जाऊ !'

ओढ्याला सगळी आली. पाण्यात डुंबू लागली. हिरा-फुला मात्र झाडाखालीच बसल्या. त्यांनी आपला खड्याचा डाव मांडला होता.

पहिला दिवस कसा भर्रकन गेला हे दौलतला समजले नाही.

सूर्यनारायण अस्ताला निघाला. सर्वांनी आपली गुरे गोळा केली. फुला–हिराने आपली सरपणाची बुट्टी डोकीवर ठेवली. रमतगमत मंडळी वाडीकडे निघाली. लखा एका हुमदांडग्या म्हशीवर मजेत बसला होता. औरंगा लावणी गुणगुणत होता. हिरा–फुला उगीचच खिदळत होत्या. जगू – दौलत गप्पा मारत होते. वाडीत आल्यावर जो तो आपआपल्या घरी गेला. दौलतने ज्या त्या घरची गुरे पोहोचती केली. घरी आला. चंद्रा नुकतीच आली होती. दौलतचा आनंदी चेहरा पाहून तिला फारच वरं वाटलं.

दौलत आपल्या कामावर खूष होता. गुरेढोरे त्याचे मित्र बनले. म्हशीवर तोही आता आरामात बसू लागला. गुराखी मित्रांबरोबर वेगवेगळे खेळ खेळताना वेळ कसा गेला हे कळत नसे. आट्यापाट्या, सुरपारंब्या, विटीदांडू, बैदुलाचा खेळ रंगत असे. फुला-हिरा या खेळात भाग घेत. पण सर्वांत रंगे काठ्यांचा खेळ. कधी कधी भांडाभांडी, रुसाफुगी होई.

दौलत दांडगट होऊ लागला. मारामारी करण्यात पण तो पटाईत झाला. कुरबुरी, भांडाभांडी, मारामारीत सारेच मनापासून भाग घेत. पुन्हा दिलजमाई होऊन खेळ सुरू होई. एका दिवसापेक्षा नव्हे, काही तासापेक्षा जास्त अबोला टिकत नसे.

गुरं राखायचा आणखी एक फायदा होता. त्याला कुठल्या ना कुठल्या घरात अधूनमधून ताक प्यायला मिळे. ताक प्यायला मिळाले की दौलत खूष होऊन जाई. त्याच्या घरात अजिबात दुभतं नव्हतं. म्हणून ताकाची अप्रुवाई वाटे.

त्या दिवशी होळीचा सण होता. सगळे जण खुषीत होते. गेल्या गेल्या औरंगाने जाहीर केलं – आज आपन काठ्यांचा खेळ खेळायचा. त्याबरोबर सर्वांनी होकाराचा गिल्ला केला. दौलतनं टिपऱ्या बडवून, उड्या मारून आपला आनंद व्यक्त केला.

औरंगाने रेष मारली. विचारले– 'तय्यार ?'

सगळे आपल्या हातात गुरं राखायच्या काठ्या घेऊन सज्ज झाले. औरंगा रेषेच्या बाजूला उभा राहिला आणि काठी जोरात फेकली. बाजूला जाऊन उभा राहिला. मग लखा पुढे सरसावला. त्याची काठी औरंगाच्या काठीपुढे जाऊन पडली. लखाचा चेहरा उजळला. जगूनं आपली काठी जोर लावून फेकली.

ती सर्वांच्या पुढे गेली. तसा लखा म्हणाला – ‘ भले शाब्बास! ’ जगू फुशारला. हिरा दौलतला म्हणाली, ‘ तुझी काठी फेक की ! ’

दौलत म्हणाला – ‘ मागनं फेकतू. तू अगुदर फेक ! ’

दौलतने मनाशी ठरविले होते. सर्वांच्या काठ्या फेकून झाल्यावर आपली काठी अशी फेकायची की ती सर्वांच्या पुढे जाईल. हिराने जीव खाऊन काठी फेकली. ती औरंगाच्या पुढे पडली. हिराला बरं वाटलं. फुलानं आपली काठी भिरकावली. तिची काठी औरंगाच्या काठीच्या शेजारी पडली. फुलाला वाटलं– ‘ आता आपल्यावर डाव येतूया . ’

दौलत काठी सावरीत ऐटीत रेषेच्या अलीकडं उभा राहिला. सगळे उत्सुकतेने पाहू लागले. हिरा म्हणाली.– ‘ बया फुले, डाव घियाची तयारी ठिव ! ह्या म्हाराजाची काटी मैलावर जावूनश्यान पडणार हाय बग ! ’

दौलतने छाती पुढे केली. मग वेग घेण्यासाठी काठी फिरवून वाकला आणि काठी फेकली. त्याच वेळेस वारा सुटला. दौलतची काठी फुलाच्या काठीच्याही अलीकडे पडली . तसं फुला आनंदाने ओरडली – ‘ दौलू डाव आला . ’

हिरी आनंदाने खिदळू लागली.

लखा, औरंगा, जगू आपल्या काठ्या घ्यायला धावले. दौलतला डाव आपल्यावर आला म्हणून राग आला. ह्यात हिरीच्या खिदळ- ण्याने भर घातली. तो ओरडला.–‘ आमी नाय् डाव घेनार! आनी एक डाव टाकूया काठ्या. मंग बघा कुनाची काठी फुडं जातीया ती. माज्या वक्ताला वारा आला नव्हं का! ’

हिरा खिदळत म्हणाली – ‘ तर, तर! म्हनं माज्या वक्ताला वारा आला नव्हं का ! रडतराव कुटला !’

दौलत चिडला. तिच्या पाठी लागला. हिरा पळाली. पण तिला त्याने पकडले. आणि पाठीत दणकन् बुक्का घातला. हिरी पुन्हा जोरात म्हणाली–‘ रडतराव. आमचा डाव दिना. . . .’

सगळे दौलतभोवती जमले. गिल्ला करू लागले – ‘ आमचा डाव दिना, डांगरभाकरी खाईना . . ’

जगू समजुतीनं म्हणाला –‘ गप बसारं ! दौलू रं ! डाव घे बगू. रडी खाऊ नगं. लवकर डाव कुणाव तरी उलटव की गडचा ! आसं काय भागूबाईवानी !’

दौलत नाक फेंदारून म्हणाला – ‘ हां ! हां ! घेतू डाव ! घावरतुया का !’

त्यानं आपली काठी घेतली. दोन्ही हातांत धरून हात उंच केले. सर्वांनी त्याच्याभोवती गोल केला. आपल्या काठ्या त्याच्या काठीखाली घातल्या. औरंगा म्हणाला–‘ हुश्शार!’
सगळे म्हणाले, ‘ हुश्शार !’

आणि सगळ्यांनी आपल्या काठ्यांचा जोर लावून दौलतची काठी दूर भिरकावली. जलद गतीने आपल्या काठ्या दगडावर ठेवल्या.

दौलत बारीक नजरेने पाहात होता – चुकून कोणाची काठी जमिनीवर आहे का ? कुणाचीच काठी जमिनीवर नव्हती. तोवर जगू सुसाट पळाला. दौलतच्या काठीपाशी आला. आपल्या काठीने दौलतची काठी कोलवीत निघाला. त्याच्या पाठी दौलत

पळाला. तो जवळ आल्याचे पाहून जगूनं आपली काठी तावड-तोब दगडावर ठेवली. जो तो आपली काठी दगडावर टेकवीत पुढे सरकू लागला. हिरा दुसऱ्या बाजूनं काठीपाशी आली. दौलतच्या मागे औरंगा होता. आणि दोन्ही बाजूला लखा–फुला उभे होते. दौलतने लखा–फुलाकडे लक्ष ठेवले. तोवर हिराने–काठी कोलवून दूर फेकली आणि पळाली. दौलत तिच्यापाठी लागला. तिने आपली काठी दगडावर ठेवली. बाजूबाजूनं प्रत्येक जण काठी कोलवायला जायला बघू लागला. दौलत चौफेर लक्ष देऊन मेटाकुटीला आला. या वेळी औरंगाने काठी कोलावली. औरंगा पळण्यात पटाईत होता. दौलत त्याचा पाठलाग हात पसरून करू लागला. जमले नाही त्याला शिवायला. तो जवळ येऊ-स्तवर पुन्हा औरंगाने काठी दूर कोलवली होती आणि दगडावर काठी ठेवून उभा होता. तोवर फुला–हिरा–जगू–लखाचे लटांबर दौलत पाठोपाठ आले. दगडावर काठ्या टेकवून उभे राहिले. तशात लखाने काठी कोलवली. दौलत जवळच होता. तो त्याला शिवायला धावला. लखाने चपळाईने आपली काठी एका खड्या-वर टेकवली. दौलत त्याच्या पाठीत धपका घालून म्हणाला – 'तुला शिवलं. डाव घे !'....

लखा हसत म्हणाला – 'का म्हणून ! म्या काटी खड्याव ठिवलीया !'

दौलत रागाने म्हणाला, 'कुटं हाय रं खडा ! '

लखा म्हणाला– 'बग की वाकूनश्यान !'

दौलत म्हणाला – 'चल ! खडा नाय आन् काय न्हाय ! डाव घी अगुदर !'

दौलत

लखा तावदारून म्हणाला –' वारं वा ! म्हणं डाव घे !'

हिरा म्हणाली – ' रडीला आलाय दौलू ! काय तरी निमित्त पायजे ह्येला !'

दौलती चिडून ओरडला– ' ये हिरे.'

औरंगा, जगू पुढे सरसावले. म्हणाले–' लखाची काटी खड्यावं हाय ! तू फुडं खेळ बगू. अशी रडी काय खायची !'

दौलतला खडा दिसत होता, पण त्याचा लवकर डाव जातच नव्हता, म्हणून तो कावला होता. चिडत होता. पुन्हा काठी कोलवणे सुरू झाले. बराच वेळ झाला. काठी कोलवायला पळणाऱ्या जगूच्या मागे तो पळाला. दौलत त्याच्या पाठी लागला. दौलत जवळ आला म्हणून तो दगड वघू लागला. एक बारीक खडा दिसला. त्यावर'काठी ठेवायला गेला. ती सरकली. दणकन् दौलतने जगूच्या पाठीवर धपका घातला. म्हणाला – ' जगऱ्या, जगऱ्यावर डाव आला !' जगूची काठी जमिनीवर पाहून सगळे ओरडले–'जगूवर डाव आला !'

दौलतला आपली सुटका झाल्याचा आनंद झाला. तो ओरडला.– ' चला कावड काढूया !'

त्यावरोबर सगळे जगूभोवती नाचू लागले. म्हणू लागले, 'जगा तैयार हो ! कावड काढायची !'

दौलतने जगूची काठी जगूच्या खांद्यावर आडवी ठेवली. म्हणाला – ' जगू ! रोव कोपार आन् धर कान !'

नाइलाजाने जगूने तसे केले. हाताला काठी रुतू लागली.

तोवर औरंगा, दौलतने त्यांच्या काठ्या डाव्या – उजव्या खांद्यावर रोवल्या आणि लोंबकळू लागले. हिराफुला मागून ढकलू लागल्या. लखा मधूनच आपली काठी रोवून जगूच्या खांद्यावर दाबत होता. अशी कावड निघाली. बरेच अंतर जगूला जावे लागले. तो रडकुंडीला आला. त्याला सगळे खूप सतावत होते. तो कावला. त्याने आपले कान सोडले. सगळ्यांना ढकलले.

काठ्यांचा खेळ खेळून सगळे दमले होते. कडकडून भूक लागली होती. गुरे आपली शांतपणे आजूबाजूला चरत होती. शेरड्या झुडपावर पुढचे पाय ठेवून पाला ओरबाडत होत्या.

झाडाखाली रिंगण करून सगळे बसले. भाकरीचा फडशा पाडला. ओढ्याला पाणी पिऊन हातपाय धुतले आणि जो तो झाडाच्या सावलीत अंग टाकून पडला.

दिवस मावळतीला झुकला. गुरे घेऊन सगळे परतू लागले. दौलत म्हशीवर निवान्तपणे पालथा पडला. तिच्या गळ्यातली घंटा किणकिणत होती. औरंगा म्हणत होता –‘ सुंदरा मनामध्ये भरली.’

० ० ०

## ७ :

दिवस कसे टिरीला पाय लावल्यासारखे पळत होते.

त्या दिवशी चंद्रा कामावर गेली नव्हती. अंगात जरा ताप होता. चार दिवस आजार तिने अंगावरच काढला होता. आज अगदीच कसे तरी वाटू लागले म्हणून थांबली. दौलत रानात गेला होता.

बाहेरून आवाज आला– 'घरात कोणी आहे का ?'

'कोण ?' म्हणत चंद्रा कशीवशी दारापाशी आली. बाहेर आलेल्या व्यक्तीला पाहून ती चकित झाली. म्हणाली – 'शिंदेगुर्जी ! तुमी वं हकडं कसं वाट चुकलासा ?'

तिने त्यांना बसायला पटकूर टाकले. पदर सावरून उभी राहिली. गुरुजी पटकुरावर बसत म्हणाले – 'तुम्हाकडंच आलो होतो.'

'का वं ?'

'दौलत कुठं दिसत नाही ?'

'तो गेलाय् गुरांपाठी. सांजचा येईल.'

'दौलतसाठीच आलो होतो.'

'म्हंजे ?'

'तुम्हाला काहीसुद्धा माहीत नाही असं दिसतं !'

'काय ?'

'मी रानशाळेचा गुरुजी झालो आहे. एका संस्थेनं इथं ही शाळा काढायला परवानगी दिली आहे. मला तर सर्वांनी आधीच गुरुजी

करून टाकला आहे. आता मात्र मी खरोखरचा गुरुजी झालोय्.'

'असं व्हय् !'

'इथं रानशाळा काढली आहे. दौलतला शाळेत पाठवा ही विनंती करायला आलो आहे.'

'दौलू आन् साळंत ? कसं वं जमायचं ?'

'का ? जमवलं की सगळं जमतं.'

'त्यो गुरापाठी जातूया. म्हनूनश्यान मी म्हनतूया...'

'अहो, आमची शाळा रानात जाणाऱ्या मुलांसाठी आहे. सकाळी आठ ते दहापर्यंत शाळा. मग शाळेला सुट्टी. मुलं गुरांपाठी जायला मोकळी होतात.'

'असं व्हय !ही तुमची रानसाळा कुठल्या जागी भरतीया ?'

'विश्वास पाटलांनी आपला गोठा दिलाय् या शाळेसाठी.'

'त्येंचा गोठा ?'

'होय. काय करणार ? दुसरी जागाच नाही वाडीत ओसरी असलेली. एखादं देऊळ पण नाही. मारुतीचं देऊळ आहे, पण ते कंबरं-एवढं उंच आहे. भोवती नुसतं रान माजलंय पार असलेलं झाड पण नाही. मग काय करणार ?'

'पर गोठा ?'

'होय. तो तसा चांगला आहे. पाटलांची गुरं पहाटेच गोठ्याबाहेर काढतात. गोठा स्वच्छ असतो. गोठा मोठा आहे. मुलं नीट' बसतील तिथं. मग पाठवणार ना तुमच्या दौलतला शाळेत ?

‘ त्येला सांगतू साळेचं. ’

‘ नुसतं सांगू नका. शाळेला पाठवा. तुमचा मुलगा हुशार वाटतो. त्याची हुशारी वाया घालवू नका. चांगला शिकला तर तुमचे पांग फेडील. ’

चंद्राच्या डोळ्यांपुढे शिकून मोठ्या झालेल्या दौलतचे मोठे छान चित्र उभे राहिले.

ती म्हणाली, ‘ पाठवत् त्येला साळंत. तुम्ही म्हंतायसा तेबी बरावर हाय. ’

‘ मग मी निघतो.’ म्हणत गुरुजी जायल उठले. त्यांच्या लक्षात आले, दौलतच्या आईला बरे वाटत नसावे. आपण आपल्या कामाच्या नादात त्यांना त्याबद्दल विचारायचे विसरलो. गुरुजी ओशाळले. त्यांनी वाडीत रानशाळा काढायची ठरविली, संस्थेची परवानगी मिळाली, पण शाळेसाठी नियमाप्रमाणे किमान तीस पोरे लागतात ती मिळविण्यासाठी गुरुजींना हिंडावेलागत होते. अजून शाळेला कमी पोरे पडत होती. तेव्हा दौलतची आठवण झाली होती.

गुरुजी म्हणाले, ‘ तुम्हाला वरं वाटत नाही असं दिसतं ?’

चंद्रा म्हणाली, ‘ वाईच जाळ आलाया. आराम भेटल्यावर बेस वाटंल. ’

गुरुजी म्हणाले, ‘ दवा आणला ?’

‘ नाय् वा. दवा आनाय् कडलासला कवा जाऊ ? ’

‘ हां, ते पण खरंच. तुम्ही असं ’ करा – दौलत रानातून आला की त्याला घरी पाटवा. आई काढा करून देईल. ’

चंद्राने बरे म्हटले. गुरुजीनिघून गेले.

दौलत नेहमीसारखा घरी परतला. चंद्राने त्याला कौतुकाने विचारले – 'दौलू, साळंला जातूस का?'

दौलत तिच्याभोवती उड्या मारीत होता. उड्या मारीतच तो म्हणाला – 'मी न्हाय जा!'

चंद्रा म्हणाली – 'आरं, साळंत गेलास की मोटा मानूस हुशील. शाना हुशील.'

दौलत म्हणाला – 'मी शानाच हाय!'

तो अजून उड्या मारीत होता. त्याचा हात पकडून तिने थांबवले. म्हणाली – 'माजा राजा, असं येड्यावानी करू नगं. शिंदेगुर्जीनी रानसाळा काडलिया ....'

त्यावर दौलत नवलाने म्हणाला – 'आये, काय म्हटलीस? रानसाळा निगालिया? अगं, मंग आमी न्हाय का रोज रानात जात? रानात आमी कायवाय लई शिकतू. मंग ती आमची साळा नव्हं का? आनी कशापाय ह्या येगळ्या साळंत जायाचं? मी न्हाय जानार जा!'

चंद्रा जरा रागाने म्हणाली – 'नगं जाऊ! तुला आयचं कुटं ऐकूशी वाटतंया! रानात गुरापाटी उंडारणं म्हंजे साळा नव्हं. गुर्जी आलं व्हतं तुझ्यासाठी. म्हटलं – दौलत साळा शिकला तर मोटा मानूस व्हईल. तुमचं पांग फेडंल. पर ह्यो दौलू कुटं ऐकाय बसलाय.'

आईची नाराजी ओळखून दौलत तिच्यासमोर बसला. तिच्याकडे टकाटका बघायला लागला. मग म्हणाला –

'गुर्जी आले व्हते ?'

'व्हय.'

'साळा कुटंशीक भरनार ?'

'इस्वास पाटलाच्या गोठ्यात.'

'वा साळंत जायाचं ?'

'कवा'

'सक्काळच्यापारी.'

'आनी गुरापाठी कवा जायाचं ?'

'साळा संपल्यावर.'

'साळा कवा संपायची ?'

'ह्ये दोडा –' करत चंद्राने त्याच्या पाठीत धपका घातला. 'सवालच पुसतोय. पर जातू म्हंतूयास का ?'

दौलत खदाखदा हसला आणि बाहेर पळू लागला. चंद्राने त्याला चपळाईने पकडले. म्हणाली – 'अगुदर गुर्जीच्या घरी जा.'

घाबरून दौलत म्हणाला – 'कशापायी ? मी उंद्या साळंत जातू की.'

आता चंद्राला हसू आले. म्हणाली, 'त्यासाठी नव्हं. गुर्जीची आय काढा दिईल त्यो घिऊन ये.'

'काढा कुनाला गं ?'

'मलाच.'

काळजीने दौलत म्हणाला – 'काय हुतंया गं तुला ?'

‘ वाईच अंगात जाळ हाय. ’

गाल फुगवीत चिडून दौलत म्हणाला – ‘ आनी आमाला सांगायचं न्हाय् व्हय् ! सक्काळी दवा नसता आणला ? ’

चंद्राने लाडाने त्याला जवळ घेतले. तो रागाने बाजूला झाला – ‘ जा तकडं ! म्हनं दौलू माजा राजा, माजा सोन्या – आन् त्येला काय बी सांगायचं नाय् ! ’

चंद्रा म्हणाली – ‘ मंग हायस तू माजा राजा, सोन्या ! पर आता काढा आनाय् जाशील की राग करशील ? ’

‘ मी न्हाय आननार जा ! ’ करत तो रागाने बाहेर पडला.

पण त्याची पावले गुरुजींच्या घराकडे वळली. गुरुजींची आई घरात होती. दौलतला तिने पाहिले. म्हणाली – ‘ आलास बाबा ! ये. ’ घरात जाऊन त्यांनी एक चेंबले आणले. ते दौलतच्या हाती दिले. म्हणाल्या – ‘ काढा गरम करून घे म्हणावं आईला. आणि काढा घेतल्याबरोबर पांघरूण घेऊन झोपून जा म्हणावं. उद्या पण ये काढा न्यायला. ’

दौलतने मानेनेच हो म्हणून सांगितले. घरी परतला.

सकाळी उठल्याउठल्या चंद्राने आठवण केली – ‘ साळंला जानार नव्हं ? ’

तो नुसता ‘ हूं ’ म्हणाला.

‘ मंग आटीप लवकर आन् जा. ’

चंद्राच्या या घाईने तो रागावला. तिला वेडावून दाखवत म्हणाला – ‘ साळंत कसं जायाचं ? ’

‘का ? काय झालं ? ’

‘साळंत काय मोकळं जात्याती ? त्यासाठी पाटी नकू ? पेन्सूल नकू ? म्हनं साळंत जा ! ’

चंद्रा गडबडीने म्हणाली – ‘व्हय की रं ! आत्ता रं कसं ? ’

‘आत्ता रं कसं म्हंजे ? ’ तिला आणखी वेडावत तो म्हणाला – ‘आता साळंला बुट्टी. आमी आमच्या गुरांसंगं जातू रानसाळंत ! ’ एवढे बोलून तो पसार झाला.

हाती खुरपे, भाकरीचे गाठोडे घेऊन चंद्रा निघाली. खोपीचे दार लावले तरी दौलत परतला नव्हता. तिने त्याची भाकरी शिकाळ्यावर ठेवली होती. ती निघणार इतक्यात दोन पोरे उड्या मारीत तिच्या खोपीकडे येताना दिसली. ती थांबली. पोरे तिच्यापाशी येऊन थांबली. एकजण म्हणाला –

‘गुर्जींनी दौलूला वलवलंय्. ’

‘त्यो घरी न्हाय वावानू. ’

एवढे ऐकल्यावर पोरे सुसाट पळाली. एकाच्या अंगावर नुसता लंगोट होता. दुसऱ्याने गुढघ्यापर्यंत आलेली ठिगळाची पैरण घातली होती. दोघांचे पळणे गंमतीदार होते.

चद्रा कामाला निघून गेली. खूप वेळाने दौलत परतला. शिकाळ्यावरची भाकरी घाईघाईने फडक्यात बांधली. काठी घेऊन गुरे गोळा करून रानात गेला.

सायंकाळी पुन्हा गुरुजी चंद्राला भेटायला आले. म्हणाले – ‘दौलत शाळेत नाही आला ?’

चंद्रा गप्पच.

'तो शाळेत यायला तयार नाही का ?'

'तसं नव्हं. पर....'

'पण काय ?'

'साळंत पाटी–पेन्सूल लागती नव्हं ?'

गुरुजी समजले. ते म्हणाले – 'उद्यापासून तुम्ही त्याला शाळेत पाठवा. पुढचं काय करायचं ते मी पाहातो. त्याच्या कानावरून तरी शब्द जातील.'

चंद्राने मान डोलावली.

गुरुजी जायला निघाले जाताना म्हणाले – 'आता बरं वाटतंय का ?'

चंद्रा 'हो' म्हणाली.

'तरी पण आज काढा घ्या.' असे सांगून गुरुजी निघून गेले.

दुसऱ्या दिवशी मात्र चंद्राने दौलतला समोर बसविले. त्याच्या पाठीवरून, केसांवरून मायेने हात फिरवला तसा तो ढुशी मारल्यासारखा करून तिच्या कुशीत शिरला. चंद्रा मायेने म्हणाली – 'माज्या राजा तू ! आयचं ऐकनार नव्हं ?'

तो नुसता हुंकारला.

'बग. साळंत जायला लाग. चार अक्षरं शिक. म्हंजे लिखा-पढीमुळं आपलाच फायदा व्हईल. तुला वाचूक येईल. तू लई शाना व्हशील.'

'हूं !' तो पुन्हा हुंकारला.

त्याच्या पाठीत धपाटा घालून चंद्रा म्हणाली – 'म्या काय कानी लावलीया व्हय् हूं हूं कराय? ऊठ आदी. साळंत जा.'

'पर पाटी...'

'गुर्जी म्हंटले, निस्तं साळंत दौलू आला तरी चाललं. कानावरनं शबूद जात्याल...'

तरी तो गप्पच.

चंद्रा काकुळतीला येऊन म्हणाली – 'आयचं ऐकनार न्हाईस व्हय रं? माज्या गळ्याची आन हाय बग तुला!'

नाइलाजाने दौलत म्हणाला – 'वरं, वरं, जातू साळंत. उगा आनबीन घालू नगंस.'

त्यावर चंद्राने आनंदाने दौलतच्या तोंडावरून हात फिरवला. कानशिलावर कडकडून बोटे मोडली.

नाइलाजाने पाय ओढतओढत दौलत निघाला. पाटलांच्या गोठ्यापाशी आला. आतून गुरुजींचा आवाज ऐकू येत होता. गुरुजी म्हणत होते – ग रे गडूचा, म रे मक्यातला. गुरुजींच्या आवाजात पोरांचा आवाज मिसळत होता. दौलत पोरांच्या पाठी जाऊन उभा राहिला. गुरुजींचे त्याच्याकडे लक्ष गेले. ते आनंदाने म्हणाले – 'ये दौलत. बैस.'

दौलत सर्वांच्या शेवटी बसला. गोठ्यात शेणामुताचा वास येत होता. थोडासा कडबा बाजूला पडला होता. गुरांच्या दावणीचे खुंट आता रिकामे होते. वर्गात कोणकोण आहे याचा त्याने नजरेने तपास केला. काही मुलांपाशी पाटी होती. काहींपाशी नव्हती.

गुरुजींनी स्वतःच फळा तयार केला होता. एक पत्र्याचा तुकडा घेऊन त्यांनी तो ठोकूनठोकून सपाट केला होता. त्याला डांबर लावले होते. या फळ्यावर गुरुजींनी काढलेली ग, म, भ, न अक्षरे अगदी कोरून काढल्यासारखी वाटत होती.

परंतु दौलतला एका जागी गप्प बसवेना. त्याची चुळबूळ सुरू झाली. नुसते फळ्याकडे पाहायचे, अक्षरे लक्षात ठेवायची ही कृती त्याला मुळीच आवडली नाही. शाळासुद्धा त्याला आवडली नाही. त्याचे मन लागेना.

गुरुजींच्या नजरेत दौलतची चुळबूळ आली. त्यांनी विठ्ठल-कडून पाटी–पेन्सिल घेतली. दौलतला आणून दिली. म्हणाले – 'फळ्यावरची अक्षरं काढ. माझ्या पाठोपाठ म्हण.'

पाटी-पेन्सिल हाती आल्यावर दौलतला आनंद झाला. विठ्ठल मात्र गुरुजींच्या या कृतीने नाराज झाला. त्याला समजावत गुरुजी म्हणाले – 'विठ्ठल, तुला ही अक्षरं यायला लागलीत. थोडा वेळ दौलतजवळ पाटी असू दे.' आपल्याला अक्षरे यायला लागलीत हे ऐकून विठ्ठल फुशारला. गप्प बसला.

दौलतने कौतुकाने पाटी गोंजारली. नीट थुंकी लावून सदऱ्याच्या कोपऱ्याने पुसली. पेन्सिल बोटात गच्चम् पकडली. मान तिरपी केली. ओठावरून जीभ फिरवली आणि ग, म काढू लागला. जरा वेळाने चारी अक्षरे काढून झाली. तो पाटी घेऊन उभा राहिला. म्हणाला – 'गुर्जी.'

गुरुजींनी त्याची पाटी पाहिली. थोडी वेडीवाकडी, पण बरोबर काढलेली अक्षरे होती. गुरुजी कौतुकाने म्हणाले – 'शाब्बास ! पहिल्याच फेरीत तुला चारी अक्षरं काढायला आली की !'

दौलत आनंदाने फुशारला. तोवर विठ्ठल म्हणाला -- ‘गुर्जी, माजी पाटी ..’

त्याची पाटी–पेन्सिल गुरुजींनी परत केली. दौलतला म्हणाले, ‘रोज शाळेत येत जा. तू लवकर शिकशील. हुशार आहेस.’

शाळा सुटल्यावर वासरासारख्या उड्या मारीत दौलत परतला. फडक्यात भाकरी वांधून घाईघाईने गुरांपाठी गेला.

त्या दिवशी त्याने मैतरांना शाळेतील गंमतीजमती सांगितल्या. आपल्याला अक्षरे कशी काढायला येतात हे त्याने त्यांना रुबाबात सांगितले. एवढेच नव्हे तर धुळीत काडीने ती अक्षरे त्यांना काढूनसुद्धा दाखवली.

औरंगा नाराजीने म्हणाला – ‘ये बाबा, ह्ये साळंचं येडताक तुज्यापातूर न्हाऊ दे आमास्नी नगं सांगू त्ये कौतीक. आमची ही रानसाळा वेस हाय !’

यावर फुला-हिराने जोर दिला. दौलत लखा-जगूला म्हणाला, ‘तुमीबी या की उद्यापास्नं साळंत. तुमच्याविगर गड्या साळंत मन लागत न्हाय.’

लखा-जगू नुसते हो म्हणाले. फुला-हिरा जळणकाडी गोळा करायला लागल्या. औरंगा आपल्या शेरडांपाठी उगीचच गेला. त्यांना दौलतचे शाळेत जाणे पसंत नव्हते आणि दौलतीला शाळा मुळीच आवडली नव्हती. एका जागी तेथे वांधून ठेवल्यासारखे वाटत होते, आणि गुरुजींची नजर सगळीकडे सारखी असायची. दंगा करावा तरी पंचाईत. शाळा म्हणजे कोंडवाडा असेच त्याला वाटले. मित्रांना शाळेची फुशारकी सांगितली खरी, पण ती कौतुकापोटी नव्हे तर आपल्यासारखेच आपले मित्र शाळेच्या जाचाला वळी पडावेत म्हणून ! ० ० ०

दौलत शाळेत जाऊ लागला. गुरुजी सांगत ते त्याच्या पटकन् लक्षात राही. मग इतर मुले घोकंपट्टी करत असत तेव्हा त्याला पुन्हा तीच अक्षरे काढायला नको वाटे. मग त्याच्या टिवल्या-बावल्या सुरू होत किंवा हळूच तो दुसऱ्या मुलांच्या खोड्या काढी. कुणाला चिमटे काढ, कुणाचे केस ओढ, कुणाची टोपी दडवून ठेव, कुणाच्या लंगोटीचा मागचा शेव हळूच सोडून ठेव, असे उद्योग तो करी. मुले चिडत. गुरुजींकडे तक्रार करीत. दौलत साळसूदपणे उभा राही. म्हणे –'मी नाय गुर्जी. मी काहून इठोबाला चिमटा काढू वं ?'

एकदा तो गुरुजींना गुन्हा करताना सापडला. झिपरू नेहमीच लंगोटीवर येई. तशी बरीचजण येत. कुणाच्या अंगावर धडका कपडा नसे. फक्त विठ्ठलच तेवढा धडक्या कपड्यात असे. बाकीचे उठल्याउठल्या तोंडाला पाणीही न लावता येत. गुरुजीच पुन्हा त्यांना तोंडे धुवायला घरी पाठवत. मग ती खेळूनविळून उशीरा येत.

झिपरू नेटाने अक्षरे काढायचा प्रयत्न करीत होता. त्याचा सगळा गोंवळ उडत होता. 'ग' तो 'll' असा काढी. 'म' 'म' असा काढी. अशीच अक्षरे काढायचा झिपरूचा प्रयत्न चालला होता. हळूच दौलतने त्याच्या लंगोटीचा शेव सोडला. त्याच वेळी झिपरू उठला. म्हणाला, 'गुर्जी, गुर्जी, माजी अक्षरं बगा ! '

आणि सारा वर्ग फिदीफिदी हसायला लागला. झिपरूची

लंगोटी सुटली होती. त्यासरशी झिपरू मटकन् बसला. लाजेने गुढघ्यात मान घालून बसला. रडायला लागला.

गुरुजी चिडले. झिपरूच्या पाठीमागे दौलत बसला होता. त्याला उठवले. म्हणाले –'अशी कुणाची चेष्टा करू नये. चल हात पुढं कर.' सपासप चारपाच रूळ त्याच्या हातावर मारले. दौलतने हाताची कळ सोसली. तळवा लालेलाल झाला होता. तरी मनातून दौलत खूष होता. झिपरूची कशी फजिती झाली म्हणून !

दौलत शाळेत नियमित जाईच असे नाही. अधूनमधून तो शाळेला झुकांडी देई.

दौलती पहिली पास झाला. अगदी पहिल्या नंबरने. मुलगा पास झाला याचा चंद्राला पण आनंद झाला. मोठ्या कौतुकाने तिने त्याला पाटी–पेन्सिल आणून दिली.

रानशाळेत काहीच बदल झाला नव्हता. गोठ्यात नेहमीप्रमाणे शाळा सुरू झाली. सोवतीला गुरांच्या शेणामुताचा वास होताच.

वरीच मुले नुसत्या लंगोटीवर येत. काहींचे ठिगळाचे सद्रे असत. काही फाटकेच सद्रे वापरीत. सद्रा-चड्डीत विठ्ठलच तेवढा येई या वर्षी दौलतला पण नुसत्या लंगोटीवर यावे लागले. त्याच्या पैरणीच्या अगदी चिंध्या झाल्या होत्या. पण त्याची त्याला लाज वाटत नव्हती. कुणालाच लाज वाटत नव्हती लंगोटीवर यायची. सगळी मजेत असायची. एकमेकांच्या चहाड्या चालत. खोड्या चालत. भांडणे, मारामाऱ्या सारे चाले आणि 'गुर्जी, गुर्जी' चा गजर पण चाले.

काही मुले शाळेला झुकांडी देत. त्यांना शाळेत बसायला आवडावे म्हणून गुरुजींनी युक्ती केली. त्यानी पोरांना छान छान गोष्टी सांगावयास सुरुवात केली. रामायण–महाभारतातल्या गोष्टी ते सांगू लागले. दौलतला गोष्टी आवडू लागल्या. हनुमानाचे शौर्य, धाडसीपणा त्याला आवडे. भीमाचा खादाडपणा आणि अचाट शक्ती याचे त्याला नवल वाटायचे. अश्वत्थामा याला लहानपणी दूध मिळाले नाही, आईने पाण्यात पीठ कालवून त्याला ते दूध म्हणून दिले, याचे वाईट वाटायचे. मनात यायचे, आपल्याला तरी दूध कुठे मिळते ? ताक मात्र मिळते याचाच आनंद आहे.

गुरुजींनी सुंदर सुंदर कविता शिकविल्या. त्या तालासुरात ओरडून म्हणताना त्याला आनंद वाटू लागला.

बघ आई आकाशात सूर्य हा आला
पांघरून अंगावरी भरजरी शेला
निळायाच्या महाली खांब सोनेरी
मोतीयाच्या लावीयेल्या आत झालरी

म्हणताना त्याच्या डोळ्यांपुढे शेला पांघरलेला सूर्य दिसायचा. त्याचा तो मोत्याच्या झालरी लावलेला महाल दिसायचा. तर –

गाडी आली गाडी आली झुक् झुक् झुक्
शीट कशी वाजे बघा कुक् कुक् कुक्

म्हणताना जोर चढायचा. त्याने आगीनगाडी पाहिली होती. अजून त्याला त्यात बसायला मिळाले नव्हते एवढेच. म्हणून त्याची रानातली आगीनगाडी गुरांपाठी जाताना सुसाट पळे. तो इंजिन

बने. बाकीचे डबे बनत. कधीकधी एक एक डबा गळून पडे. इंजिन मात्र शिट्या वाजवीत पळत राही.

हळूहळू दौलत शाळेत रमू लागला.

त्यांच्या रानशाळेला नवा फळा मिळणार ही बातमी आनंदाने गुरुजींनी दिली. शाळेला चांगला फळा मिळाला पाहिजे ही गोष्ट त्यांनी गावकऱ्यांना पटवली होती. गावकऱ्यांना वाटत होते, शाळा काही फार दिवस चालायची नाही. परंतु शाळा चालू राहिली, मुले चार अक्षरे शिकू लागली, याचा आनंद गावकऱ्यांना झाला आणि गुरुजींच्या फळ्याच्या मागणीला त्यांनी होकार दिला. वर्गणी काढायला सुरुवात झाली. शिवाय शाळेचे आता दोन वर्ग झाले होते. मुले फळा यायची वाट पाहू लागली.

एके दिवशी मुलांना तो फळा दिसला. एका कोपऱ्यात तिकाटण्यावर एक भला मोठा काळा कुळकुळीत फळा उभा होता. गुरुजींसह मुले आनंदली होती. गुरुजींनी 'श्री' काढून फळ्याचे उद्घाटन केले.

दौलत वर्गाचा सेक्रेटरी बनला होता. त्याला पहिलीच्या मुलांचा अभ्यास पाहावा लागे. त्याचा अभ्यास झाला की, तो पहिलीच्या पोरांना एक, दोन काढायला शिकवी. नाही तर ग, म, नाही तर बाराखड्या शिकवी. गुरुजींच्या ऐटीत शिकविताना त्याला खूप आनंद होई. त्याला अधिक शिकावेसे वाटू लागले

एक दिवस झिपरू उड्या मारीत आला. तो खूप आनंदात होता. अंगांगातून त्याचा हा आनंद ओसंडत होता. उड्या मारीतच तो मुलांना म्हणाला – 'लेकानू लई गमज्या आलीया!'

पोरांनी त्याच्याभोवती कोंडाळे केले. दौलतने कान टवकारले. झिपरू सांगत होता – ' मी काल गावात गेलू होतू का ?'

पोरांनी माना डोलावल्या.

' तर तत म्या काय गमज्या पाह्यली ?'

एक पोर कावून म्हणाले – ' त्ये समदं खरं, पर लांबड किती लावतूयास ? सांग की झटक्यासरशी काय ती गमज्या !'

' आरं लेकानू, मी मोटार पाहृयली !'

' ह्या ! लबाड बोलतूयास !' एकजण म्हणाला.

लगेच गळ्यावर हात ठेवून झिपरू म्हणाला –' या गळ्याच्यान् म्या मोटार पाहृयली !'

' कशी असतीया रं ती मोटार ?' एकाने कुतूहलाने विचारले.

' आरं वसक्या घरावानी आसतीया. लहान असतीया. त्येला चार चाकं असत्यात. बैलगाडीच्या चाकावानी नव्ह बरं का ! ह्याची चाकं वायली असत्यात. आत माणूस दुसरं चाक हातानं फिरवतू, तशी चार चाकं पळायला लागत्यात.'

' आपल्या आगीनगाडीवानी ?'

' ह्या ! आगीनगाडी वायली ! मोटार वायली !'

तोवर गुरुजी वर्गात आले. मोटारीचा विषय अर्धवट राहिला. दौलतच्या मनात मात्र मोटार पाहायची उत्सुकता बळावली. त्याने ऐकले होते – मागे एकदा गावात अशीच मोटार आली होती तर आपला मामा सहा-सात मैल चालत गेला होता ती मोटार पाहायला. त्याच्यासारखे आणखी बऱ्याच गावचे लोक पायी चालत

आले होते ती मोटार पाहायला. आपण मोटार पाहायची हे दौलतचे स्वप्न बनले.

दिवस मावळला कधी, उगवला कधी हे लक्षात येत नव्हते. इतक्या झपाट्याने दिवस पालटत आहेत असे दौलतला वाटत होते. दुसरीचे वर्ष पार पडले. दुसरीत दौलतचा पहिलाच नंबर आला.

गुराच्या पाठी तो उत्साहाने जात होता. एक मात्र झाले होते. हळूहळू हिराला शाळेत यावेसे वाटू लागले. पण तिच्या आईने तिला शाळेत पाठविले नाही. मुलीच्या जातीला काय करायचे शिक्षान् असे तिचे मत होते. उलट चांगली सोयरीक आली तर ती हिराचे लवकर लग्न करणार होती. हिराला तर शिकावेसे वाटू लागले. दौलत–हिरा भांडायचे. पण हिरा चांगली मैत्रीण होती. दौलतने हिराला शिकवायचे ठरविले. दोघे झाडाखाली थांबत. हातात काटकी घेऊन तो धुळीवर अक्षर काढी. हिराकडून ते धुळीवर काढून घेई. अक्षर गिरवून घोकायला लावी बिनपाटी–पेन्सिलीचे हिराचे शिक्षण खऱ्या रानशाळेत चालू झाले.

हळूहळू हिरा बरेच काही शिकली. हिराला कविता म्हणता येऊ लागल्या. वर्गातल्या कुणाचे तरी पुस्तक तो मागून आणे. ते तिला वाचायला लावायचा. हिरा पुस्तक वाचायचा प्रयत्न करी. अक्षरे लावूनलावून वाचे. तेव्हा दौलतला खूप आनंद होई. हिराचा आनंदही गगनात मावायचा नाही.

फुला–लखाला शिकवतो म्हणून दौलत म्हणायचा. त्यांना ते आवडायचे नाही. औरंगा एखादे अक्षर काढायचे पाहायचा. अक्षर

आले की त्याला बरे वाटे. नाही काढता आले की काडी मोडून टाकायचा. पायाने धूळ उडवायचा. बाकीचे खेळात रमायचे. दौलत-हिरा खेळात भाग घेत, पण तासभर अभ्यासासाठी वेगळा काढत.

आता दौलत तिसरीत होता. आताशी त्याला कपड्याची वानवाच होती. मामाचा संसार वाढला होता. बायको–मुलांचे करताकरता तो मेटाकुटीला आला होता. त्याचे दौलतवरचे प्रेम कमी झाले नव्हते. अधूनमधून तो त्याला खायला काही तरी घेऊन द्यायचा. परंतु लाडक्या भाच्याला सद्रा घेणे त्याला जमेना. चंद्रालापण जमेना. त्यात शेतमजुरीचे काम बारा महिने नसायचे, म्हणून तिने एक जाते घेतले होते. दुसऱ्यांचे दळण दळून द्यायला सुरुवात केली होती. कांडायचे, चटणी कुटायचेही ती काम करी. भल्या पहाटे उठून ती ओव्या म्हणत दळत असे. एवढे काम करून हातातोंडाशी गाठ पडत होती. मग पोराला सद्रा घेणे कसे जमणार? दौलतने सद्रा घे म्हणून हट्ट केला नाही. लंगोटीवर वावरायला त्याला लाज वाटत नसे. कारण त्याच्यासारखी आणखी बरीच पोरे आसपास लंगोटीवर वावरणारी होती. एका गोष्टीची मात्र त्याला भीती वाटे. गावात जायला त्याला नको वाटे. केस कापायला गावात जावे लागे. चमनगोटा करून यावे लागे. गावापेक्षा त्याला वाडी बरी वाटे. गावात अंगभर कपडे घालणारी बरीच माणसे होती. त्यांचे वागणे-बोलणे वेगळे वाटायचे. त्यांच्या मानाने आपण जंगली आहोत असे दौलतला वाटे. म्हणून तो तिन्हीसांजेचा गावात जाई. केस कापून गुपचूप वाडीला परत येई. वाडीत आल्यावर त्याला हायसे वाटे.

शिंदेगुरुजींचा दौलतवर जीव बसला होता. ते त्याला मना-

पासून शिकवीत. गणित चांगले करून घेत. शुद्ध लिहायला-बोलायला शिकवीत. पुढच्या वर्षी सेंटरच्या परीक्षेत त्याचा वरचा क्रमांक यावा म्हणून ते आतापासून झटत होते. त्यांची रानशाळा नावाजली जायला पाहिजे होती.

होताहोता दौलतीचे चौथीचे साल उजाडले. वर्गात खच्चून गर्दी असायची. दौलत त्याच्या वर्गाचा सेक्रेटरी होता. दुसरी-तिसरीच्या वर्गाकडे त्याला लक्ष द्यावे लागे. गुरुजी पहिलीच्या मुलांना शिकवीत, तेव्हा दौलत दुसरीच्या मुलांनी सोडविलेली गणिते बरोबर आहे की नाही ते पाही. तिसरीची मुले इतिहासाचे प्रश्न सोडवतात की टिवल्याबावल्या करतात याकडे लक्ष देई. किंवा चौथीची मुले निबंध लिहितात ना, दुसरीची मुले पाढे नीट म्हणतात ना, हे पाही. दौलती हे सारे आपला अभ्यास करून करायचा. हिराला रानात शिकविणे चालूच होते.

या वर्षी दौलत विशेष खूष होता. त्याची सेंटरची परीक्षा होती. आणि ती पंढरपूरला होणार होती. परीक्षेच्या निमित्ताने त्याला पंढरपूरला जायला मिळणार होते. अधूनमधून पंढरपूर कसे असेल त्याची तो कल्पना करे. ते किती मोठे शहर आहे, विठ्ठलाच्या दर्शनाला येणारी खूप माणसे आहेत, मग तिथे वक्कळ गर्दी असेल. कारण 'आषाढ-कार्तिक वारीला मानसं मायंदाळ येत्यात. गर्दीत चेंगरत्यात. पर इठ्ठलाच्या पायावर डुई ठिवल्यावर परब्रह्म गवसल्यासारखं वाटतं. अशी म्हातारी माणसे म्हणताना त्याने ऐकले होते. 'परब्रह्म' वगैरे त्याला कळले नाही. पण तिथे गर्दी असते एवढे लक्षात आले. शिवाय त्याला तिथे मोटार पाहायला मिळणार होती!

० ० ०

९:

एक दिवस रानात सगळी सूरपारंब्या खेळत होती. दौलत नेहमी रिंगणातील काठी मिळविण्याचा प्रयत्न करायचा. त्यासाठी तो झाडावरून धडाधड उड्या मारायचा. गडी पकडायला जवळ आला की, माकडासारखा झर्रकन् झाडावर चढायचा. पण आजचा खेळ रंगत नव्हता. हिरा अजन आली नव्हती. शेवटी औरंगा कंटाळून म्हणाला, 'समदी झाडाव माकडासारकी वसल्याती. कुनीबी काटी उचलायचं वगंना. आमी आपलं रिंगणापाशीच वसून न्हावं का ?' आणि रागारागाने त्याने रिंगणातील काठी उचलली. गुढघ्यावर मोडली. फेकून दिली. आणि आपण ओढ्याकडे पळाला.

हिरा दोन दिवस रानात आलीच नाही. तिसऱ्या दिवशी उशीरा आली. त्यासरशी चारी वाजूंनी तिला सर्वांनी वेढले. प्रश्न विचारू लागले.

'रानात दोन दिस का आली न्हाईस ?'

'जिवाला बरं नव्हतं का ?'

'कुनी पावनं आलं व्हतं का ?'

शेवटच्या प्रश्नाला तिने मुंडी हलवली.

'कोन पावनं आलं व्हतं !'

फुला पुढे सरसावली. म्हणाली, 'माजी आय म्हनत व्हती, हिरीचं लगीन ठरलं. पावना लई बेस हाय !'

औरंगा म्हणाला – 'व्हय गं ?'

लखा म्हणाला – ‘ हिरा, तुजं लगीन हाय ? ’

जगू हसत म्हणाला – ‘ एका मानसाची मज्जा हाय मंग ! ’

दौलत काळजीने म्हणाला – ‘ आता आपल्या साळंचं कसं गं ? ’

औरंगा आगाऊच . तो म्हणाला –‘ आता नवरा शिकवल की ! ’

फुला प्रौढपणे म्हणाली – ‘ ती आता संसार कराय शिकायची बाबा ! ’

हिरा आपली गुमसूम बसून राहिली. सर्वांनी तिला आपल्या परीने चिडवले आणि इकडेतिकडे पसार झाली.

दौलत झाडाच्या खोडाला टेकून बसला होता. हिराला तो म्हणाला – ‘ हिरा, लगीन म्हंजे लई मज्जा नव्हं ? डागडागिनं घालाय मिळतील. नवं कापडं मिळतील . लाडू-पुरी खायला मिळल. आनी समदी कौतिक करत्याली ! ’

हिरा काडीने धुळीत रेषा काढीत होती. म्हणाली – ‘ दौलू, आपली साळा बंद पडनार म्हणूनशान वायट वाटतं. ’

‘ व्हय गं ! तुला शिकवायला मज्जा वाटायची. पर तुझ्या नवऱ्याला लिहायवाचाय् येत असंल की ! तो शिकवल तुला ! ’

हिरा बारीक तोंड करून म्हणाली, ‘ त्येस्नी म्हनं काय बी लिहाय्वाचाय् येत न्हाय. नांगरगट्ट हायती. मी म्हटलं, आयला – माजं कशापाई लगीन करतीस ? तर आय म्हंती कशी – मंग कुवार ठेवू व्हय तुला ? चांगलं पावनंपै हायती घरादाराचा वारदाना ह्याक् हाय ? तुला काय देव्हयान्त ठिवून

पुजायची हाय का ? उगं शिंगं फुटल्यावानी करू नगं ! मंग गप बसलू.'

थोड्याच वेळात ते नेहमीसारखे खेळू लागले. हिराला चिड-वायला लागले. हिरा पण 'आपण लगीन न्हाय करनार' म्हण-णारी खुपीत आली. लाजायला लागली. लग्नात नवीन कपडे, दागिने मिळणार हे काय कमी अप्रूप होते ?

आणि खरोखरीच पुढच्या पंधरा दिवसात हिराचे लग्न झाले. भले मोठ्ठे बाशिंगाच्या झुरमुळ्याने हिराचे तोंड झाकले होते. पिवळ्या साडीच्या बोंग्यात ती गुडमळून गेली होती. हात हिरव्या बांगड्यांनी भरले होते. हिराला अशी नवरी झालेली पाहून दौलतला हसूच आले. त्याला वाटले – परकरपोलक्यातली हिरा बस दिसत होती. तिच्या शेजारी आडमापाचा नवरा बाशिंग कपाळावर मिरवीत उभा होता. त्याला पाहून दौलतला नकळत भीती वाटली. लग्नात इकडेतिकडे त्यांचा चमू फिरला. रानात गेला. हिराच्या लग्नातली मजा आठवून सारे हसत होते.

रात्रीचे चंद्रा त्याला म्हणाली – 'तुज्यासाटी आटवनीनं हिराच्या आयनं लाडूचिवडा दिलाय. तो खा.'

'सकाळचं खाईन. शिकाळ्यात ठिव.' दमून दौलत म्हणाला व झोपी गेला.

हिरा गेली आणि रानातली मज्जा गेली. तरी ती नवीननवीन खेळ शोधून काढून खेळत. दौलतला मात्र नवा शिष्य कोणी भेटला नाही. निवांत झाडाखाली पडला तर इतिहास–भूगोल–कविता यांची उजळणी करी.

परीक्षेचे दिवस जवळ येऊ लागले तसे गुरुजींनी चौथीच्या पोरांना आपल्या घरी अभ्यासाला यायला सांगितले. पहाटे त्यांचा वर्ग सुरू होई. काही पोरे रात्री गुरुजींच्या घरी झोपायला जात. पहाटे गुरुजींच्या घरी शाळा भरल्यासारखी वाटे. काही मुलांना झोप आवरत नसे. ती पेंगायला लागत. मग गुरुजी त्यांना डोळ्यांना पाणी लावायला सांगत. गणित, तोंडी हिशेब, पाठांतरे करायला लावत. निबंध कसा लिहावा हे सांगत.

दौलत रोज पहाटे उठून गुरुजींच्या घरी जाई. एकट्याला पहाटे त्यांच्या घरी जायची त्याला भीती वाटत नसे. जात्याच्या घरघरीने आणि आईच्या मंजुळ ओव्यांनी त्याला जाग येई.

कधीकधी तो लाडाने आईच्या मांडीचे उसे करून पडे. डोळे मिटून ओव्या ऐकत राही. आई कधी मामावरून तर कधी त्याच्यावरून ओव्या म्हणी –

आज पहाटे चंद्रा म्हणत होती –

‘ वहीण भांवडं ग बाई एकाच माईचं
तोडून दूर करता फूल सुकतं जाईचं
दिल्या घेतल्यानं पुरेना ऐरावती
बंधू तुमची गोड बोलाची रसवंती
महादेवाच्या पिंडीवरी वाहीले ग जोड गहू
अग माझे शेजीबाई पोटी पुत्र दौलू बाळ
पाठी भाऊ भास्करराव
साखरेचा खडा दौलू बाळाला देला कोनी
भाई राजस ग माझा गेला असल दाराऊनी

एकुलता एक म्हनू नग शेजीबाई
माझा भाईराज मला शंकराच्या ठाई

चंद्राच्या या ओव्या जात्याच्या घरघरीत गोड वाटत होत्या. ओव्या ऐकून दौलतला नेहमीसारखे कळले, आईची माया मामावर आणि आपल्यावर किती आहे. मामाचासुद्धा दौलतवर खूप जीव होता. परिस्थितीने तो नाडला होता म्हणून त्याला मनात असूनही काही करता येत नव्हते.

काल रात्रीचा प्रसंग त्याला आठवला. मामा आईशी बोलत होता – 'चंद्रा, आवंदा दौलू परीक्षेला पंढरपूरला जाणार !'

' व्हय. '

'मंग त्येची जायाची तय्यारी कराया लागलीस का ? '

' तय्यारी कसली करायची ? '

तो उसळून म्हणाला – 'त्या शारगावात दौलूला काय तू लंगोटीवर पाठवनार ?'

'मंग काय करू ? त्येला वाटखर्चीला पैसे देयाला होवंत. '

' व्हय. पर पोराला योक सद्रा-चड्डी घेयला पाहिजे.'

' ते कसं जुळावं गा ? '

' न जुळाया काय झालं ? जुळवलं की समदं जुळतं.'

'मला काय बी कळत न्हाय. तूच युगत सांग. '

'हं गा असा !' तो समाधानाने म्हणाला, ' मी दौलूला सद्रा घेऊनशान देतू. तू चड्डी घ्यायचं जमव. काय ? '

चद्राने होय म्हटले.

दौलतला मामाची माया अशी दिसायची . मामा-आईला आपला काळजी आहे तर आपण शिकून त्याचे पांग फेडायचे असे तो मनाशी घोकत राही. मागे शाळेची तपासणी करायला एक साहेब आले होते. ते खूपच रुबाबदार, हुशार वाटत होते. तसे आपण व्हायचे त्याने ठरवून टाकले.

आता चंद्रा म्हणत असलेल्या ओव्या ऐकून त्याला कालचा हा प्रसंग आठवला. दिव्याच्या प्रकाशात चंद्राचे जाते ओढणे आणि तिच्या चेहऱ्यावरचे प्रेमळ भाव पाहून त्याला आनंद झाला. आईची माया वाटू लागली.

तो उठला. चंद्राच्या कुशीत डोके घुसळले. चंद्राने त्याला गोंजारले. म्हणाली – 'उठलास माज्या राजा ! आता त्वांड धू पटसरशी. गुर्जीकडं जा बिगी बिगी.' आणि पुन्हा ती दळू लागली. सर्व आटोपून पाटीदप्तर घेऊन तो गेला.

भास्करने बोलल्याप्रमाणे दौलतला सद्रा घेऊन दिला. चंद्राने चड्डी आणली. दोघांनी त्याला कपडं घालायला लावले. भास्कर कौतुकाने म्हणाला – 'चंद्रे, पोरगं कसं नवरदेवावानी दिसतुया !'

'व्हय र दादा !' म्हणत तिने त्याची मीठ–मिरच्यांनी दृष्ट काढली. दौलत लाजला. दोघांच्या पाया पडून पळाला तशी दोघे हसू लागली.

होताहोता, पंढरपूरला जाण्याचा दिवस उजाडला. चंद्राने भाकऱ्या-डाळ-कांदा केला. गुळाच्या कापऱ्या केल्या. ही शिदोरी बांधली.

भास्करने त्याला चादर दिली. टाक–दौत, पुष्टा, पाटी वगैरे

सामान पिशवीत भरले. चंद्रा–भास्करने त्याला तीन तीनदा सांगितले –' इठ्ठलाचं दरसन घे. परसाद आण.' चंद्राने वाटखर्चीचे पैसे गुरुजीपाशी दिले होते. पालकांनी आपली पोरे गुरुजींच्या ताब्यात दिली. गुरुजींनी पोरांची कसलीही काळजी करू नका म्हणून पालकांना सांगितले. मग सगळे रांगेने आपला बाडबिस्तरा डोकीवर, खांद्यावर, हाती घेऊन गावाला जायला निघाले. अकोला (वासूद) पासून सहा फर्लांगावर स्टेशन होते. तिथपर्यंत सर्व-जण आले.

वहुधा सगळी मुले पंढरपूरला पहिल्यांदाच निघाली होती. एखादाच वारीच्या निमित्ताने गेला होता, पण तेही बैलगाडीतून. रेल्वेतून त्यांचा हा पहिला प्रवास होता. त्यामुळे सगळी खुषीत होती. प्रत्येकाच्या मनात आगगाडीचे गाणे घोळत होते – गाडी आली, गाडी आली, झुक् झुक् झुक् !

आणि खरेच आगगाडी स्टेशनात झुक् झुक् झुक् करत आली.त्या इंजिनाचे मोठे धूड पाहून त्यांना मजा वाटली. गुरुजींच्या आदेशा-नुसार हा चमू एका डब्यात घुसला. जागा मिळेल तिथे बसला. ज्यांना जागा मिळाली नाही ते आपल्या पेटीवर बसले. काही खिडकीपाशी उभे राहिले. सगळी मुले गंमतशीर दिसत होती. सगळ्यांच्या चेहऱ्यांवर लढाई मारल्याचा आनंद होता. डोळ्या-तून उत्साह ,कुतूहल डोकावत होते. शिवाय गुरुजी दिसले नाहीत. तर भेदरायला होत होते. सांगोला–वामणी–भोवाळी स्टेशने घेत गाडी पंढरपूरला आली. पंढरपूरला उतरल्यावर स्टेशन आणि तेथली गर्दी पाहून पोरे पार भांबावून गेली. गुरुजींनी त्यांना पुन्हा ओळीने गावात नेले. चालताना पोरे आजूबाजूला टकाटका पाहात होती. एकमेकांना सांगत होती –' मायला ! काय मोटं शार हाय ! '

अचानक पों पों आवाज आला. झरदिशी एक धूड पाठी-मागून येऊन पुढे गेले.

' गुर्जी, गुर्जी – काय गेलं ? ' पोरांनी विचारले.

गुरुजी उत्तरले – ' मोटार. '

दौलत मनात म्हणाला – आयला ! अशी मोटार असतीया व्हय ! काय या वाटंवरनं माणसावानी मुळ्कन् गेली ! आवाज बी काय झ्याक हाय मोट्रीचा!

सर्व मुलांना गुरुजींनी एका धर्मशाळेत आणले. त्यांची व्यवस्था लावली. पोरांना बसवून ते बाहेर गेले. पोरे ' पंढरपूर शारा ' च्या कौतुकात मग्न झाली.

गुरुजी परत आले. म्हणाले – ' उद्या परीक्षा सुरू. तुमच्या परीक्षेची सोय कुठं आहे हे पाहून आलो. आता निवांत झालो. चला, विठामाऊलीचं दर्शन घेऊन येऊ या. पण आधी जेवून घेऊ. मग जाऊ.'

सर्वांनी आपआपली शिदोरी सोडली. पोटभर जेवण झाले.

पोरांनी खुषीने रांग केली. विठ्ठलाचे दर्शन घ्यायला निघाली. देवळाजवळ आली. काहींनी उदकाडी, फुले घेतली. नामाच्या पायरीचे दर्शन घेऊन पोरे आत गेली. गरुडमंडपात भक्तांची गर्दी होती. कोणी उड्या मारून कान पकडत होते. पापाची माफी मागत होते. कोणी भान हरपून विठ्ठलाच्या मूर्तीकडे लांबूनच एकटक पाहात उभे होते.

दौलतने विठ्ठलाच्या पायावर डोके ठेवले. देवाच्या पायाशी

मागणे मागायलाही त्याला सुचले नाही, तोवर त्याला वडल्यांनी ओढून बाजूला केले. आठवणीने त्याने पुडीत अंगारा घेतला.

धर्मशाळेत सर्व परतली. हातपाय धुऊन गुरुजींनी त्यांना अभ्यासाला बसविले. पेपर कसा लिहायचा हे पुन्हापुन्हा सांगितले. प्रत्येकाचा टाक तपासून पाहिला. बऱ्याच सूचना दिल्या. शांत मनाने पोरांना झोपायला लावले.

परीक्षा पार पडली. दौलतचे पेपर सोप्पे गेले.

गुरुजी त्यांना रोज चंद्रभागेत आंघोळ करायला नेत. परीक्षा झाल्यावर त्यांना नावेत बसवून आणले. पंढरपूर फिरवून दाखविले पण मुलांना मोटार दिसली की खूप आनंद होई. ती भान हरपून मोटारीकडे पाहात राहात. दौलतच्या मनात मोटार ठसली. परीक्षेपेक्षा पंढरपूर पाहायला मिळाले, आगीनगाडीत बसता आले, याचाच आनंद मुलांना अधिक झाला होता.

सर्व मुलांना घरोघरी पोहोचविल्यावर गुरुजींना हायसे वाटले.

दौलत चंद्रा–भास्करला पंढरपूरच्या गंमतीजमती सांगण्यात रमून गेला. अंगारा–प्रसाद त्याने आठवणीने त्यांना दिला. पोराला लहान वयात परीक्षेच्या निमित्ताने का होईना विठ्ठलाचे दर्शन घडले, आपल्याला अंगारा–प्रसाद मिळाला; म्हणून त्या दोघांना आनंद झाला.

परीक्षा झाली. आता शाळेचा तगादा नव्हता. तो आपल्या मैतरांबरोवर खेळण्यात रमून गेला होता. अधूनमधून तो टेलरमामाकडे जाऊ लागला. शिलाईचे काम शिकू लागला. हातशिलाई, काजे, बटणे करण्यास तो शिकला. चंद्राला कामाला मदत करू लागला.

दिवस पांखराच्या उडण्यासारखे झर्कन् पळत होते.

एक दिवस सकाळीसकाळी गुरुजी आनंदाने ‘ दौलत, ए दौलत ’ अशा हाका मारत आले. दौलत पटकन् बाहेर आला. पाठोपाठ चंद्रा. चंद्राला पाहून गुरुजी हसत म्हणाले, ‘ दौलतच्या आई, आज आमचं तोंड गोड करावं लागणार तुम्हाला अहो, दौलत सेंटरच्या परीक्षेत पहिला आला आहे.’

चंद्राला लवकर काही कळेना.

दौलचा आनंद पोटात मावेना. तो म्हणाला – ‘ खरं गुर्जी ? ’

‘ होय रे ! तू सेंटरला पहिला आला आहेस. रानशाळेचं नाव काढलंस. तुझ्या गुरुजींचं नाव काढलंस ! ’

तेव्हा कुठे चंद्राच्या डोक्यात प्रकाश पडला. आपले पोर पास झाले याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर पसरला. ती घरात गेली. गाडग्यामडक्याशी खुडखुड करून तिने गुळाचा खडा आणला. गुरुजींना म्हणाली, ‘ गुर्जी, ह्येनं तोंड गोड करा. तुमच्या कारनं पोराला याश आलं. इठ्ठल पावला. ’

गुरूजींनी गुळाचा खडा घेतला. अर्धा केला. आपल्या हाताने दौलतच्या तोंडात गुळाचा खडा घातला आणि आपणही तोंड गोड करून घेतले.

भास्कर गुरुजींचा आवाज ऐकून आला. म्हणाला – ‘ काय वं गुर्जी ? ’

गुरुजींनी मोठ्या उत्साहाने बातमी सांगितली. भास्कर आनं-दला. म्हणाला, ‘ भाचा कुनाचा गुर्जी ! नाव काढलं आमच्या

दौलूनं. ' पुढे म्हणाला, ' गुर्जी, रानशाळा निगाली त्ये बेस झालं. वाडीची पोरं चार शबुद शिकाय लागली आता आमच्या दौलूचंच बगा. न्हाय, हर्त साळा असती तर शिकला असता का ? आन् पंढरपूरच्या परीक्षेत पयला आला असता का? म्हनूनशान म्हंतो, तुमची साळा चालवायची कामगिरी झ्याक हाय. '

गुरुजी म्हणाले, 'दौलतसारखा हुशार विद्यार्थी मिळाला की, आम्हा शिक्षकांना आनंद होतो. आता एक करा. पोराला पुढं शिकवा. आमच्या रानशाळेत पाचवी इयत्तेपर्यंत शाळा आहे. त्याला पुढच्या शिक्षणासाठी कडलासला पाठवा. त्याची शाळा थांबवू नका. '

हा मुद्दा कोणाच्याच लक्षात नव्हता. कडलासला शिकायला जावे लागेल याची कल्पना नव्हती. तरी भास्कर म्हणाला, ' न्हाय वा. आमी पोराला घरी वशिवनार न्हाई. काय त्येला साळंला कडलासला पाटवावं लागलं तर पाटवू की. पर आमचा दौलू शिकाय् पायजे. '

त्या रात्री दौलत आईचा पदर अंगावर घेऊन आनंदाने झोपला.

पाचवीचे वर्ष आले आणि संपले. शाळा, गुरेराखण, जळणकाडी मरपणासाठी गोळा करणे यात एका कामाची भर पडली होती. चंद्राने एक शेरडी घेतली. या शेरडीला गुरांबरोबर न्यायचे. तिला पाला आणून टाकायला लागायचा. शिवाय आईने दळलेली दळणे अधूनमधून ज्याच्यात्याच्या घरी पोहोचवायची.

दौलत पाचवी पास झाला. आता आपण कडलासच्या शाळेत जायचे याचा आनंद त्याला होऊ लागला. ० ० ०

कडलासला दौलतला घेऊन स्वत: शिंदेगुरुजी गेले. तिथल्या शाळेत नाव घातले. तिथले हेडगुरुजी रामराव पाटील होते. सेंटरच्या परीक्षेत पहिला आलेला मुलगा आपल्या शाळेत आला याचा आनंद त्यांना झाला. सहावी-सातवी अशा दोन इयत्ता दौलत तिथे शिकणार होता. सातवीची ही सेंटरची परीक्षा. आता-पासून या मुलाकडे आपण लक्ष ठेवायचे असे त्यांनी ठरविले.

शिंदेगुरुजींनी सांगितले – 'हा मुलगा हुशार आहे. एकपाठी आहे. अक्षर उत्तम आहे. याच्याकडं लक्ष ठेवा. घरची परिस्थिती फारशी बरी नाही. याला आई त्याच्या पित्यामागं सांभाळते आहे. वह्या–पुस्तकं घ्यायचीही याची परिस्थिती नाही. याला नादारी द्या आणि वर्गातली कुणाची तरी पुस्तकं अधूनमधून वाचायला देत चला. वह्या कशावशा घेऊन देऊ.'

रामराव पाटलांनी दौलतला फी माफ केली.

दौलत नव्या शाळेत दाखल झाला आणि इकडे शिंदेगुरुजी माढ्याला तलाठी म्हणून नव्या नोकरीवर रुजू झाले. गान-शाळेत मोरेगुरुजी नवीन आले.

नव्या शाळेची इमारत, सुंदर तक्ते, नकाशे, काळेकुळकुळीत मोठे फळे, बसायला पट्ट्या, हवेशीर वर्ग – पाहून दौलत खूष झाला. शिवाय शाळेचे आवार स्वच्छ, नीटनेटके होते. खेळायला ग्राउंड होते.

नकातेवाडीपासून कडलास तीन मैलांवर होते. रोज हे

अंतर त्याला पायी चालत जाऊनयेऊन कापावे लागणार होते. त्याला ११ ते ५ वाजेपर्यंत शाळेत जावे लागणार होते. त्यामुळे त्याचे गुरे राखणे बंद झाले. त्याची मिळणारी मजुरीही बंद झाली. तरी चंद्राने त्याला शिकवायचे ठरविले. थोडी नड काढायला ती तयार होती. शिवाय नुसत्या लंगोटीवर आता दौलतला शाळेत पाठविता येणार नव्हते.

नव्या शाळेचा पहिला दिवस होता. घरातून तो मोठ्या उत्साहाने लवकर निघाला. तीन मैलांची वाट जणू त्याने पळतच काटली. शाळेच्या आवारात आला तेव्हा तिथे कुणीच नव्हते. तो हिरमुला.

थोड्या वेळाने एकएकजण येऊ लागला. विठ्ठलपण आला. कडलासला त्याचे मामा होते. त्यांच्याकडे राहून तो शिकणार होता. जुन्या वर्गमित्रांपैकी विठ्ठलला तिथे पाहून दौलतला आनंद झाला. विठ्ठलही खूप झाला. दोघे गप्पात रंगून गेले. वर्ग उघडले तसे ते आपल्या वर्गात गेले. शाळेचा पहिला दिवस फर्रकन् गेला. दौलत आनंदाने घरी परतला. येताना शेरडीसाठी पाला आणायला तो विसरला नाही. शेरडी गाभण होती. तिची काळजी घ्यावी लागे.

रोज तो लवकर उठे. शेरडीला फिरवून आणे. तिला पाला टाके. मग न्याहरी करून फडक्यात भाकरी घेऊन तो दप्तर उचलायचा. शाळेच्या दिशेने चालायला लागायचा.

पण वाटेने कधी तो भराभरा जात नसे. रमतगमत चाले. मध्येच शीळ वाजवी. मध्येच पळायला सुरुवात करी. एखादे नवीन पाखरू दिसले की त्याच्या मागे लागे. सरडा दिसला

तर दगड मारूनमारून त्याचा चेंदामेंदा करी. मगच त्याचे पुढे पाऊल पडे. शिवाय वाटेकडेची शेते तो निरखायचा. बांधावरच्या वेलीला काकड्या-वाळके दिसली की अंदाज घेई. आजूबाजूने चौफेर नजर टाकी. हळूच शेतात घुसून ती काकडी वा वाळूक खुडून घेई. अल्लद वाटेवर येई. मग मजेत ती खात वाट चालू लागे.

शाळेकडे येताजाता त्याला असा रानमेवा बराच मिळे. त्याची वाढती भूक त्याने शांत होई. तुरीच्या शेंगा, मक्याची कणसे, हरभरा, भुईमुगाच्या शेंगा, गाजरे याकडे त्याची विशेष नजर असे.

एक दिवस असाच तो भुकेजला होता. कबड्डी खेळून दमला होता. त्याच्या शाळेच्या कबड्डी संघात त्याला घेतले होते. त्याचा सराव मधल्या सुट्टीत आणि शाळा सुटल्यावर एक तास होई. खेळूनखेळून त्याला भूक लागे. घरी जाऊन भाकरी खाईस्तोपर्यंत त्याला दम नसे. खेळून तो वाटेला लागला. भूक लागली, ती थांबेना. नेहमीप्रमाणे त्याने इकडेतिकडे नजर टाकली. एका शेतात भुईमुगाचे वेल छान पसरले होते. पलीकडे जोंधळा उभा होता. त्याला कुणाची चाहूल दिसेना. तो शेतात घुसला. चारदोन वेल त्याने उपटले. शेंगा मुळाला छान भरल्या होत्या. आणखी वेल उपटायला तो वाकला तो पाठीमागून जोरदार बायकी आवाज आला – 'त्येला पटकीचा फोड उठला! कोन हाय वावरात?'

दौलत गांगरला. पळावे तरी पंचाईत. खुरपे हातात घेऊन एक बाई त्याच्या पाठी उभी होती. पटकन् तिने त्याचे मनगट

धरले. म्हणाली – ‘ मुडदा वशिवला तुजा. हे धंदं करतोस व्हय ! ’

दौलत सरळ म्हणाला – ‘ वाईच भूक लागली व्हती. ’

‘ शेंगाची भूक लागली व्हती व्हय रं तुला ? थांव तुजी चांगली भूक काडते ! ’ त्याच वेळी तिचे लक्ष त्याच्या दप्तराकडे गेले. तिने विचारले – ‘ कुनाचा तू ? ’

भीतभीत त्याने सांगितले.

‘ म्हंजे तू नकातंवाडीचा व्हय ? ’

तो ‘ होय ’ म्हणाला.

‘ ह्या पिसवीत काय हाय ? ’

‘ माजी पाटी–पेन्सल आन् लिवायची बुकं. ’

‘ कुटल्या शाळंत जातूस ? ’

‘ ह्या, कडलासच्या. ’

‘ रोज चालत जातूस-येतूस ? ’

‘ व्हय. ’

यावर तिने काही विचार केला. मग म्हणाली – ‘ आजच्या डाव तुला सोडतू. जा. घ्ये त्ये येल. पर पुन्यांदा तू माज्या वावरात पाय टाकू नगंस. ’ म्हणत ती पाठमोरी होऊन जोंधळ्यात दिसेनाशी झाली. दौलतला हायसे वाटले. मग मजेत शेंगा खात तो घरी परतला.

कवड्डीचा संघ सांगोला इथे खेळायला गेला. अनेक शाळांचे

संघ तिथे आले होते. व्यवस्थेला सावंतगुरुजी दौलतच्या संघाबरोबर आले होते. शाळेचा एक वर्ग त्यांना देण्यात आला होता. परगावांहून आलेले संघ खुषीत होते. एकमेकांकडे कुतूहलाने पाहात होते. यांपैकी कुणाबरोबर खेळावे लागणार असा प्रश्न त्यांच्या मनात येत होता.

मैदानात दौलतचा संघ धडधडत्या काळजाने उतरला. विरुद्ध संघाची पोरे जरा चढेल वाटत होती. सावंतगुरुजींनी मुलांना धीर दिला. सांगितले, 'मनात काही आणू नका. फक्त चांगलं खेळा. बस्स.' मग सगळी मुले आपला खेळ दाखवायला आसुसली. ही पोरे अशी धमाल खेळली की, सावंतगुरुजींचा आनंद चेहऱ्यावर मावेना. त्यांनी विरुद्ध संघाचा एक लोणने पराभव केला. फायनलपर्यंत त्यांचा संघ जिंकत गेला. शेवटी त्यांची गाठ पडली सांगोला संघाशी. सांगोल्याचा कबड्डीचा संघ गाजलेला होता. दर वर्षी त्यांना बक्षीस मिळत असे.

सावंतगुरुजी या वेळीही म्हणाले – 'पहिल्यांदा सांगितलं तेच सांगतो. लक्षात ठेवा. प्रत्येक वेळी जीतच होईल असं नाही. आपल्या संघातील खेळाडूंनी आपला खेळ दाखवावा. संघ खेळातलं कसब दाखवावं. एकमेकांना सहकार्य देऊन खेळा. काय दौलत? कारण एखादेवेळी तू उतावळेपणा करतोस. खेळताना चिडू नका. ईर्षेनं खेळा.'

दौलत खजिल झाला. त्याचा उतावळेपणा संघाला धोक्यात आणीत होता. संघाचा नायक अशोक राऊत उत्तम खेळणारा. तो सर्वांना सांभाळून घेत होता.

सांगोल्याची मुले दाणगट होती. कडलासच्या संघातील मुले त्या मानाने खूपच लहान वाटत होती. परंतु चिवट होती.

शेवटचा हा सामना अटीतटीचा झाला. राऊतने आपल्या कौशल्याची कमाल केली. दौलतने त्याला ईर्षेने साथ दिली. हा सामना जिंकायला सांगोला संघाला फार जड गेले. अवघ्या दोन गुणांनी त्यांनी कडलास संघाचा पराभव केला.

हा खेळ पाहायला उपस्थित असणारे सर्व प्रेक्षक कडलासच्या बाजूने होते. मधूनमधून आवाज उठवून ते प्रोत्साहन द्यायचे —

शाबास रे गब्रू !

हां गा असा !

भले शाबास !

झ्याक ! झ्याक हां !

आरं ! हो ऽ हो ! दमानं घे, दमानं घे !

भले पठ्ठे !

या उद्‌गारांनी अशोक, दौलत, विठ्ठल, राम यांना चेव यायचा. त्यांचा पराभव झाला, पण सावंतगुरुजींना त्याचे वाईट वाटले नाही. त्यांचा खेळ सर्वांच्या कौतुकाचा विषय झाला होता. गावकऱ्यांनी कडलासच्या मुलांचे कौतुक करावे म्हणून उत्स्फूर्त दहा रुपयांचे बक्षीस दिले.

कडलासला या वीरांचे स्वागत हर्षाने झाले. चंद्रा-भास्करला दौलू सांगोल्याला जाऊन आला, चांगला खेळून आला याचे अप्रूप वाटले.

पुन्हा दौलतचे रहाटगाडगे सुरू झाले. आता एका शेरडीचे तीन झाले होते. त्यांच्या शेरडीला दोन करडे झाली होती. सकाळी त्यांना फिरवून आणताना दौलत खुषीत असे.

अभ्यास उत्तम रीतीने कसा करावा याचे धडे पाटीलगुरुजी दौलतला देत असत. इथेही सहाव्या इयत्तेत दौलत पहिला आला. शरद जोशी हुषार होता. घरातून त्याला अभ्यासाचे मार्गदर्शन असे. वह्या-पुस्तकांची कमतरता नसे. आणि दौलतच्या घरी वेगळे चित्र होते. चंद्राला, भास्करला त्याच्या अभ्यासाचे काही कळत नसे. तो अभ्यास करतो की काय करतो याकडे त्यांचे लक्ष नसे. विठ्ठलकडून पुस्तके मागून अभ्यास करावा लागे. वह्या जपून वापराव्या लागत. तरीही दौलतने आपला पहिला नंबर सोडला नाही.

पाटीलगुरुजींनी दौलतला बजावले -- ' सातवीचे वर्ष महत्त्वाचे. या वर्षी खूप अभ्यास कर. गणितात पैकीच्या पैकी मार्क मिळवायला पाहिजेत. इतर विषयांची तयारी उत्तम व्हायला हवी. सेंटरला निदान पहिल्या तिनात यायला पाहिजेस. '

चंद्रा राब राब राबत होती. दळणकांडण, भांगलणी-निंदणी, चटणी-कुरड्या करून दे अशी कामे करीत होती, तरीसुद्धा तिला आवश्यक त्या गरजा पूर्ण करता यायच्या नाहीत. तिच्या लुगड्याला दंड घालावे लागत. चोळीला ठिगळे जोडावी लागत. दौलतीला मेटाकुटीने ती एखादा सद्रा-चड्डी घेई. अधूनमधून त्याला वहीसाठी, शाईसाठी, टाकाच्या निबासाठी पैसे द्यावे लागत. तेव्हा ती रागेजे. भास्कर एखादेवेळी मग दौलतची नड भागवी.

सातवीचा अभ्यास वाढता. वाढत्या वह्या घ्याव्या लागणार. रात्रीचा अभ्यास करावा लागणार. त्यासाठी त्याला चिमणी जाळावी लागणार. चिमणीला अधिक रॉकेल लागणार. या साऱ्या अडचणी दौलतला दिसत होत्या. त्याने जिद्द सोडायची नाही ठरविले.

सातवीचा अभ्यास सुरू झाला. विठ्ठलची पुस्तके या वर्षीही तो वापरू लागला. याबाबतीत त्याला दरवर्षी विठ्ठलची चांगली मदत होई. एखादे वेळी तो आपला अभ्यास बाजूला ठेवी, पण दौलतला पुस्तक देई. दौलतने त्याचा गैरफायदा घेतला नाही. लगोलग आपला अभ्यास आटपून त्याला पुस्तक माघारी देई.

पावसाचे दिवस होते. शाळेला जाताना तो या दिवसात जुन्या पोत्याची खोळ वापरे. कडलासचा रस्ता चिखलाने भरून जाई. पण न चुकता तो तीन मैलांची रपेट करून शाळेत जाई–येई. पावसाच्या धारा कधी अंगावर घेत, शीळ वाजवीत तो चिखलाच्या खड्डयात पाय टाके. चिखलाचा स्पर्श पायांच्या तळव्यांना गुदगुल्या करायचा. मध्येच एखादेवेळी चिखलातील दगडाची कोच तळव्यात खुपे. पण बालपणापासून अशी चालायची सवय असल्यामुळे त्याला त्रास वाटत नसे. चुकून एखादेवेळी तो त्रासे. तरी चंद्रा तो सायंकाळी घरी परत येईतोपर्यंत या दिवसात काळजीत असे.

एके दिवशी पाटीलगुरुजी त्याला काळ-काम-वेगाचे गणित समजावून सांगत होते. गणित समजावून सांगितल्यावर तशाच प्रकारची गणिते त्याला सोडवायला घातली. ती त्याने सोडवली. गणिते बरोबर आली. गुरुजींनी शाबासकीची पाठीवर थाप मारली. हे सर्व झाले तोपर्यंत अंधार पडला होता. शिवाय आका-

शाने काळ्या ढगांचे कांवळे पांघरले होते. मध्येच लखखकन् वीज चमकत होती. पाटीलगुरुजींनी हे वातावरण पाहिले. म्हणाले, 'दौलत, गड्या आज तू आमच्या घरी राहा. इथंच झोप. पाऊस मुसळधार येईल असं वाटतंय्.'

दौलत जरा विचारात पडला. मग आई आपली वाट पाहात राहणार, काळजी करणार हे लक्षात आले. म्हणून म्हणाला, 'मी नाही थांवत गुर्जी. आय वाट् वगत रातसारी वसल. रडल पन. मी आपली भराभरा वाट सारतू कसा. माजी कायबी काळजी करू नगा. वाट पायाखालची हाय.'

तरी गुरुजी म्हणालेच, 'मला वाटतं तू राहावंस.'

'नकू. मी जातू. दप्तर इतंच ठिवतू.' आणि पोत्याची खोळ उचलून तो चालायला लागला.

थोडे अंतर तो भराभरा गेला. नंतर त्याचे पाय चिखलातून सटकू लागले. काही ठिकाणी जादा चिखल झाला होता. तिथे पाय रुतून वसायचा. पायाला चिखल डसून राहू लागला त्याचा मोठा पुट्ठा वसल्यासारखा व्हायचा. पाय जड व्हायचे. असे तो फर्लांगभर अंतर चालून गेला. तोच पाऊस कोसळायला सुरुवात झाली. त्याने पोत्याची खोळ नीट अंगाला लपेटून घेतली. खाली मान झुकवून तो चालू लागला. मनाशी म्हणत होता – आय वाट बगत असल. जायाला होवं झपाझप.

पाऊस हत्तीच्या सोंडेने पडायला लागला. पाठीवर रपारप सपकारे जाणवू लागले. मधूनच गडगड करत विजेचा लोळ कुठे-तरी पडला. रस्ता दिसेना. सगळीकडे काळेकुट्ट झाले होते. चिख-लात पाणी झाले. जपून चालावे लागू लागले. पावसाने त्याची

खोळ भिजून गेली. जड झाली. अंगाला पाऊस झोंवत होता. मोठ्या धबधब्याखाली उभे राहिल्यासारखे दौलतला वाटू लागले. चेहऱ्यावरचे पाणी निपटतानिपटता तो कावून गेला. चिखलातून पाय उचलताना पायांना रग लागू लागली. तसाच तो चिखलात थोडा वेळ थांबला. चारी बाजूला नजर फिरवली. सृष्टीचे हे रुपडे त्याला नवीन होते. घरात बसून त्याने रात्रीचा पाऊस पाहिला होता. आज तो रात्रीच्या पावसात उभा होता. अंगाला धपाटे घालून जणू पाऊस म्हणत होता, 'कसं काय राव ? झ्याक् हाय ना माज्ी सोबत ? ' चारी बाजूंनी अंधार अंगावर चालून आल्यासारखा वाटत होता या अंधारात शेतात उभी असणारी झाडे नाना आकृत्या धारण करत होती. दाढीमिश्या पायापर्यंत लोळविणारी भयानक डोळ्यांची भुते आपल्याला खायला येत आहेत असे त्याला वाटू लागले भीतीने अंगावर सर्रकन् काटा आला. पुन्हा तो आईचे नाव घेऊन चालायला लागला. पुढून वेटकुळ्या उड्या मारीत जायच्या. एखादया वेटकुळीची उडी त्याच्या पायावर पडायची. तो ती झटकायचा अंधारात मापकिरडू पायाखाली आले तर कसे दिसणार? तो धीटपणे चालू लागला. वाडी किती लांब राहिली याचा त्याला अदाज बांधता येईना. तो किती तरी वेळ चालतच होता जपून पाय टाकत होता. जणू सारी रात्र आपण चालतोच आहोत असे दौलतला वाटत होते. काही वेळाने त्याच्या कानी घुंगूर वाजल्याचा आवाज ऐकू आला. बहुधा ती घुंगरे काठीला लावलेली असावी. म्हणून तो ओरडून म्हणाला – ' कोण हाय ? '

त्यासरशी भास्करचा आवाज कानी आला. 'दौलू , दौलूच हाय का ? '

दौलतने मामाचा आवाज ओळखला. तो आनंदाने म्हणाला – 'होय् मामा ! मी दौलूच हाय !'

मामा–भाचे पावलापावलाने जवळ आले. मामाने दौलतला चाचपले. म्हणाला – 'दौलू ! आलास बाबा ! चिंता मिटली !' मग म्हणाला – 'लालटेन घेतला हुता संग. पर या पावसात न्हातूया न्हय ! घुंगराची काटी घेतली त्ये बेस झालं !'

दोघे हळूहळू खोपीत आले.

दौलतला पाहिल्यावर डोळे पुशीत चंद्रा उठली. म्हणाली – 'आलास माझ्या बाबा ! काय जिवाला घोर लागला हुता ! मारु-तीला नवस बोलला !' बोलताबोलता तिने आपल्या पदराने दौलतीचे अंग पुसायला सुरुवात केली होती.

भास्कर म्हणाला – 'आरं दौलती, तुझ्या घोरानं तिला इक्तं येडं केलं की, ती म्हनाय लागली, मीच जातू माझ्या दौलतीला बगाय !'

दौलत म्हणाला – 'आये, गुर्जी म्हनत व्हतं, ततच ऱ्हा – त्येंच्या घरी म्हनूनशान. पर म्या म्हनालू, नकू. माजी आय वाट बगत असल. म्या आपला जातू.'

'अगं माज्या बाबा !' करत चंद्राने त्याला कुशीत ओढले. भास्कर म्हणाला – 'इक्ता उशीर झाला की तू आपला बिनघोरी साळंत ऱ्हात जा. उगा चिखलातून वाट तुडवू नगं. कुटं रातचं सापकिरडू पायाखाली आलं म्हंजे ? चंद्रा, ध्येनात ठीव. पावसाचा जोर झाला की दौलू आज साळंत ऱ्हायला समजून त्येची चिंता करायची न्हाय्. काय ? उगा पोराला तरास नकू.'

चंद्राने मान डोलावली. बारीक आवाजात म्हणाली – 'आरं, ह्यो ऱ्हानार ह्ये समजलं असतं तर म्या कशाला जिवाला घोर

लावून घेतला असता ? आन् तुलाबी तरास दिला असता ? आता न्हाय घोर करायची.'

चंद्राने लगबगीने चूल पेटवली. दौलत चुलीपाशी बसला. तिथे गरम बरे वाटत होते. उन उन भाकरी–पिठले करून चंद्राने मामा–भाच्याला खाऊ घातले. मग मामा–भाच्यांनी चांगले शेकून घेतले.

भास्कर निघून गेला.

दौलत आईच्या कुशीत वाकळीत गडद झोपला.

दुसऱ्या दिवशी त्याचे अंग जड झाले. थोडे अंग गरम झाले. ते पाहून चंद्रा घाबरली. भास्करने त्याला पाहिले. म्हणाला – ' काळजी करू नगं. कालच्या तरासाचा ह्यो जाळ आलाय. काढा दे दोन दीस. झोपू दे निटवानी. '

चंद्राने त्याला गरमगरम काढा करून दिला आणि दळायला बसली. दौलतवरून ओव्या म्हणू लागली. ओव्यातून त्याला औक्ष मागू लागली. वाकळीत पडून दौलत मिटल्या डोळ्यांनी ओव्या ऐकत होता.

दोन दिवस तो पडून होता. तिसऱ्या दिवशी त्याला बरे वाटू लागले. झोपून कंटाळा येऊ लागला म्हणून उठून तो इकडेतिकडे करू लागला. मामाकडे, दोस्तांकडे फेरफटका मारून आला. चौथ्या दिवशी तो शाळेत गेला.

पाटीलगुरुजी त्याची काळजी करत होते. पोर व्यवस्थित घरी गेला की नाही याची त्यांना चिंता पडली होती. काय झाले हे कळल्यावर ते म्हणाले – ' इथून पुढं रात्र झाली की आमच्यात राहायचंस.'

तो ' हो ' म्हणाला. पण तसा प्रसंग पुन्हा परत आला नाही.

या वर्षीही सेंटरची परीक्षा पंढरपूरला होती. पाटीलगुरुजी सर्वांना परीक्षेसाठी घेऊन गेले. सर्वांची चोख व्यवस्था ठेवली. पुन्हापुन्हा त्यांच्या अभ्यासाची उजळणी घेतली. व्यवस्थित पेपर लिहायला सांगितले. विठ्ठल–रखुमाईचे दर्शन झाले. रोज चंद्रभागेत आंघोळ होतीच. मोटारीचे कौतुक आता राहिले नव्हते. दौलतचे पेपर चांगले गेले. घरी परतला तेव्हा तो आनंदात होता.

शेरडांना घेऊन महिना–दीड महिना रानात जायला मिळणार याचा दौलतला आनंद झाला. तसेच शिलाईचे पुन्हा काम शिकून घ्यायचे होते. हातशिलाई, काजे-बटणे केले की थोडे फार पैसे मिळत. ते पैसे साठवायचे त्याने ठरविले. त्याप्रमाणे तो काम करू लागला. अधूनमधून मशीन चालवायला मिळू लागली. रानातून तो या कामासाठी दुपारी यायचा. थोडे पैसे मिळू लागले. ते पैसे तो साठवू लागला.

होता होता परीक्षेच्या निकालाचा दिवस आला. तो लवकर शाळेत गेला. पाटीलगुरुजी त्याला पाहाताच म्हणाले – ' शाबास रे माझ्या पठ्ठे ! शाळेचं नाव केलंस. गड्या तू सेंटरला पहिला आला आहेस. हे बघ वर्तमानपत्र. यात तुझं नाव आहे.'

दौलतीचा चेहरा आनंदाने झळकू लागला. त्याने विचारले, ' विठ्ठलला किती गुण पडले ?'

' ६० टक्के.'

' आन् जोशीला ?'

' ६५ टक्के. '

‘ आन् मला ?’

‘ ८० टक्के. थांब मीच तुझं तोंड गोड करतो.’ म्हणत त्यांनी शिपायाला बोलविले. त्याच्या हाती पाच रुपये दिले. पेढे आणायला सांगितले. तोवर शाळेचे सर्व गुरुजी येऊन त्याचे अभिनंदन करू लागले. त्याचे कौतुक करू लागले. अभ्यासाला स्वतःची पुस्तके नसणारा हा मुलगा सेंटरला पहिला आला हे नवलाचे होते.

शिपायाने पेढे आणले. गुरुजींनी एकदम पाचसहा पेढे हाती घेतले. दौलतच्या तोंडात कोंबले. काही पेढे त्यांनी एका पुडीत बांधले. ती पुडी दौलतला दिली. म्हणाले – ‘ तुझ्या आईला पेढे दे. हे वर्तमानपत्र ने. ते पण तिला दाखव. तिचा आशीर्वाद घे. ’ उरलेले पेढे त्यांनी शाळेतल्या गुरुजींना वाटले.

शिंदेगुरुजी नुकतेच माढ्याहून आले होते. ते भास्करशी गप्पा मारत होते. चंद्रा आत-बाहेर करत होती. दौलत पळत येत असलेला पाहून ती थबकली. दौलत धापा टाकत उभा राहिला. शिंदेगुरुजींनी त्याच्या हातातले वर्तमानपत्र घेतले. अधीरतेने उघडले. पहिल्या पानावरची बातमी वाचून ते हर्ष-भरित झाले. म्हणाले – ‘ शाब्बास ! शाब्बास दौलत ! भास्कर-राव, दौलतच्या आई, तुमचा मुलगा या वेळीही पहिला आला साऱ्या सेंटरला. पाहा वर्तमानपत्रात त्याचं नाव आलं आहे !’ त्यांनी एका ओळीवर बोट ठेवले.

भास्कर वर्तमानपत्रावर वाकत उत्सुकतेने म्हणाला -- ‘ कुटं लिवलंया दौलूचं नाव बगू ? ’

गुरुजींनी पुन्हा त्या ओळीवर बोट ठेवले. भास्कर खजील

झाला. म्हणाला – ' आमास्नी, नांगरगट्ट्यास्नी कुठलं वं अक्षरं वळकाय येत्याती ! पर बेस झालं ! दौलूचं नाव छापून आलं ! '

चंद्राने पुन्हा गुळाचा खडा सर्वांपुढे ठेवला. तेव्हा दौलतला पेढ्यांच्या पुडीची आठवण झाली. खिशातून पुडी बाहेर काढत तो म्हणाला – ' आय गं, ही घे पेड्यांची पुडी. पाटीलगुरुजींनी तुज्यासाठी दिलीया. '

चंद्राने पुडी उघडली. सर्वांच्या हातावर पेढा ठेवला. गुरुजी म्हणाले – ' यंदा आमची चंगळ झाली. पेढापण मिळाला. गूळपण मिळाला. पण गुळाची चव भारी आहे. '

यावर भास्करने री ओढली. चंद्रा लाजली.

गुरुजी दौलतला म्हणाले – ' आता हायस्कूलला गेलं पाहिजे. पुढं शिकलं पाहिजे. '

भास्करने होकार भरला.

पुढे ते म्हणाले – ' वार्शीला हायस्कूल आहे. चांगलं आहे. शिवाय तिथं काम करून फुकट शिकायला मिळेल. '

यावरोवर दौलतने कान टवकारले. विचारले, ' कुठं म्हटलासा गुर्जी ? '

' आरं वार्शीला जगदाळेमामांनी एक संस्था काढली आहे. तिथं गरीब विद्यार्थ्यांना शिकता येतं. श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण मिळतं. '

' आन् न्हान्या--जेवन्याची येवस्था ? ' न राहावून भास्करने विचारले.

'तीही तिथं होते.'

भास्कर, दौलत एकाच वेळी म्हणाले – 'मंग बेस हाय ती साळा.'

चंद्रा मात्र धास्तावून म्हणाली – 'इक्त्या लांब जायाचं शिक्शानासाठी माज्या दौलूनं !'

गुरुजी म्हणाले – 'आता दौलत मोठा व्हायला लागला आहे. त्याची कसली काळजी करता ? एवढा हुषार तुमचा मुलगा, त्याला इथंच का कुजवत ठेवणार ?'

दौलतला आईची काळजी वाटू लागली. तो म्हणाला – 'पर गुर्जी, मला नोकरी न्हाई का मिळायची ?'

गुरुजी हसले. म्हणाले – 'दौलत, तुझं वय काय ?'

म्हणाला – 'अमल तेराचौदा.'

'मग कुठली नोकरी लागायला ! नोकरीला अठरा वर्ष पूर्ण झालेली लागतात.'

दौलत गप्प बसला.

गुरुजी उठत म्हणाले – 'आत्ताच घाई नाही. विचार करून ठरव.'

भास्करपण उठला. चंद्राला म्हणाला – 'तू आत्ताच जिवाला घोर लावून घेऊ नगस. इचार करूनश्यान ठरवू.'

दौलत आपला पहिला नंबर आला, पेपरात नाव छापून आले याची फुशारकी मारायला औरंगा–जगूकडे गेला.

वयामुळे नोकरी मिळणार नाही हे कळल्यावर दौलतने

पुढे शिकायचे ठरविले. त्यासाठी वार्शीला लांव जावे लागले तरी जायचे असा निश्चय केला. त्यासाठी आईची समजूत काढावी लागणार होती. एक दिवस हळूच तो भास्करला म्हणाला – ' मामा, तेवढी आयची समजूत काड. मला शिकायला वार्शीला जाऊ दे म्हनावं. मंग मी माजं तकडं वगतो काय ते. तुमास्नी कुनाला पैशाची तोशीस लावून न्हाय दियाचो. '

भास्कर म्हणाला – ' व्हय रं लेकरा. तुजं म्हननं वरावर हाय. पर तूच तिच्या डुळीचा दिवा हायस. तू लांव जानार तर हिला हकडं ग्वाड वाटंल ? तुकडा तरी जाईल का तिला ? '

' हये वग मामा – आरं म्या शिकायला जातू या. शिक्षान् झालं की मी सायव न्हाय का व्हायचो ? पगारदार हुयीन. मंग आयला मोलमजुरी कराय लागनार न्हाई. मलावी लागणार न्हाई. आन् आयकडं वगायला हतं तू हायस की. '

भास्करने विचार केला. म्हणाला – ' ममदं सांगतू. ते पटलं वग. मी चंद्राला सांगतू. '

चंद्रा–भास्कर बसून विचार करू लागले. नाना परीने भास्करने तिची समजूत काढली आणि दौलतला वार्शीला जायला परवानगी मिळाली.

त्यासरशी दौलतला खूप आनंद झाला. त्याने आपले कपडे चढविले. एका पिशवीत चादर भरून ठेवली. तावडतोव कडला-सला गेला दाखला आणायला. त्या वेळी दाखला द्यायला राम आला होता. रामपण गरीब होता. फक्त त्याची परिस्थिती



१९९३

दौलतपेक्षा जरा बरी होती. बोलताबोलता राम म्हणाला –' मलाबी हायस्कुलात जाऊशी वाटतंया. पर कुटं जावं काय कळंना.'

दौलतने आपण वार्शीला जाणार असल्याचे सांगितले. तिथे कामाच्या मोबदल्यात शिक्षण मिळत असल्याचे सांगितले. हे ऐकल्यावर राम आनंदाने म्हणाला –' मंग मीबी तुज्याबरुबर येतू. तू कवा जानार हैस?'

'उंद्या.'

'उंद्या मी तुज्या घरी येतू. आपन संगं जाऊया.'

'बरं.' दौलत म्हणाला. एकाला दोन बरे! दाखला, गुण-पत्रक आणि पाटीलगुरुजींनी दिलेली चिठ्ठी घेऊन दौलत घरी परतला. हे कागद व्यवस्थित पिशवीत ठेवले. आईशी गप्पा मारण्यात त्याने वेळ घालविला. माझी काळजी करू नकोस असे तिला पुन्हापुन्हा सांगून ठेवले. मी तुला पत्र घालीन. पत्ता कळवीन. कुनाकडून तरी मला पत्र लिही. खुशाली कळवत जा. असे चंद्राला तो सांगत होता. चंद्रा आपली हूं हूं करत होती. घशातला हुंदका दाबत होती.

दुसऱ्या दिवशी राम छोटीशी पत्र्याची पेटी घेऊन दारात हजर झाला. दौलतबरोबर चंद्राने त्याला आग्रहाने जेवू घातले. फडक्यात भाकरी बांधून दिली. दौलतने आईचा निरोप घेतला. तिच्या डोळ्यातले पाणी गालांवरून ओघळायला लागले. दौलतला तिने पोटाशी धरले. त्याचा मुका घेतला. म्हणाली – 'जा बाबा! तुज्या शिक्षनाच्या आड न्हाय येत मी. माजी काळजी करू नगं. तू मातर संबाळून न्हा.'

भास्कर हा निरोपाचा सोहळा पाहात उभा होता. पटक्याच्या शेवाने आपले डोळे पुसत होता. त्याचाही निरोप दौलतने घेतला. चंद्रा–भास्करने दौलतला पैशाची व्यवस्था काय म्हणून विचारले होते. तेव्हा माज्या शिलाई कामाचं साटवलंय् म्हणून त्याने सांगितले होते. म्हणून पैशाची चौकशी त्यांनी केली नाही. भास्करने त्याला सांगितलें – ' तुज्या आयची काळजी करू नगं. मी हाय हतं. '

दोघे त्यांना पोहोचवायला लांवपर्यंत आले. दौलत म्हणाला – ' आता नगा लांवपत्तर येऊ घालवाय्. तुमी जावा आता. आमी नीट संवाळून जातू. ततं गेल्यावर पत्तर पाठवतू. काळजी करू नगासा. '

तेव्हा ते वाटेतच थांवले.

राम–दौलत चालायला लागले. चंद्रा त्यांच्या पाठमोऱ्या आकृतींकडे डोळ्यात पाणी आणून पाहात होती. मग भास्करने तिला चलायला सांगितले. डोळ्याला पदर लावत, मागे पाहात-पाहात ती गेली.

दोघे गप्प चालत होते. राम म्हणाला – ' आपण निगालुया, पन ततं खर्ची करावी लागली तर पंचाईत हाय. '

' खर्ची कशापाई लागल ? ' दौलतने विचारले.

' बार्शीपातूर तिक्टीला कित्याक रुपय लागल काय दक्कल ! ' राम काळजीने म्हणाला.

दौलतपाशी दोन रुपयांपेक्षा जादा पैसे नव्हते. तो हळूच म्हणाला – ' राम गड्या, धाडस कराय लागल. मंजे खर्ची नाय लागायची. '

नवल करीत रामने विचारले – ‘ कसलं रं धाडस ? ’

‘ आपन विनतिक्टीचा परवास करायचा. ’

‘ काय म्हंतूस ! ’

‘ व्हय. मंग खर्ची वाचल. ’

‘ पर आपल्याला पकडलं तर ? ’

‘ पुढचं पुढं. पर मला वाटतं, न्हाय पकडायचे. आरं, म्या वगितलंय् पंढरपूरला जाताना. आगीनगाडीत विनतिक्टीची लई मान्सं परवास करत्याती. चेकरला फसवून जात्यात्. जरा वाईच येगळ्या वाटंनं जात्यात्. ’

‘ पर आपल्याला त्ये कसं जमावं रं ? ’

‘ जमवलं की जमतं. तू उगा येड्यावानी कायवाय बोलू नगं म्हंजे वास ! ’

रामने मान डोलावली. ते स्टेशनात आले. गाडी येईस्तो-पर्यंत इकडेतिकडे करू लागले.

बार्शी लाईट झुक् झुक् करीत शीट वाजवीत आली. फुस् करीत थांबली. राम–दौलत दिसेल त्या डब्यात गडबडीने चढले. गाडी चालू झाली. रामची कावरीबावरी नजर इकडे-तिकडे फिरत होती. जणू काळीज तोंडावर पसरून तो बसला होता. दौलत चोरटेपणे, दबकून पाहात होता. सांगोला गेले. वामणी, भोवाळी करत पंढरपूर आले. प्रत्येक वेळी स्टेशन आले की दोघे अवघडून बसत. कुठून चेकर समोर उभा ठाकतो की काय असे वाटत होते. पंढरपूर गेले तसा दौलत अवसान आणून

रामशी गप्पा मारायचा प्रयत्न करू लागला. रामची भीती गेली नव्हती. तो नुसता हूं हां करत होता.

त्यांच्यासमोर एक भल्यामोठ्या मिश्यांचा बाबा बसला होता. तो या पोरांची चुळबूळ निरखीत होता. पटक्याचा शेव डोकीत खोवत तो म्हणाला – 'पोरानू, कुटं जानार ?'

'बार्शीला.'

'पयल्यांदा जाताय् जनू !'

'अं, हो.' राम म्हणाला.

'काय सुदीक घाबरू नगासा. गाडी बेस जाती. पर कुनाकडं जानार हैसा ? कुनी पावनंपै हायती का ततं ?'

दौलत म्हणाला – 'पावनंबिवनं कुनी न्हायीत गा साळा शिकायला निगालूया.'

'आं ! साळा शिकाय् ? जावा बाळानू. शिक्षान् लई चकोट असतंय्.' म्हाताऱ्याने आशीर्वाद दिला. पुढे म्हणाला – 'मी कुर्डूवाडीला उतरनार हाय. बार्शी फुडं हाय.'

तोवर मोडनिंब, पडसाळी, संभुळ स्टेशने गेली. 'तिकीट ! तिकीट !' करीत पांढरी पाटलूण, काळा कोट, नावाचा बिल्ला लावलेला चेकर डब्यात आला. एक एक तिकीट तपासू लागला तशी राम, दौलतची पाचावर धारण बसली. म्हातारबाचे तिकीट पाहून झाले आणि चेकर त्यांच्यापुढे उभा राहिला. राम रडवेला झाला होता. तो कसावसा म्हणाला – 'तिक्टी न्हाय माज्यापाशी.' दौलतकडे पाहून चेकर खेकसला – 'तुझ्याजवळ आहे का रे तिकीट ?'

त्याने नकारार्थी मान हलवली.

चेकर चिडला. म्हणू लागला – ‘ बापाची गाडी आहे वाटतं तुमच्या ? खुशाल बिनतिकिटाचा प्रवास करताहेत ! चला, आता त्याची फळं चाखा ! ’ आणि त्याने दोघांचे वकोट धरले.

म्हातारबा पोरांच्या या अवस्थेने कळवळले. ते रदबदली करीत म्हणाले – ‘ चेकरसाब, सोडा त्यास्नी. गरीब पोरं हायती. शिक्षनासाठी बार्शीला जानार हैती. सोडा. ’

चेकर रागाने म्हातारबाला म्हणाला – ‘ एवढा कळवळा येतोय् तर काढताय का या पोरांची तिकिटं ? ’

यावर म्हातारबा चुपचाप बसले. कुर्डूवाडी आल्याबरोबर लगबगीने उतरले. पोरांकडे त्यांनी पाहिलेसुद्धा नाही.

चेकरने रामला एका हाताने, दौलतला दुसऱ्या हाताने गच्च पकडले ते पळून जाऊ नयेत म्हणून. पण दोघांची पळून जायची इच्छा नव्हती. नव्हे, तसा डोक्यात विचारही आला नाही. दोघांना घेऊन चेकरसाहेब पोलिसांच्या ताब्यात द्यायला निघाले. चालताना बडबडत होते – ‘ बिनतिकिटाचा प्रवास करायला पाहिजे नाही का ? रेल्वे जशी आपल्या बापाची ! चला आता. घी देखा लेकिन बडगा नही देखा ! ’

राम–दौलत लटालटा कापत होते. रेल्वे पोलीस स्टेशनात त्यांनी विजयी मुद्रेने प्रवेश केला. म्हणाले – ‘ घ्या ! फौजदारसाहेब, काम आलं ! ही दोन पोरं ताब्यात घ्या. फुकटे प्रवासी आहेत. ’

टेबलाआड अक्कडबाज मिश्यांचा राकट माणूस बसला होता. त्याला पाहाताच राम रडायलाच लागला.

फौजदार खुर्चीवरून उठले. पोरांच्या बाजूला आले. टेबलावर टेकले. त्यांचा उंचापुरा दणकट देह पाहून दौलतच्या डोळ्यांपुढे काजवे चमकायला लागले.

फौजदारांनी दमदार आवाजात विचारले — 'कुठल्या गावाहून आलात बाबांनो ?'

दौलतने अंगी बळ आणून उत्तर दिले --

'अकोला वासूदहून .'

'कुठं जाणार होता ? '

'बार्शीला .'

'कशासाठी ? '

'शाळेत नाव घालायला .'

'खोटं बोलाल तर ठिवून देईन कानसुलात.' म्हणत फौजदारांनी आपला पंजा उगारला – 'आता सांगा बरं, कशासाठी बार्शीला निघालात ?'

'आमी शाळंत नाव घालायला निघालूया. आय् शप्पत.'

'ए पोरांनो, शपथा नाही चालायच्या इथं.' फौजदारांनी दम भरला. पुढे ते गरजले – 'कुठल्या शाळेत जाणार आहात ?'

'मामा जगदाळेंच्या स्कुलात. तत म्हनं कामाच्या मोबदल्यात शिक्षान् मिळतंया.'

या उत्तराबरोबर फौजदाराचा चेहरा जरा सौम्य झाला. ते म्हणाले, 'का ? तुमच्या गावात हायस्कूल नाही ?'

'न्हायी.'

'मग एवढ्या लांब कशाला चाललाय? जवळपास नाही का दुसरी शाळा?'

'हाय की. पर आमी गरीब. फीला पैका कुटला आनावा? न्हान्या–जेवनाची सोय कुटं करायची?'

'अस्सं! तर तुम्ही वार्शीला शाळेत नाव घालायला निघालाय. बघू तुमचं गुणपत्रक आणि शाळेची कागदं?'

दौलतला जरा उभारी आली. 'दावतू की सायव.' म्हणत त्याने पिशवीत हात घातला. दाखला, गुणपत्रक, पाटीलगुरुजींचे शिफारसपत्र, त्याचे नाव छापून आलेल्या वर्तमानपत्राचा तो तुकडा, सारे फौजदारांच्या हाती ठेवले.

तोवर राम आपली पेटी उघडायच्या नादाला लागला.

फौजदारांनी काळजीपूर्वक मार्क पाहिले. गुरुजींचे शिफारसपत्र वाचले. म्हणाले – 'काय रे, तू सातवीला सेंटरला पहिला आलास होय?'

'होय सायेब. त्या पेपरात हाय की माजं नाव.'

फौजदारांनी वर्तमानपत्राचा तुकडा हाती घेऊन ती बातमी वाचली.

'काय रे, तुमच्यापाशी किती रुपये आहेत?'

दौलत म्हणाला – 'दोन.'

राम म्हणाला – 'पाच.'

रामचे मार्क, दाखला त्यांनी पाहिले. मग एकदम चेकरकडे वळत ते म्हणाले – 'चेकरसाहेब, ही पोरं शाळेत नाव घालायला

खरोखरीच निघालीत. यांच्यापाशी तर पैसे कमी आहेत. तर असं करा –'

रामा–दौलतने कान टवकारले. फौजदार आता काय निर्णय घेतात म्हणून –

'या पोरांच्या तिकिटाचे पैसे माझ्याकडून घ्या. पोरांना जाऊ देऊ या.' आणि टेबलावरची घंटी वाजवली. शिपाई आत आला. सलाम करून उभा राहिला. खिशातून पैसे काढून त्यांनी शिपायाला दिले. सांगितले – 'दोन बार्शी तिकिटं आण. आणि या पोरांना दे.'

दौलतच्या हाती पाच रुपये ठेवले. म्हणाले – 'हे पैसे असू द्या जवळ. या शिपायाकडून तिकिटं घ्या आणि विनधास्त बार्शीला जा.' दौलत–राम हो म्हणाले. पुढे ते म्हणाले – 'पण इथून पुढं बिनतिकिटाचा प्रवास करू नका.' त्यांनी आपल्या मिश्या कुरवाळल्या. गालात हसत म्हणाले – 'या फौजदारासारखा न्हाई सापडायचा दुसरा बरं !'

त्यासरशी रामच्या जिवात जीव आला. दौलतच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. तो म्हणाला – 'सायब, लई उपकार झाले. माफी मागतू आमी.'

फौजदार गडगड करीत हसले. म्हणाले – 'आरं लेका, शिक्षा वाचल्यावर वर दक्षिणा उपटून झाल्यावर मग माफी मागतोस काय ? जावा ! पळा ! अजून गाडी उभी आहे स्टेशनात. पळा !'

दोघांचे कागद–दाखला वगैरे दौलतने आपल्या पिशवीत घातले. हसतच ते गाडी पकडायला गेले. शिपायाने दोघांना तिकीट आणून दिले.

जवळ तिकीट असल्यामुळे त्यांचा प्रवास आनंदाने सुरू झाला. चेहऱ्यावरची भीती पार पळाली. कोणती कोणती स्टेशन येतात हे खिडकीच्या बाहेर मान काढून ते पाहू लागले. चिकहिल, म्हैसगाव, रिघोरे स्टेशने घेत गाडी सिंद्री, खांडवी करत बार्शीला आली. बार्शी आल्याबरोबर टुणकन् उडी मारून ते खाली उतरले. चेकरचे त्यांच्याकडे लक्ष नव्हते. तरी मुद्दाम दोघे त्याच्यापुढे उभे राहिले. रुबाबात तिकीट त्याच्या हाती ठेवले आणि स्टेशनबाहेर ते पडले.

आता 'शिवाजी बोर्डिंग' कडे कसे जायचे हा प्रश्न पडला. बावरून दोघे इकडेतिकडे पाहू लागले. एका भल्या माणसाला थांबवून दौलतने विचारले – 'मामा जगदाळे यांची शाळा कुनीकडं हाय वो ?'

तो माणूस थांबून म्हणाला – 'आसंच थेट जावा. मंग डाव्या बाजूला जा. ततं माळरान हाय. तकडं साळा हाय.'

दोघांच्या पोटात केव्हाची भूक लागली होती. दौलत रामला म्हणाला – 'आदी भाकर खाऊ या. मंग जाऊ या गा.'

दोघे स्टेशनच्या आवारात आली. नळाच्या जवळ बसून जेवण केले. हातपाय-तोंड धुतले. पोटभर पाणी प्यायले. जरा निवांत वाटले. नेटाने पावले टाकीत ते पुन्हा चालू लागले.

ते ऑफिसपाशी आले. मामांच्यापुढे उभे राहिले. मामांचा गोरापान प्रेमळ चेहरा पोरांना आवडला.

दौलत म्हणाला – 'आमी अकोला (वासूद) हून तुमचं नाव ऐकून आलूया. आमास्नी साळंत दाखल करून घ्या.'

मामांना दौलतचा धीटपणा आवडला. ते म्हणाले – 'पाहू तुमचे मार्क ?'

दौलतने दोघांची मार्कलिस्ट, दाखला वगैरे मामांच्या पुढे ठेवले. मामा ते निरखून पाहू लागले. मार्क पाहातापाहाता ते म्हणाले – 'शाळेत घेऊ तुम्हाला, पण इथं खूप काम करावं लागेल.'

'हो. करू.'

'पहाटे चारला उठून अभ्यास करायचा.'

'हो. करू.'

'रात्री दहा वाजल्याशिवाय झोपायचं नाही.'

'नाही झोपणार.'

'कसली कुरकुर करायची नाही.'

'नाय बा.'

'मग ठीक आहे. शाळेत घेतो तुम्हाला. अजून वर्ग सुरू नाहीत. आठ दिवसात चालू होतील. तरी उजळणी करावी लागेल. उद्यापासून आठ वाजता कामाला लागायचं. काय ?'

'हो.' दोघांनी मान डोलावली.

'मग ठीक आहे. ही कागदं तुमच्यापाशी असू द्या. मागेन तेव्हा द्या.' मामा उठले. दोघांना घेऊन बोर्डिंगपाशी आले. तिथल्या व्यवस्थापकांना म्हणाले – 'इंगळे, या पोरांना ताब्यात घ्या. उद्या आठ वाजता यांना कामावर पाठवा.'

मामा निघून गेले.

इंगळेंनी दोघांना कुठले, काय विचारून घेतले. 'दमून आलाय्. थोडी विश्रांती घ्या.' म्हणाले. आपल्या कामात मग्न झाले.

भिंतीकडेला ट्रंकेला ट्रंक लागून होत्या. एका कोपऱ्यात रिकामी जागा होती. तिथे रामने आपली पेटी ठेवली. त्याच्या शेजारी दौलतने पिशवी ठेवली. दोघे दमले होते. ते गप्पा मारीत पडले.

कामावरून पोरे परतली. दोन नवीन पोरे पाहून त्यांना कुतूहल वाटू लागले. बोलणे चालू झाले. कोण ? कुठचा ? कुठल्या वर्गात ? किती मार्क पडले ? वगैरे प्रश्न एकामेकात विचारले गेले. गप्पाटप्पा झाल्या. तोवर घंटा झाली, तशी पोरे आपआपली पितळी, वाटी, तांब्या घेऊन हॉलमध्ये आली. रामने पितळी वगैरे आणली होती. दौलतला हे काही सुचले नव्हते. सगळी रांगेने पितळी पुढे ठेवून वसली. भराभर वाढपी पोरे येऊन भाकरी-आमटी वाढू लागली.

ोलत म्हणाला – ' राम, आदी तू जेवून घे. मग मी तुज्या पितळीत खाईन. '

एका वाढपी मुलाच्या दौलतची अडचण लक्षात आली. तो म्हणाला – ' माजी पितळी–वाटी देतो. '

त्याने लगोलग पितळी–वाटी दौलतला आणून दिली. वाढप केले.

' वदनि कवळ घेता ' चा दणक्यात श्लोक पोरांनी म्हटला. ' तुकाराम महाराज की जय ! ज्ञानदेव महाराज की जय ! ' च्या गजरात जेवण सुरू झाले. आमटीत भाकरी कुस्करून पोरे मजेत खात होती.

त्या रात्री दोघे निवांत झोपले. पहाटे उठायचे भान दोघांनाही झाले नाही. दोघे डोळे चोळत उठले तेव्हा खोलीत

कुणीच नव्हते. दिवस केव्हाच उजाडला होता. दोघांना लाज वाटली. इंगळे गडबडीने आत येत त्यांना म्हणाले – ‘ पहाटे उठला नाहीत आज ? पण उद्या तसं करू नका. मामा चिडले की खूप चिडतात. आटपा लवकर. कामाला चला. ’

दोघे तयार झाले. इंगळे भराभरा चालले होते. त्यांच्या मागे जवळजवळ पळतच दोघे जाऊ लागले. विहिरीचे काम चालले होते तिथे त्यांनी त्यांना आणले. तिथल्या दोन पाट्या त्यांना दिल्या. म्हणाले, ‘ विहिरीतला कचरा काढून वर आणायचा. विहीर खणताहेत. दगड मोठी माणसं आणतील वर. तुम्ही बारीक-सारीक कचरा आणून वर टाका. ’

दोघे पाट्या घेऊन विहिरीत उतरले. खापऱ्या, दगड–गोटे गोळा करून पाटीत भरले. पाटी उचलेल एवढी भरली. वर आणून टाकली. असे जेवणाच्या सुटीपर्यंत काम चालले होते. मामा मध्येच येऊन कामावर लक्ष देऊन गेले होते.

जेवण, विश्रांती, नंतर पुन्हा काम सुरू झाले. राम पाट्या उचलूनउचलून दमला. तो काळजीने म्हणाला – ’ कसं रं झेपायचं हये काम ! ’

‘ झेपवलं की झेपतं ! एकाच दिसात काय असा घायकुतीला येतोस ? ’ दौलत म्हणाला. रामने मुकाट पाटी उचलली.

दौलत कामाला कंटाळला नाही. मामा त्याच्या कामावर खूष होते. पण जेवल्यावर दौलतला झोप यायला लागली. दहा वाजले नव्हते. इंगळे गुरुजींनी दिलेली पुस्तके वाचायची होती दौलतला आपले डोळे केव्हा मिटले हे कळले नाही.

तिसरा दिवस उजाडला. पुन्हा तेच. तो पहाटे उठला नाही. रामला कोणी तरी उठवल्यावर लगेच तो उठला. ते मामा होते. रामला कळले – मामा पहाटे चारला कंदील घेऊन येतात, पोरांना उठवतात, अभ्यासाला बसवतात. दौलतला मामांनी उठवल्याचे कळले नाही.

दौलत हाग्या काम करीत होता. पहाटे उठणे जमायचे नाही आणि रात्री लवकर झोप यायची. असे आठ दिवस झाले.

नवव्या दिवशी मामा चिडले. त्यांनी आपला सोटा सावरला. राम घाबरला.

मामांनी दाणकन् सोटा दौलतच्या पाठीत घातला, त्यासरशी कळवळून ओरडत दौलत उठला. डोळे चोळू लागला. तोवर दुसरा सोटा पाठीत बसला. दौलतने ओरडत पाहिले – समोर संतापलेले मामा उभे आहेत. ते म्हणत होते – 'गाढव कुठला ! वज्याचं गाढव व्हायला आला आहेस होय रे ? अभ्यासाचं नाव नाही. रोज बघतोय. रोज बघतोय. उठवतोय तरी सुंबाटयासारखा झोपतो आहेस. गाढव. अशानं काय शिकणार तू ? काम मस्त चांगलं करतो आहेस – पण गाढव व्हायला आलास का रं ?' मामा बडबडत होते. सोटा मारीत होते. दौलत कळवळून ओरडत होता. रडत होता. पोरे घाबरून भितीला पाठ टेकून पाहात होती.

शेवटी इंगळे मधे पडले. म्हणाले – 'मामा. बास आता. आज-पासून तो नाही चूक करायचा.'

तेव्हा मामा तेथून निघून गेले.

दौलतने असा मार कधी खाल्ला नव्हता. मामाची भीती मनात बसली. त्याने रडतरडत मनात निश्चय केला – आपल्याला

न्हायी झेपायचे इथे. पळ काढाया पाय. रामने आपले बस्तान बसविले होते. त्याची काळजी नव्हती. सगळी कामावर गेली. हळूच दौलत माघारी आला. त्याने एका चिठोऱ्यावर रामला चिठ्ठी लिहिली - 'मी जातू. तू ऱ्हा. काळजी करू नगस. दौलत.' त्याच्या पेटीच्या कोयंड्यात चिठ्ठी अडकवली. आपली पिशवी घेऊन तो निघाला. चालताना त्याला रडे आवरत नव्हते. पाठ, पायाची नडगी खूप दुखत होती. थांबत, उठत, बसत तो सिद्री स्टेशनपाशी आला. तेथून कुर्डूवाडीचे तिकीट घेतले. गाडीत बसला. आता त्याने ठरवले – माढ्याला जायचे. तिथे आपले शिंदेगुरुजी आहेत. ते आपली काही तरी सोय लावतील.

कुर्डूवाडी आली. तिथे त्याने भजी घेऊन खाल्ली. माढा कुठल्या रस्त्याला आहे हे एकाला विचारून घेतले. दहा-बारा मैलांवर माढा होते. अजून पावसाला सुरुवात नव्हती. फुफाट्यात पाय टाकला. पायाला चटके बसत होते.

बसत, दम घेत, पायाला कुरवाळीत पुन्हा उभारीने चालत तो निघाला. अंग तर दुखतच होते. रात्री तो शिंदेगुरुजींच्या घरासमोर उभा राहिला तेव्हा त्याच्या अंगी अजिबात त्राण नव्हते.

शिंदेगुरुजी त्याला पाहून चकितच झाले.

० ० ०

## १३ :

शिंदेगुरुजी त्याला पाहून म्हणाले - 'तू इकडं कसा ?'

'गुर्जी, मला इथल्या शाळेत शिकायचं आहे.' मरगळलेल्या आवाजात दौलत म्हणाला.

गुरुजी म्हणाले, 'ते बघू नंतर. चल घरात ये – आधी हात, पाय धू भाकर खा. मग उद्या बोलू.'

दौलतला गुरुजींच्या स्वागताने हायसे वाटले. भाकरी खाऊन तो निवांत झोपला.

दुसऱ्या दिवशी त्याचे आणि गुरुजींचे बोलणे झाले. शिंदे-गुरुजींना चिंता पडली – आता इथं या पोराची व्यवस्था लागते की नाही !

ते म्हणाले – 'मी इथल्या शाळेत सांगून बघतो. तुझी सोय होईपर्यंत इथंच राहा.'

शिंदेगुरुजी उपाध्ये यांना भेटले. म्हणाले – 'एक हुशार मुलगा आहे. गरीब आहे. त्याला शाळेत घ्याल का ?'

उपाध्ये म्हणाले, 'हो. घेऊ की.'

गुरुजी पुढे म्हणाले – 'पण या मुलाची वसतिगृहात राहाण्या-जेवण्याची सोय होईल का ? त्याला फीसाठी नादारी मिळेल का ? पोरगं फारच गरीब आहे.'

यावर उपाध्ये विचारात पडले. म्हणाले – 'एवढी कशी सोय होईल ?'

'त्यावदली त्याच्याकडून काम करून घ्या.'

'काय काम करून घ्यायचं? उगीच पिडा नको!'

आठ दिवस दौलत गुरुजींच्या घरी राहिला होता. रोज तो आपणहून घरात पाणी भरे. दळण दळून आणी. त्यांच्या पोरांना खेळवी. असे काहीबाही काम तो करी. पण अजून त्याची शाळेत वसतिगृहात सोय लागत नव्हती.

गावात दोन फळच्या होत्या. चवरे विरुद्ध उपाध्ये. एकदा चवरेंच्या नजरेस दौलत पडला. पडवीत तो गुरुजींच्या धाकट्या मुलाला खेळवत होता. गुरुजी सुपारी चघळत बसले होते. कुतूहलाने चवरे गुरुजींच्या घरापुढून जाताना म्हणाले — 'काय रावसाहेव! पोरगा कुणाचा?'

गुरुजींनी सगळी हकीकत सांगितली. चवरेंच्या मनात दौलत भरला होता. त्याचे गोटीबंद शरीर त्यांनी निरखले. म्हणाले — 'नाही का पोराला शिकायू मिळंना. ये पोरा, चल माज्यासंग. ह्याकपैकी तुला पैलवान करतो. समदा खुराकाचा खरच करतो. तू निस्ती मेहनत कर. आखाड्यात पडून ऱ्हाईलास तरी बेहत्तर.'

दौलत विचारात पडला.

तसे चवरे पुन्हा म्हणाले —'उंद्या काय ते सांग. इचार कर.'

गुरुजींना हायसे वाटले.

सायंकाळी बोलताबोलता गुरुजींनी उपाध्येंना सांगितले —

'पोराचं कसं ना कसं तरी नशीब उजाडतंय जणू!'

उपाध्येंनी प्रश्नार्थक चेहरा केला.

गुरुजींनी खुलासा केला. दौलतला चवरे पैलवान वनवून आपला पठ्ठा बनविणार आहे.

उपाध्येंना हे काही बरे वाटले नाही. ते म्हणाले – 'पोरगा खरच का काम करून शिकायला तयार आहे ?'

'अहो या पोराला मी लहानपणापासून पाहिलं आहे. शिवाय तो माझा पाच वर्ष विद्यार्थी होता. मी का खोटं सांगीन !'

'मग द्या तर त्याला उद्या शाळेत पाठवून. वसतिगृहात त्याला काम देऊ. त्याबदल्यात तो तिथं राहील. खाईल. फीबद्दल नादारी देऊ.'

लगोलग दुसऱ्या दिवशी दौलत आपल्या पिशवीसह शाळेत हजर झाला. उपाध्येंनी त्याची मार्कलिस्ट बारकाईने पाहिली. शाळेत नाव दाखल करून घेतले. शाळा सुटल्यावर वसतिगृहात जायला सांगितले.

कधी शाळा सुटते आणि वसतिगृहात आपण जातो असे दौलतला झाले. शाळेची शिस्त चांगली होती. शाळा त्याला आवडली.

व्यवस्थापकांनी त्याला वसतिगृहात काय काम करावे लागेल हे सांगितले. वसतिगृह झाडून काढणे, पाणी भरणे, स्वयंपाक-घरात बायकांना कशाची गरज पडली तर ती वस्तू आणून देणे, वाढप करणे अशी कामे सांगितली.

वसतिगृहात बंदिस्त खोल्या नव्हत्या. वाड्याला पडव्या असल्या-सारखे स्वरूप होते. पडवीत ट्रंकेला ट्रंक लावून आपआपल्या ट्रंकेसमोर मुले बसत. झोपत.

दौलतचे काम व शाळा सुरू झाली.

आपण माढ्याला आलो असून तिथे शाळेत प्रवेश घेतला आहे, वसतिगृहात राहाण्या-जेवण्याची सोय झाली आहे, शिवाय शिंदे-गुरुजी त्याच्याकडे लक्ष देतात, आपण खुशाल आहोत, तुझी खुशाली कळव, म्हणून त्याने आईला पत्र पाठवले.

आठ दिवसांनी चंद्राचे पत्र आले. रानशाळेच्या मोरेगुरुजींनी ते पत्र लिहिले होते चंद्राच्या वतीने. ती खुशाल होती. त्याचा मामा खुशाल होता. त्याची काळजी घ्यायला सांगितले होते. तिथे त्याच्याकडे शिंदेगुरुजी लक्ष द्यायला आहेत म्हणून चंद्राची निम्मी काळजी कमी झाली होती.

वसतिगृहात राहाण्या–जेवण्याची सोय झाली. इतर खर्चाचे काय? दौलतला काळजी पडली. तेल-सावण पाहिजे. वह्या–शाई लागणार. हा प्रश्नही मिटला.

वसतिगृहाच्या बाजूला देशमुखबाईंचे घर होते. ती दौलतला नेहमी पाही. तिचा उगीचच दौलतवर जीव बसला. देशमुख-बाईंच्या शेजारी जज्ज राहात होते. त्यांची मुले सोलापूरला कॉलेजला होती. त्यांचा जेवणाचा डबा रोज स्टँडवर पोहोचवावा लागे. रिकामा डबा आणावा लागे. या कामासाठी त्यांना विश्वासू मुलगा पाहिजे होता. देशमुखबाईंचा पुतण्यासुध्दा सोलापूरला शिकत होता. दौलतने देशमुखबाईंशी मावशीचे नाते जोडले. गप्पातून देशमुखबाईंना दौलतबद्दल खूप काही कळले, आणि त्यांची या धडपड्या दौलतवर माया जडली.

एक दिवस त्या दौलतला म्हणाल्या – ‘एक काम करशील ?’

‘कुठचं मावशी ?’

'डबे नेण्या-आणण्याचं काम करशील ?'

आनंदाने दौलत म्हणाला – 'करीन की.'

'तुला आम्ही पगार देऊ हां.' मावशी हसत 'पगार' या शब्दावर जोर देत म्हणाल्या.

दौलत हसत म्हणाला – 'म्हंजे आमी पगारदार हुनार तर !'

मावशी हसत राहिल्या.

या कामामुळे दौलतच्या इतर खर्चाचा प्रश्न सुटला. मावशी खरोखरीच दौलतवर आपल्या मुलासारखी माया करू लागल्या. चांगलेचुंगले खायला केले की मावशीला हमखास दौलतची आठवण होई. त्याला बोलावून ती खायला देई. मावशीच्या मायेने दौलतला आपल्या आईची आठवण होई. आपल्यावर कुणी माया करतेय् यानेच त्याचा उर भरून यायचा.

तो मावशीला जरासुध्दा दुखवायचा नाही. सवड सापडेल तशी तो मावशीला कामात मदत करायचा. त्याला कामाचा उरक दांडगा होता. वसतिगृहातील काम, डबे पोहोचविणे–आणणे, शाळा, या रहाटगाडग्यात तो रमून गेला. पुस्तके नेहमीसारखीच तो वर्गमित्रांकडून मिळवी.

कवड्डीचे त्याचे कौशल्य जाणून कवड्डी संघात त्याला घेतले आणि कुस्तीचेही शिक्षण तो घेऊ लागला. सगळ्यांचा तो आवडता बनला.

हां हां म्हणता त्याचे आठवीचे वष संपले. निकाल लागला. त्याचा पहिला नंबर कायम होता. सुट्टीत तो शिंदेगुरुजींकडून पैसे घेऊन वाडीला परतला. चंद्राचा, भास्करचा आनंद गगनात मावेना.

माढ्यामध्ये दौलत चांगला रमला. होताहोता तो मॅट्रिकच्या वर्गात आला. खेळाच्या व अभ्यासाच्या नैपुण्यामुळे सगळे शिक्षक त्याच्याकडे लक्ष देत होते.

मॅट्रिकला यंदा सोलापूर सेंटर होते. अभ्यास खूप वाढला होता. वह्यापुस्तकांची नेहमीच आबाळ असे. एकाला दुसरा कपडा जोड असला तर त्याला नशीबवान आहोत असे वाटे. नाही तर रात्री कपडे धुऊन तेच सकाळी वापरावे लागत. मावशीच्या लक्षात त्याची ही अडचण आली. त्यांनी आपल्या पुतण्याचा कपडा–जोड दिला. त्यामुळे त्याला बरे वाटले. हे कपडे त्याला थोडे ढगळ होत होते. तरी ते दौलतला आवडले.

मॅट्रिकच्या परीक्षेच्या निमित्ताने सोलापूर पाहायला मिळाले. मावशीनेच त्याला त्याच्या पगारात भर घालून पैसे दिले. मावशीचा आशीर्वाद घेऊन तो परीक्षेला गेला. तेथूनच तो वाडीला जाणार होता. त्यामुळे मावशीचा निरोप घेताना त्याला जड गेले. शिंदेगुरुजींना दौलतने माढ्यास चार वर्षे निभावून नेली याचा आनंद वाटला. उपाध्येसरांचा, सर्वांचा त्याने आशीर्वाद व निरोप घेतला.

परीक्षेचे पेपर चांगले गेले. पास व्हायची हमी होती. पण या वेळी त्याला नंबराची हमी वाटेना. शहरातील मुलांसारखे आपले नाही याची जाणीव त्याला झाली. मनातून त्याला थोडे वाईट वाटले. पण खूप वेळ वाईट वाटून घ्यायचा त्याचा स्वभाव नव्हता. परीक्षा झाल्या झाल्या तडक तो वाडीला परतला.

चंद्रा, भास्करने त्याचे आनंदाने स्वागत केले. आपला दौलू आता मोठा होऊ लागलेला आहे याची जाणीव त्यांना झाली.

० ० ०

## १४ :

निकाल लागल्याशिवाय दौलतला पुढचा निर्णय घेता येणार नव्हता. तो आपला कामाला लागला. शिलाईची कामे करू लागला. शेरडांना फिरवून आणणे, त्यांना पाला काढून आणणे, पाणी भरणे अशी किरकोळ कामे होतीच. अगदीच करमले नाही तर जुन्या मित्रांना भेटे. त्यांच्याशी गप्पा मारीत बसे.

जगूचे लग्न फुलाबरोबर झाले होते. स्वारी खुषीत होती. कधीमधी त्यांना रानातल्या गंमती आठवत आणि ते हसत. हिराला मुलगी झाल्याचे कळले. तिला तिने मोठी झाली की शाळेत घालायचे ठरविले आहे हेपण समजले. शिवाय स्वत: हिरा पत्र लिहून आईला आपली खुशाली कळवीत असे. आता तिची आई हिराला लिहायला येते म्हणून कौतुक करते याची दौलतला गंमत वाटली.

शिलाईचे पैसे तो घरखर्चाला आईला देऊ लागला. आईने त्याला कपडे करायला सांगितले. त्याला हा अप्पलपोटेपणा बरा वाटला नाही. तो म्हणाला – 'पैसे साठव आणि तुला लुगडं घे. किती दिवस हे दंड घातलेलं लुगडं नेसणार ?'

मुलाच्या या नुसत्या बोलाने चंद्राचे काळीज सुपाएवढे झाले.

असे तीन महिने गेले. जून उजाडला. दौलतचे काळीज निकालाच्या विचाराने धडधडू लागले.

निकालाच्या दिवशी अगदी लवकर सकाळी तो कडलासला गेला. तेथे वर्तमानपत्र घेतले. नंबरात त्याचे नाव नव्हते. याचे

त्याला वाईट वाटले. पण सत्तर टक्के त्याला मार्क होते. पाटीलगुरुजींना भेटून तो वाडीला परतला.

भास्कर व चंद्रा त्याची वाट पहात बसले होते. तो पास झाल्याचे कळल्यावर त्यांना आनंद झाला. भास्कर म्हणाला – ' मॅट्रिक म्हंजे लई शिकलास तू ! आता तुला नोकरी लागल नव्हं ? '

दौलत म्हणाला, ' होय तर. '

चंद्राने त्या दिवशी दौलतसाठी पुरणपोळी केली.

मोरेगुरुजींच्या सल्ल्याने त्याने नोकरीसाठी तीनचार अर्ज केले, पण कुठल्याच अर्जाचे उत्तर आले नाही. पुन्हा त्याचे वय आडवे आले. अठरा वर्षे पूर्ण व्हायला एक वर्षभर तरी अवकाश होता. कॉलेजला जावे तर खर्च परवडणार नाही आणि जिकडेतिकडे काम मिळून कुठली व्यवस्था होणार ? म्हणून तो विचार त्याने सोडला.

शिलाईचे काम चालूच होते. चंद्राला त्याने लुगडे – चोळी घ्यायला लावली होती. त्याच्याजवळ आता पैसे नव्हते.

एके दिवशी तो सहज पाटीलगुरुजींना भेटायला गेला. तिथे ' सकाळ ' पडला होता. जुना होता. सहज त्याने ' सकाळ ' चाळला आणि त्याची नजर एका जाहिरातीकडे गेली. ' श्रमाच्या बदल्यात शिक्षण ' असे जाहिरातीचे शीर्षक होते. ही जाहिरात होती साताराच्या रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजची. ही संस्था कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारला स्थापिली होती. गोरगरीबांच्या मुलांना शिक्षण मिळावे हा संस्थेचा उद्देश होता. खेडोपाडी त्यांनी प्राथमिक शाळा, हायस्कुले काढली होती. त्याची रानशाळा याच संस्थेची होती. उच्च शिक्षण

गरीव, गरजू मुलांना घेता यावे म्हणून हे कॉलेज काढले होते. फक्त मुलांनी श्रम करावे ही अपेक्षा होती. हे कॉलेज त्यावदली शिक्षण द्यायला तयार होते. ही जाहिरात वाचल्यावरोवर दौलतला आपले ईप्सित सापडल्यासारखे वाटले.

पाटीलगुरुजींना विचारून त्याने 'सकाळ' च्या त्या जाहिरातीचे कात्रण काढून घेतले आणि वेगळयाच आनंदात तो घरी परतला.

घरी आल्याआल्या तो चंद्राला म्हणाला – 'आय ग, झाक् बातमी हाय्.'

'कसली रं वावा?'

'अग सातारला फुकाट शिक्षान मिळतंय कॉलीजचं.'

'काय तरीच सांगतूस.'

'अग तुज्या गळ्याशप्पत! ह्या कागदात हाय समदं.' म्हणत त्याने ते कात्रण तिच्यापुढे नाचवले.

'मंग?'

'मी सातारला जावं म्हंतू.'

'काय?'

'व्हय्. सातारला कॉलीजात जावं म्हंतू. नोकरी तर मिळंना. मग उगा बसून काय करू? शिवाय तितं फुकाट शिक्षण मिळतंय्.'

'आता तुज्यापुढं काय बोलाव!' करत चंद्रा वारीक तोंड करून वसली.

‘वरं, तुज्यापाशी किती पैका हाय ?’ दौलतने विचारले.

‘माज्याकडं कुठं असतूया बाबा पैका !’ चंद्रा म्हणाली. लगेच आठवून ती गाडग्याच्या उतरंडीपाशी गेली. गाडगी उतरवून शेवटच्या गाडग्यात हात घातला. त्यात काही पैसे होते ते तिने मोजले आणि हताश झाली. म्हणाली –‘ अवघं साडंतीन रुपय हायती.’

‘असू दे. तेवडंच दे मला. आनी दोन दिसाच्या भाकरी बांधून दे.’

‘आरं पन सातारा कुठं हाय हे ठाव हाय का तुला ?’

‘नाय् खरं माहीत. पर माहीत हुयील. इचारीन कुनाला तरी. तोंड असलं की सारं जमतं वग.’

‘हं.’ चंद्रा उद्गारली. तिला आता अनुभवाने माहीत झाले होते – दौलतच्या मनाने एकादी गोष्ट घेतली की तो मागे सरकत नाही. ती गोष्ट पुरी करायचे पाहातो.

दुसऱ्या दिवशी तिने झुणका–भाकरीची शिदोरी दिली. दौलतने दाखला, मार्कलिस्ट, एक सतरंजी, चादर, ताट–वाटी–तांब्या वगैरे सामान पेटीत भरले. आणि सातारला जायला निघाला. भास्कर त्याच्या निर्णयाने चकित झाला, पण त्याने मोडता घातला नाही. यातूनही काही चांगले निघेल असे त्याचे भाबडे मन सांगत होते.

स्टेशनवर त्याला कळले, सातारला मिरजेहून जाता येते. या वेळी त्याने बिनतिकिटाचा प्रवास करायचे ठरविले. पकडले तर पकडले या निश्चयाने तो आगगाडीत बसला. त्याचे हे धाडस

पार पडले. मिरजेला तो उतरला. दुसऱ्या आगगाडीत बसला. दुसऱ्या दिवशी पहाटे तो सातारा रोड स्टेशनला उतरला. चेकरच्या नजरेला न पडता तो स्टेशनबाहेर पडला. तिथून चौकशी करून तो एस. टी. स्टँडला आला. सातारा रोड ते सातारा या गाडीत तो बसला. आठ आणे तिकीट पडले. अवघ्या आठ आण्यात त्याने अकोला ( वासूद ) ते सातारा प्रवास केला.

सकाळी तो शोधत शोधत कॉलेजच्या आवारात आला. सगळीकडे शुकशुकाट होता. कॉलेजचे आवार मोठे होते. इमारत मोठी होती. ऑफिसची मात्र बैठी कौलारू इमारत होती. हातात पेटी आणि पिशवी घेऊन दमलेला तो इकडेतिकडे पाहात होता. तिथे एक प्रौढ गृहस्थ पट्ट्यापट्ट्यांच्या सद्र्या-पायजम्यावर फिरताना दिसले. दौलतने त्यांना विचारले – ' अहो, इथं प्रिन्सिपॉल कुठं भेटतील ? '

तो माणूस खळखळून हसत म्हणाला – ' त्यांच्या ऑफिसात. '

त्या गृहस्थाने ऑफिसकडे निर्देश केला. पुढे म्हणाले –' आता ते फिरायला गेलेत. तासाभरानं या. '

दौलत रात्रभर जागरणाने दमला होता. तो सरळ एका वडाच्या झाडाखाली गेला. निवांत पडून राहिला. आवारात बरीच वडाची झाडे होती. एक केळीची बाग दिसत होती.

अंदाजाने तास झाला असे समजून तो उठला. पेटी–पिशवी सावरीत ऑफिसापाशी आला.

घंटी वाजल्यावर तो ऑफिसात गेला, तर मघाचेच ते प्रौढ गृहस्थ आता कोट–पाटलुणात खुर्चीवर बसलेले होते ! त्याला पाहून पुन्हा खळखळून हसले. म्हणाले–' या . काय काम आहे ? '

‘ मला कॉलेजमध्ये प्रवेश पाहिजे. ’

‘ देऊ. जा, तिकडच्या ऑफिसात प्रवेशाचे, फीचे नव्वद–शंभर रुपये काय असतील ते भरा. ’

‘ पण –’ दौलतने आवंढा गिळला.

‘ पण काय ?’

‘ श्रमाच्या बदल्यात. . ’

‘ तुम्ही उशीर केला यायला. त्या जागा केव्हाच भरल्या. आता त्या योजनेत अधिक मुलं घेता येत नाहीत. जा. . . ’ तटकन् ते म्हणाले.

जड पावलांनी दौलत ऑफिसबाहेर पडला. गेटबाहेर खाली मान घालूनच तो चालला होता तो त्याला खडी फोडण्याचा आवाज कानावर ऐकू आला. त्याने चमकून पाहिले. रस्त्याच्या आतील बाजूस ओढा आहे. ओढा बराच खाली आहे. बाजूस उतरती जागा आहे. तिथे काही मुले खडी फोडत बसली होती. त्यांनी केलेल्या खडीचा ढीग प्रत्येकाच्या समोर होता आणि एका खडी फोडणाऱ्या मुलाबरोबर गप्पा मारणारा विठ्ठल त्याला दिसला. विठ्ठलला तिथे पाहून त्याला नवल वाटले.

विठ्ठलने दौलतला पाहिले. तो चकित होऊन म्हणाला –‘ तू इकडं कुठं ?’

‘ कॉलेजमध्ये नाव घालायला आलो होतो. ’

‘ मग ?’

‘ नाही घेतलं. ’

‘ का ? ’

'पैसे नाहीत आणि श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण या योजनेतील साऱ्या जागा संपल्या आहेत.' त्याने खडी फोडत असणाऱ्या मुलांकडे निर्देश करून विचारले – 'ही मुलं ?'

'ही श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण घेणाऱ्या योजनेतील मुलं आहेत. अगदी लांबून लांबून आलीत, शिकायचंच या जिद्दीनं.'

आपल्यासारखीच अशी अनेक मुले आहेत हे पाहून दौलत भारावून गेला. त्या मुलांकडे जवळिकीने पाहू लागला. त्यांच्या दणकट मनगटांकडे पाहू लागला.

विठ्ठल म्हणाला – 'चल खोलीवर.'

दौलत त्याच्याबरोबर गेला. त्याने गोडवलीत खोली घेतली होती. जेवणाचा डबा खानावळीतून येत होता. गोडवलीपासून कॉलेज पाचदहा मिनिटांच्या रस्त्यावर होते.

दौलतने काही निश्चय केला. त्याने विठ्ठलला विचारले – 'फक्त मुलांनाच खडी फोडण्याचं काम मिळतं का ?'

'तसंच काही नाही. कॉलेजच्या इमारती बांधायच्या आहेत. बरीच खडी लागते.'

'मला काम मिळेल ?'

'मी सांगतो तिथल्या माणसाला. तो देईल तुला काम. पण तुला काम कशाला पाहिजे ?'

'जायला पैसा नको ?'

'हं.'

नव्या उत्साहाने दौलत खडी फोडण्याच्या ठिकाणी आला. त्याला काम मिळाले. हातोडा मिळाला. दगड घेऊन त्यावर

हातोड्याने घण मारून तो खडी फोडू लागला. खडी फोडण्यात तो मग्न झाला. आजूबाजूला काय चालले आहे याचे त्याला भान नव्हते.

दोन वेळेला विठ्ठलच्या डब्यातील भाजी-भाकरी खायची, रात्री त्याच्याबरोबर खोलीवर झोपायचे,आणि दिवसभर खडी फोडायची, असे त्याने सत्र चालू ठेवले. सायंकाळ झाली की त्याचे खडी फोडणे बंद होई. मग विठ्ठलबरोबर ती फिरून येई. कॉलेजचे वसतिगृह कल्याणी बरॅकमध्ये होते. खोल्या ऐसपैस होत्या. कुणालाच झोपायला कॉट नव्हती. प्रत्येकाची ट्रंक–वळकटी–वह्या–पुस्तके एवढेच सामान. बायका भाकरी करीत. मोठमोठी भांडी घाशीत. बाकी मुलांना कालवण करावे लागे. आळीपाळीने वाढप करावे लागे. दळणे संस्थेच्या धनीच्या बागेत असणाऱ्या गिरणीतून दळून आणावी लागत. ही धनीची बाग एका टोकाला होती, तर कल्याणी बरॅक दुसऱ्या टोकाला. एक प्राध्यापक देखरेखीसाठी तिथे राहात. जी श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण घेणारी मुले होती ती काही सारीच धट्टीकट्टी नसत. काही किरकोळ प्रकृतीचीही असत. त्यांना हलके काम मिळे.

ग्रंथपालाच्या हाताखाली ग्रंथालयात अशा मुलांना काम करावे लागे. काही टपालाची ने–आण करीत. काही केळीच्या बागेला पाणी पाजीत. काही कॉलेजच्या इमारती, आवार स्वच्छ ठेवीत. काही बागकाम करीत. काही मुले गवंड्याच्या हाताखाली काम करीत, तर काहींना सिमेंटवर पाणी टाकावे लागे. अशी विविध कामे या योजनेतील मुलांना करावी लागत. या मुलांचे हज़ेरीपत्रक होते. त्यावर त्यांचे कामाचे पैसे जमा होत.

गावोगावची मुले शिक्षणासाठी इथे येऊन कष्ट करतात. त्यांची कहाणी बरीचशी दौलतसारखी होती. गरीबीने नडलेली, पण जिद्दीने भारलेली ती स्वाभिमानी मुले होती.

दौलतला वाटले, ही पोरे माहिती काढून येथें लवकर आली. त्यांनी उशीर केला नाही. आपण उगीचच उशीर केला यायला याचे त्याला वाईट वाटले.

खडी फोडताना कधी हातोडा निसटायचा. डाव्या हाताने धरलेल्या दगडावर पडायच्या ऐवजी बोटावर पडायचा. बोटातून सण्कन् कळ यायची. 'आई आई' करीत तो दुसरा हात झटकायचा. पुन्हा कळ विसरून हातोडा हाती घ्यायचा. हातोडा धरून धरून सुरवातीला त्याचा उजवा हात रक्ताळला. मग सवय झाली. हाताला घट्टे पडले. खडी फोडणाऱ्या त्याच्या सहमित्राचे त्याने हात पाहिले होते. तसेच त्याचे हात घट्टे पडलेले होऊ लागले.

एकदा तो खडी फोडण्यात मग्न होता. सहज नजर बाजूला वळली. प्रथम त्याला दिसले एका व्यक्तीचे अनवाणी पाय, मग एका सोटयावर रेललेला प्रचंड देह. खादीचा सदरा, खादीचे धोतर, खांद्यावर कांवळी घेतलेली ती व्यक्ती प्रसन्न होती. डोकीला टक्कल, पण भरघोस पांढरीशुभ्र दाढी होती. काळसर चेहऱ्यावरील ते सरळ मन दाखविणारे डोळे विलक्षण होते. ती व्यक्ती ऋषितुल्य होती. सोबत कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. ती व्यक्ती दौलतकडे निरखून पाहात होती. मग ती पुढे सरकली. सगळी पाहाणी करून ते दोघे हळूहळू कॉलेजच्या दिशेने निघून गेले.

डी फोडणाऱ्या मुलांना आता कंठ फुटला. दौलतने दगडावर घाव घालीत विचारले – 'कोण होतं ते ?'

'अण्णा.'

'कर्मवीर भाऊराव पाटील ते हेच ?'

'होय. तेच. आम्ही सर्व त्यांना अण्णा म्हणतो.'

दौलतच्या मनात आशा फुलू लागली.

आठ दिवस झाले दौलतला सातारला येऊन. पुन्हा अण्णा खडी फोडणाऱ्या मुलांच्या कामाची पाहाणी करायला आले. सोबत प्रिन्सिपॉल होते. दौलतच्यापुढे मोठा खडीचा ढिगारा झाला होता. त्याचे मन लावून काम चालले होते.

अण्णांनी दौलतच्या कामाची एकाग्रता पाहिली. खडीचा ढीग पाहिला. त्याच्यापुढे थांबत त्यांनी विचारले – 'तू कुठला ?'

'अकोला वासूदचा.'

'कोणत्या वर्गात प्रवेश घेतलास ?'

'प्रवेश मिळाला नाही.'

'का ?'

'माझ्यापाशी पैसे नव्हते. आणि हे साहेब म्हणाले की, फीचे पैसे भर, मग प्रवेश मिळेल.'

अण्णांनी प्रिन्सिपॉलकडे वळून विचारले – 'होय ?'

'हो. काय करणार ? श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण या योजनेतील सर्व जागा संपल्या.'

रतात.

'तरी या मुलाला कॉलेजात आणि या योजनेत प्रवेश द्यावीली, एवढंच नव्हे तर त्याला या योजनेचा सेक्रेटरी बनवा. मुल कामसू आहे, दणकटपण आहे. असा कामसू असणारा मुलगा योजनेत जागा नाही म्हणून परत पाठवू नका. अशा गुणी मुलांसाठी तर आपलं कॉलेज आहे. यापुढं लक्षात ठेवा.'

दौलतकडे वळून ते म्हणाले – 'कोणकोण घरी आहे ?'

'फक्त आई आहे. मी तिला एकलाच आहे.'

'नाव काय तुझं ?'

'दौलत.'

'तर दौलत, आज तू तुझ्या आईला तावडतोब पत्र लिही. ती माऊली तुझी काळजी करीत असेल. पत्र लिही की, माझी इथं सर्व व्यवस्था झालीय्. काळजी करू नकोस म्हणून.'

पुन्हा ते प्रिन्सिपॉलना म्हणाले – 'याचा कॉलेजचा प्रवेश बोर्डिंगचा प्रवेश, आणि योजनेचा सेक्रेटरी या कामाची अंमलबजावणी तावडतोब करा.'

अचानक उघडलेल्या नशीबाने दौलतला गहिंवरून आले. अण्णांनी त्याचे मार्कलिस्ट पाहिले नव्हते. फक्त काम पाहिले होते. अण्णांनी केलेल्या त्याच्या कामाचे हे कौतुक पाहून त्याला धन्यधन्य वाटले.

आणि खरोखरीच अण्णांनी सांगितल्याप्रमाणे पुढे सारे घडले. तिथेही तो सर्वांचा आवडता बनला. विठ्ठल म्हणालासुद्धा – 'मला वाटलं, तुला इथ जमायचं नाही. पण गड्या जमिवलंस की !'

मोठ्या आनंदाने दौलतने आईला पत्र लिहिले –



BVBK-0401968